**(सभापतीस्थानी मा. सभापती)**

**प्रश्नोत्तरे**

**बीड जिल्हयातील पुष्पा पांजारज र यांच्या ावा ज सो ा एज सी ावाच्या व्यापारी संस्थे ज ोटयावधी रुपयाचे ज रोसी परस्पर भारत पेट्रोलियम ज ार्पोरेश मधू वि ापरवा ा उचलल्याबाबत**

**(1) * 1971 श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. ध ाजी साठे , श्रीमती सुधा जोशी , श्री. सुधाज र जजजजे , श्री. यशवंतराव जडाज** : स-मा-ा-ीय अन, -ाजरी पुरवठा व ग्राहज संरजज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) बीड जिल्हयातील पुष्पा पांजारज र यांच्या -ावा-े ज सो-ा एज-सी -ावाची व्यापारी संस्था जेली ती-ा वर्षे शिधापत्रिजेवरील वाटले जाजाऱ्या ज ोटयावधी रुपयाचे ज रोसी-ा परस्पर भारत पेट्रोलियम जॉर्पोरेश-ामधू-ा वि-ापरवा-ा उचलले जात असल्याचे माहे मे-जू-ा,2004 रोजी वा त्यासुमारास आढळू-ा आले हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, शास-ा-े या प्रज रजी चौज शी ज ेली आहे ज ाय,

(3) असल्यास, चौज शीत ज ाय आढळू-ा आले व त्या-ुसार संबंधितावर ज ोजती ज ारवाई ज ेली वा ज रज्यात येत आहे,

(4) अद्याप, ज ारवाई ज ेली -ासल्यास त्याची सर्वसाधारज ज ारजे ज ाय आहेत ?

**श्री.सु िल तटज रे** : (1) हे जरे -ाही.

(2) व (3) श्रीमती पुष्पा पांजारज र, जिल्हा-बीड यांच्या ज ेसो-ा एज-सीचा परवा-ा ज्र.11/96 दि-ांज 31.12.2000 पर्यंत वैध होता. त्या-ंतर परवा-ाधारज ा-े ज ेलेल्या वि-ंती-ुसार सदर परवा-ा दि-ांज 16.4.2004 रोजी दि-ांज 31.12.2005 पर्यंत -ुत-ीज रज ज रु-ा दिलेला आहे. सदर -ुत-ीज रजास 1 वर्षे 3 महि-े 15 दिवस विलंब झाल्यामुळे, झालेल्या विलंबाबाबत -ियमा-ुसार योज्य ती दंडात्मज ज ारवाई ज रज्यात आलेली आहे. त्या-ुसार बीड जिल्ह्यासाठी वेळोवेळी प्राप्त झालेल्या ज रोसी-ा -ियत-ामधू-ा एज-सीस अ-ुज्ञेय असलेला ज ेरोसी-ा ज ोटा उचलज्यासाठी अ-ुमती दिलेली आहे.

(4) प्रश्-ा उद्भवत -ाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1971...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरात नमूद केल्याप्रमाणे केरोसीन एजन्सीचा परवाना दिनांक 31.12.2000 पर्यंत वैध होता. त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण दिनांक 16.4.2004 रोजी करण्यात आले. याचा अर्थ दिनांक 1.12.2001 ते 15.4.2004 पर्यंत त्यांचा परवाना नव्हता. या कालावधीत म्हणजे 39 महिने परवाना नसतांना अवैधरित्या केरोसीन कंपनीने विना परवाना उचलून त्याची विक्री केली त्याबद्दल शासन काय कारवाई करणार आहे?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, परवाना नूतनीकरण करण्यासंबंधी त्यांच्याकडून अर्ज दाखल करण्यास विलंब झाला ही बाब खरी आहे. त्या संदर्भात पुन्हा एकदा त्यांच्यावर दंडणीय कारवाई करुन परवाना नूतनीकरण करुन दिला आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या कलम 3 व 4 खाली केरोसीनचा विना परवाना व्यवसाय करणे हा गुन्हा आहे. आणि या गुन्हयाखाली दोषी ठरणाऱ्या व्यक्तीला दंड किंवा सात वर्षापर्यंत किंवा दोन्ही शिक्षा एकदम होऊ शकतात. एवढा मोठा गुन्हा असतांना उत्तरात "हे खरे नाही" असे म्हटले आहे. विना परवाना केरोसीन उचलले हे खरे नाही की, परस्पर भारत पेट्रोलियम कंपनीकडून केरोसीन उचलले हे खरे नाही? तसेच, उत्तरात असे म्हटले आहे की,"दिनांक 31.12.2000 पर्यंत परवाना वैध होता. त्यानंतर परवानाधारकाने केलेल्या विनंतीनुसार सदर परवाना दिनांक 16.4.2004 रोजी दिनांक 31.12.2005 पर्यंत नूतनीकरण करुन दिलेला आहे". म्हणजे जवळ जवळ साडे तीन वर्षांनी परवाना नूतनीकरण केले. मधल्या काळात विना परवाना उद्योग करण्यात आला. त्याचप्रमाणे एक वर्षे तीन महिने आणि 15 दिवसांचा विलंब झाल्याचे म्हटले आहे. हे कशाच्या आधारावर म्हटले आहे? एवढया मोठया गुन्हयाच्या बाबतीत दंडात्मक कारवाई करुन अश्या गुन्हयांना आपल्याला माफ करता येते कां?

श्रीमती सुनील तटकरे : सभापती महोदय, परवानाधारकांनी नूतनीकरण करण्यासाठी 15.4.2000 रोजी अर्ज केला.त्यामध्ये 1 वर्षे 3 महिने आणि 15 दिवसांचा विलंब झाला. या संदर्भातील कायद्यानुसार त्याच्यावर दंडणीय कारवाई करता येते. एकूण 1201 दिवसांचा विलंब झाला. या विलंबाबाबत 5 रुपये प्रमाणे व कायद्यातील तरतुदीप्रमाणे एकूण रु.6005 दंड केला. आणि रु.10,000 ची अनामत रक्कम दि.15.4.2004 रोजी जप्त केली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1971...

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, केरोसीनचा परवाना हा जिल्हाधिकारी एक वर्षासाठी देत असतात. या कंपनीकडे 1996 ते 2000 पर्यंत सतत हा परवाना कसा राहिला? आणि परत त्यांना नूतनीकरण करुन परवाना दिला. या अगोदर या कंपनीकडे किती हजार लिटर केरोसीनचा कोटा होता.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1971 . . . .

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, यांचे नियतन 288 कि.लिटर आहे आणि परवाना नुतनीकरण केलेला आहे, त्याला विलंब झाला आहे हे मी मघाशीच सांगितले आहे. यासाठी जो विलंब झालेला आहे, त्याबद्दल दंडनीय रकमेची कारवाई झालेली आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, परवाना धारकाने शासनाला 2004 मध्ये अर्ज केला आणि मग त्याला 2005 पर्यंत त्याचे नुतनीकरण करुन देण्यात आलेले आहे. यामध्ये 1 वर्ष 3 महिने 15 दिवसाचा विलंब झालेला आहे. पण प्रत्यक्षात परवान्याची मुदत 2000 मध्येच संपली होती. तेव्हा मुदत संपल्यानंतर सुध्दा त्याने विना परवाना रॉकेलची विक्री केलेली आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे विना परवाना रॉकेलची विक्री करता येते का ? जर तशी विक्री करता येत नसेल तर अशा वेळी तेथील अधिकारी काय करीत होते ? या प्रकारामध्ये तेथील सर्व अधिकारीही सामील झाले होते आणि त्याने व अधिका-यांनी मिळूनच हे सर्व केलेले आहे. तेव्हा संबंधित अधिका-यांवर आणि केरोसीन कंपनीवर कारवाई करणार आहात का ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यासाठी जो कालावधी धरण्यात आला, तो 31-12-2000 ला परवान्याची मुदत संपली होती, तेव्हापासूनचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी प्रश्न विचारला, त्याप्रमाणे त्यांच्या परवान्याचे नुतनीकरण झाले नव्हते ही बाब खरी आहे. परंतु त्यांना कंपनीकडून जे नियतन देण्यात आले ते, नियतन जिल्हा पुरवठा अधिका-यांकडून उपलब्ध करुन दिलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे महाराष्ट्रात कोणत्याच केरोसीन धारकाचे लायसन्स रद्द होत नाही आणि रद्द झाले तर त्याला स्टे दिला जातो. शासनाने याबाबतीत असे उदार धोरण आखले पाहिजे की, पाहिजे तेवढे केरोसीन मिळेल आणि तेवढे ते डिझेलमध्ये टाकण्यासाठी परवानगी दिली पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की, 1 वर्षे 3 महिने परवाना नसताना देखील भारत पेट्रोलिअम कडून त्यांनी केरोसीनचा कोटा मिळविला आहे. या काळात संबंधित जिल्हाधिकारी, अन्न पुरवठा विभागाच्या कार्यालयाकडून भारत पेट्रोलिअम कंपनीला कोटा रिलीज करण्याचे सर्टीफीकेट द्यावे लागते आणि तशा प्रकारचे सर्टीफीकेट शासकीय अधिका-यांनी

. . . .बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भारत पेट्रोलिअम कंपनीला दिले होते, हे खरे आहे का ? अशा प्रकारे परवाना नसताना कागदपत्रे दिली असतील तर त्या अधिका-यांवर काय कारवाई केली आहे ? तसेच ज्यांनी 1 वर्षे 3 महिने परवाना नसताना रॉकेल आणून धंदा केला, त्यांचे लायसन्स आपण रद्द का केले नाही ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला, त्याप्रमाणे ही वस्तुस्थिती खरी आहे की, परवाना नुतनीकरण केलेले नसताना सुध्दा तशा पध्दतीचे अतिरिक्त जिल्हाधिका-यांकडून किंवा जिल्हा पुरवठा अधिका-यांकडून कंपनीने यांना नियतन द्यावे अशा प्रकारचे पत्र गेल्यामुळे संबंधितांना नियतन दिलेले आहे. याबाबतीत निश्चितपणे अनियमितता झ ालेली आहे. त्यामुळेच त्यावेळचे अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा त्यावेळचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांची तातडीने विभागीय चौकशी करण्यात येईल आणि त्यासंबंधात पुढील कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : याठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा रोख असा आहे की, जवळजवळ 3 वर्षे परवान्याचे नुतनीकरण न होता सर्व व्यवहार तसेच सुरु राहीले. किंबहुना अन्न व नागरी पुरवठा विभागानेही ही बाब खपवून घेतली आणि संबंधिताला नियतन दिले. याठिकाणी फक्त परवान्याचे नुतनीकरण झाले नाही असे नाही, तर काही नियमबाहय गोष्टी करण्यामध्ये शासकीय अधिकारी किंवा अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी यांचा सुध्दा संबंध असण्याची शक्यता आहे. यादृष्टीने काय परिस्थिती आहे ? ते आपल्या उत्तरातून सन्माननीय सदस्यांना अपेक्षित आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण याठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्याप्रमाणे मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरी यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगितले की, परवाना नुतनीकरण केले नसताना सुध्दा संबंधितांना नुतनीकरण देण्यात आले ही बाब खरी आहे. म्हणून त्यावेळेस ज्यांनी-ज्यांनी नियतन देण्याच्या बाबतीत शिफारस केली असेल, कंपनीला पत्रे दिली असतील, त्यांची विशिष्ट कालावधीत विभागीय चौकशी करुन त्याबाबतीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी सौ.रणदिवे...... 13:10

ता.प्र.क्र.1971 पुढे चालू...

श्री.सुनील तटकरे (पुढे चालू...

नंतर परवाना नुतनीकरण करुन दिलेला आहे. तो पुन्हा रद्द करणे इष्ट ठरणार नाही.

श्री.नितीन गडकरी : त्यांनी 10 लाखाची कमाई केली. 25 हजार रुपये दंड भरला की सगळे चालते. हे शासनाचे चांगले धोरण आहे. या धोरणाचे स्वागत केले पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय नागरीपुरवठा मंत्र्यांकडून जे उत्तर दिले गेलेले आहे त्या अनुषंगाने जे लेखी उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये विसंगती आहे. पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना, "हे खरे नाही", असे म्हटलेले आहे. आता मंत्रीमहोदय खरे असल्याचे सांगतात. परवाना नसताना 1 वर्षे 3 महिने रॉकेल मिळते. परवाना नुतनीकरण करण्याऐवजी पुरवठा अधिकाऱ्यांनी परवानगी दिली होती आणि अवैध धंदे त्या ठिकाणी चालू होते. त्यांनी 25 हजार रुपये दंड भरुन घेऊन परवाना नियमित करुन दिला. याचा अर्थ बेकायदेशीर रॉकेलचा पुरववठा होत होता, अशा बेकायदेशीर रॉकेल उचलणाऱ्याला दंड भरून पुन्हा परवाना नुतनीकरण करून दिला. यामध्ये केवळ त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करुन चालणार नाही तर ज्या दुकानदाराने तो पुरवठा बेकायदेशीर असतानाही रॉकेलचा पुरवठा केला, त्याच्याविरूध्दही कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. तेव्हा हे दिलेले उत्तरामध्ये सुधारणा करणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : प्रश्न विचारण्यात आलेला आहे की, "बीड जिल्ह्यातील पुष्पा पांगारकर यांच्या नावाने केसोना एजन्सी नावाची व्यापारी संस्था गेली तीन वर्षे शिधापत्रिकेवरील वाटले जाणारे कोट्यावधी रुपयाचे केरोसीन परस्पर भारत पेट्रोलियन कॉपोरेशनमधून विनापरवाना उचलले जात असल्याचे माहे जे-जून,2004 रोजी वा त्या सुमारास आढळून आले हे खरे आहे काय, "या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. खरे काय आहे ते खालच्या उत्तरामध्ये स्पष्ट केलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : परवाना नसताना रॉकेल घेतलेले आहे, हे यामध्ये महत्वाचे आहे.

(उत्तर देण्यात आले नाही..)

प्रा.जोगेंद्र कवाडे : परवाना नसतांना रॉकेल उचललेले आहे. लहानांना मात्र गिळंकृत केले जाते, हा एक नमुना आहे. 2 लाख 64 हजार लिटर केरोसीनचा प्रश्न आहे. केरोसीन परवान्याची मुदत संपल्यानंतर परवाना नुतनीकरण करुन घेणे आवश्यक हाते, परवाना नुतनीकरण करुन न घेता ज्यांनी हा व्यवसाय केला तो वैध होता, की अवैध होता हा खरा प्रश्न आहे. तो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र.1971 (पुढे चालू...

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे चालू....

व्यवसाय वैध असेल तर त्याबाबतीत कारवाई करण्याची गरज नाही पण अवैध व्यवसाय केला जात असेल तर नियमाप्रमाणे संबंधितांवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली ? अशाप्रकारे अनियमितता झालेली असेल तर दिलेला परवाना रद्द करणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी नमूद केलेले आहे की, दंडात्मक कारवाई प्रपोज करण्यात आली. तरी देखील सन्माननीय सदस्य आणि विरोधी पक्ष नेते यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, त्याबाबतीत पुनर्विलोकन करुन त्या संबंधीचा योग्य तो निर्णय येत्या 15 दिवसामध्ये घेतला जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या प्रश्नाला जे उत्तर दिले, त्यामुळे गंभीर वळण लागेल, असे मला वाटते. त्यांनी सांगितले की, त्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली. त्या अधिकाऱ्यांनी दैनंदिन काम करत असतांना अशी परवानगी दिली. संबंधितांकडे परवाना नसताना जिल्हाधिकाऱ्यांनी तशी परवानगी दिली आणि 39 महिने रॉकेल उचलले गेले. परवाना नाही हे माहीत असतांना त्यांच्या सूचनेनुसार, अनुज्ञेयानुसार रॉकेल उचलायला परवानगी दिली, त्या संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1971 ...... श्री. मधुकर चव्हाण .....

कारण त्यांना 21 लाख रुपयांचा नफा झालेला आहे. त्यांना त्वरित निलंबित करणार काय ? हे रॉकेल ग्राहकांना जाण्याण्याऐवजी डिझेल आणि पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी तर गेले नाही ना याची चौकशी केली आहे काय ? शासनाला अंधारात ठेवून ज्यांनी 21 लाख रुपये मिळविलेले आहेत. त्यांना केवळ दंडात्मक शिक्षा न करता त्यांच्यावर रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टने फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ?

श्री. सुनील तटकरे : मी मघाशी उत्तरात सांगितले की, ज्या अधिकाऱ्याने लायसन्स रिन्यू न करता त्यांना रॉकेलचे नियतन दिले त्यांची तातडीने विभागीय चौकशी करण्यात येईल. अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांची एक महिन्यामध्ये विभागीय चौकशी केली जाईल आणि त्या अनुषंगाने चौकशीमध्ये जे येईल त्याप्रमाणे कठोर कारवाई केली जाईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी सांगितल्याप्रमाणे या परवान्याचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे त्याचे पुनरीक्षण माझ्या स्तरावर केले जाईल आणि ते पुनरीक्षण केले जात असताना आपण ज्या बाबी या ठिकाणी मांडलेल्या आहेत की, त्यांनी इतक्या मोठया प्रमाणावर रॉकेल घेतलेले आहे ते रॉकेल त्यावेळी लोकांना मिळाले की नाही याची सुध्दा सखोल चौकशी करुन त्या अर्जाचा गुणवत्तेनुसार योग्य तो निकाल घेतला जाईल.

श्री. संजय दत्त : ाननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराचा असा अर्थ निघतो की, या एजन्सीने केलेल्या गैर आणि बेकायदेशीर कृत्याला हे शासन संरक्षण देत आहे. अशा पध्दतीने महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी घडणार असेल तर तो चुकीचा पायंडा पडणार आहे. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी विशेष बाब म्हणून, एक उदाहरण म्हणून, कारण ज्याचा महाराष्ट्रामध्ये मेसेज जाणार आहे म्हणून याबाबतीत त्वरित कारवाई करण्याचे पाऊल का उचलत नाही ? याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टीकरण द्यावे.

श्री. सुनील तटकरे : लायसन्स रद्द करण्याची प्रक्रिया म्हणजेच त्यांच्या पुनरीक्षण अर्जाची सुनावणी होय. ती केल्याशिवाय निलंबित करता येत नाही कारण एकदा ते लायसन्स रिन्यू झालेले आहे. एकदा शासन स्तरावर त्याचे नुतनीकरण झाले असल्यामुळे त्यासंदर्भात विशिष्ट दिवसांमध्ये पुनरीक्षण करतो आणि त्याबाबतीत निर्णय घेतो असे मी या ठिकाणी सांगितले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

ता. प्र. क्र. 1971 ......

श्री. नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी ॲप्रोप्रिएट प्रश्न विचारलेला आहे. खरे म्हणजे या प्रकरणामध्ये अनेक वर्षे परवाना नसताना रॉकेलची सर्रास विक्री केली. आपल्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना सर्व कागदपत्रे दिली. यामध्ये चौकशी समिती काय करणार आहे ? सर्व एव्हीडंस क्लिअर आहे. आता पुनरीक्षण केल्यानंतर पुनरीक्षणामध्ये त्याचा परवाना रद्द होणार की पुन्हा ठेवणार हे नक्की होणार नाही. म्हणून तुम्हाला आता अधिकार आहे. तुम्ही परवाना रद्द करु शकता आणि या सभागृहात घोषणा करु शकता. याबाबत आपण सांगावे. आम्ही पुन्हा तीन महिने प्रश्न विचारु शकत नाही. काही वेळा पुनरीक्षण करण्यासाठी पुन्हा एकदा हिअरींग होते. त्या हिअरींगमध्ये जनरली काहीच होत नाही. त्या अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्याचा आपल्याला अधिकार आहे. आपल्याला जर मेसेज द्यावयाचा असेल तर कॉग्रेसचे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी म्हटल्याप्रमाणे घोटाळे सुरु असल्यामुळे या लोकशाही आघाडीच्या सरकारबद्दची जी काही इमेज खराब होत आहे त्याचा मेसेज राष्ट्रवादीच्या मंत्रिमहोदयांनी दिला पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केलेली आहे. तेव्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मंत्री म्हणून अशा भ्रष्टाचाराला संरक्षण देणे चांगले नाही. त्यांचा परवाना रद्द करुन ते संबंधित उपजिल्हाधिकारी आहेत त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात येईल असे बाणेदार उत्तर आपण देणार आहात काय ?

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी एक पहावे की, जे पुनर्विलोकन आपण करणार आहात त्यामध्ये जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने सुध्दा तो तपास व्हावा आणि याबाबत सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे तो पाहता एकंदर हे प्रकरण बघितले तर एखाद्या किरकोळ लायसन्सदाराला सुध्दा एखादी गोष्ट त्याने चुकवली तर आपण त्याच्यावर खटला घालतो आणि अन्य सर्व दंडनीय कारवाई करतो. या ठिकाणी तर सलग तीन वर्षे हे चालले आहे. याबाबतीत कठोरातील कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने जी विनंती या सदनाने केलेली आहे त्या अनुषंगाने आपण अजून काही उत्तर देऊ शकाल काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता त्यांचा परवाना निलंबित करण्यात येईल. त्यांचा परवाना आजच निलंबित करण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1971....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, त्या दुकानाचा परवाना निलंबित करणार आहे की, त्या अधिका-यांना निलंबित केले जाणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, त्या दुकानाचा परवाना आज निलंबित करण्यात येईल. तसेच त्या अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करुन एक महिन्याभरामध्ये निर्णय घेण्यात येईल. मा.सभापतींनी निर्देश दिल्यामुळे एक महिन्याच्या आत केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन मा.सभापतींना केले जाईल.

-----

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

**आष्टी तालुक्यातील (जि.बीड) स्वस्त धाय दुज ातील**
**धायाची बेज ायदा होजारी विज्री**

**(2) * 4948 श्री. वियज राव मेटे , श्री. रजजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड :**
स-मा-ा-नीय अन, -ारी पुरवठा व ाह संर मंत्री पुढील ाष्टींचा ुलासा रतील ाय :-
(1) आष्टी तालुक्यातील (जि.बीड) ज डा, देवुळजाव, सावरजाव आजि वेलतूरी या विभाजातील स्वस्त धा-य दुज ा-ातील रेश-ा जार्डवर मिळजारा जहू, तांदूळ पाथर्डी तालुक्यातील जरंजी येथील व्यापाऱ्यां-ाा विज ज्यात येतो हे जरे आहे ज ाय,
(2) असल्यास, याबाबत शास-ा-ने चौज शी जेली आहे ज ाय,
(3) असल्यास, चौज शीत ज ाय आढळू-ा आले व तद्-ुसार संबंधित दोषींवर जोजती जारवाई जेली वा जरज्यात येत आहे ?

**श्री.सुील तटज रे** : (1) हे जरे -ाही.
(2) प्रश्-ा उद्भवत -ाही.
(3) प्रश्-ा उद्भवत -ाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या प्रश्नाला सरळ सरळ चुकीचे उत्तर दिलेले आहे. मी प्रश्न असा विचारला होता की, आष्टी तालुक्यातील कडा, देऊळगाव, सावरगाव आणि बेलतूरी या विभागातील स्वस्त धान्य दुकानातील रेशन कार्डवर मिळणारा गहू, तांदू पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील व्यापा-यांना विकण्यात येतो हे खरे आहे काय ? या प्रश्नाला नाही असे उत्तर दिले आहे आणि बाकीच्या दोन्ही प्रश्नांना नाही असेच उत्तर दिलेले आहे. त्याठिकाणच्या 4-5 गावातील लोकांनी मला प्रत्यक्ष भेटून निवेदने दिली आहेत. या गावामध्ये असलेले व्यापारी नगर जिल्हयातील व्यापा-यांना धान्य विकत आहेत. यामध्ये आष्टी तालुक्यातील तहसीलदार, जिल्हयाचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांची साखळी आहे. आष्टी तालुक्याहून दररोज एक ट्रक माल नगर जिल्हयात तसेच हैद्राबादमध्ये जात आहे. त्यामुळे दिलेले उत्तर पूर्णपणे चुकीचे आहे. त्या गावातील लोकांनी गावानिशी व व्यापा-यांच्या माहितीनिशी ही बाब उघडकीस आणली होती. त्यामुळे तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिका-यांविरुध्द काय कारवाई केली जाणार आहे असा माझा प्रश्न आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी माझ्याकडे माहिती उपलब्ध आहे. त्यानुसार कडा गावातील एपीएलखालील कार्डांची संख्या 2200 आहे, बीपीएलखालील 1227 आहे, अंत्योदय योजनेखालील कार्डांची संख्या 93 आहे, 1 जानेवारी,2004

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4948... श्री.सुनील तटकरे....

ते डिसेंबर, 2004 पर्यंत 2650 क्विंटल गव्हाची उचल करुन त्याचे वाटप केलेले आहे, 791 क्विंटल तांदुळाची उचल करुन त्याचे पूर्णपणे वाटप केलेले आहे. कडा, देऊळगांव घाट, सावरगाव व बेलतूरी या गावातील सर्व दुकानांची तपासणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर करण्यात आली. त्यावेळी काही दुकानांमध्ये धान्य नमुने न ठेवणे, भाव फलक न लावणे, असे दिसून आल्यामुळे 6 दुकाने निलंबित करण्याची कडक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित निरीक्षकांनी तपासणी केली होती त्यावेळी संबंधित गावातील लोकांनी त्यांना धान्य मिळाले आहे असा जाबजबाब दिलेला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदय चुकीचे उत्तर देत आहेत. त्या गावातील लोकांनी अनेकवेळा तक्रारी केल्या आहेत. केवळ 2-4 जवळच्या लोकांच्या सहया घेतल्या म्हणजे त्या गावातील संपूर्ण लोकांचे मत आहे असे नाही. हे संपूर्ण रॅकेट आहे. आष्टी तालुक्यातील एक ट्रक माल नगर जिल्हयामध्ये विकला जात असून यामध्ये तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी सहभागी आहेत. बीड जिल्हयातील दररोज 10 ट्रक माल हैद्राबादला रवाना होतो, आष्टी तालुक्यातील व्यापारी नगर जिल्हयातील व्यापा-यांना हा माल विकत आहेत. ही वस्तुस्थिती आहे

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, यासंबंधी तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्थानिक अधिका-यांकडून चौकशी केली असताना त्याच्यामध्ये काही निष्पन्न झाले नाही. तथापि, मा.सदस्य श्री.विनायक मेटे यांचे म्हणणे आहे की, त्या गावातील लोकांनी त्यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. त्याबाबत जिल्हयाच्या बाहेरच्या अधिका-यांकडून व राज्य दक्षता पथकाकडून तपासणी केली जाईल.

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.4948 ....) (श्री. सुनील तटकरे....

याबाबतीत पाहणी केली जाईल. ही पाहणी करीत असताना मा.सदस्यांनी केलेल्या तक्रारीनुसार कोणी दोषी आढळले तर जसे परवाने निलंबित केलेले आहेत त्याप्रमाणे ज्यांना पाहणी केली आणि आणि ज्यांचे नियंत्रण आहे त्यांच्यावर सुध्दा कठोर कारवाई केली जाईल.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाबाबत टाटा कन्सल्टन्सीने शासनास सादर केलेल्या ३६५ कोटी रुपयांच्या आराखड्याबाबत.**

**(३) * ५०६४ मेजर सुधीर सावंत , श्री. अनंत तरे :** सन्माननीय पर्यटन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्गच्या पर्यटन विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी शासनाने नेमलेल्या टाटा कन्सल्टन्सीने ३६५ कोटी रुपयाचा आराखडा १९९९ मध्ये शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आराखडयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व आराखडयाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी कोणकोणती कामे हाती घेण्यात आली आहेत व त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,निधीनुसार किती ज्ञामे पूर्ज झाली आहेत व किती निधी खर्च करण्यात आला आहे व किती कामे अजून अपुर्णावस्थेत आहे,

(४) अपूर्णावस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकरिता :** (१) होय, हा आराखडा रु.५४५ कोटीचा आहे.

(२) या आराखड्यात जिल्हयाची पांच नोडल पॉईटस्मध्ये विभागणी करण्यात आली असून त्यामध्ये २२ स्थळांचासमावेश आहे. या स्थळांच्या विकासासाठी रस्ते विकास, पाणीपुरवठा, विजपुरवठा व इतर सुविधांचा समावेश आहे.

(३) व (४) या स्थळाच्या विकासाची कामे पर्यटन महामंडळाने केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने हाती घेतली आहेत.

अ) सावंतवाडी येथील कामे केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्यातून घेण्यात आली असून, मोती तलाव, विकास व सौदर्यीकरण, भोसले उद्यान येथे उपहारगृह, संगीत कारंजे, आत्मेश्वर तळ्याचा विकास पर्यटक अभ्यागत केंद्र, शिल्पग्राम ही कामे पुर्ण झाली आहेत.

ब) तारकर्ली येथे अस्तीत्वात असलेले पर्यटक निवासाचे व उपहारगृहाचे नुतनीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अर्थ सहाय्यातून पूर्ण करण्यात आले आहे.

ज) जारेपाटण येथे रस्त्यालगतच्या सुविधा निर्माण करण्याचे काम केंद्राच्या सहाय्याने प्रगतीपथावर आहे.

ड) कोकण रिव्हीएरा सर्कीट-१ अंतर्गत केंद्र शासनाने विजयदुर्ग व सिंधुदुर्ग येथे दिशादर्शक व माहिती फलक, धक्का विकास, सौदर्यीकरण, उद्यान निर्मिती व किल्ल्याचे सौदर्यीकरण यासाठी रु.३.०२ कोटीचा निधी केंद्रीय सा.बां.विभागाला उपलब्ध करुन दिला असुन विजयदुर्ग किल्ला येथील काम सुरु करण्यात आले आहे.

ज्ञोकण रिव्हीएरा सर्कीट-२ अंतर्गत, केंद्र शासनाने सन २००४-०५ या आर्थिक वर्षात, धामातूर तंबू निवास, आंबोली पर्यटक निवास व उभादांडा विकासासाठी रु.२.५१ केटी निधी नुकताच मंजूर केला असुन ८०% रक्कम वितरीत केली आहे.

इ) कोकण पॅकेज अंतर्गत राज्य शासनाने सिंधुदुर्ग जिल्हयासाठी, सन २००४-०५ या आर्थिक वर्षात रु.१८६६.६१ लाखाचा निधी उपलब्ध करुन दिला असुन कामे प्रगतीपथावर आहेत.

----------

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 5064....)

मेजर सुधीर सावंत : 1993 मध्ये केन्द्रीय मंत्री श्री. माधवराव शिंदे यांनी सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला. त्यानंतर 12 वर्षे लोटली. या 12 वर्षात केवळ 7-8 खोल्या सोडल्या तर पर्यटकांसाठी निवासाची कोणतीही सोय तेथे उपलब्ध नाही. पर्यटकांसाठी जोपर्यन्त राहाणाची सोय होत नाही तोपर्यन्त त्याठिकाणी पर्यटक कसे काय येणार ? आम्हाला त्याठिकाणी 5 स्टार हॉटेल्स नको. परंतु पर्यटकांची किमान राहाण्याची व्यवस्था झाली पाहिजे. पर्यटन संस्थेद्वारे त्याठिकाणी न्याहरी निवास व्यवस्था चालविली जात आहे. अशा उपक्रमाला उत्तेजन देण्याची तसेच न्याहरी निवास संस्थेला मदत करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा तशी मदत शासन करणार आहे काय ? तसेच एक गाव पर्यटन ग्राम म्हणून जाहीर करावे, बोट सर्व्हिस सुरु करावी, वॉटर स्पोर्टस् सुरु करावेत, अशा प्रकारचे विविध उपक्रम राबविण्याबाबतची मागणी शासनाकडे केलेली आहे. या मागण्यांबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच न्याहरी निवास संस्थांना उत्तेजन देण्याच्यादृष्टीने शासन काही खास कार्यक्रम हाती घेणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : मा.सदस्य श्री. सावंत यांनी प्रश्न विचारताना अशी माहिती दिली की, केन्द्रीय मंत्री श्री. माधवराव शिंदे यांनी सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. ही माहिती चुकीची आहे. राज्य शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गेल्या चार-पाच वर्षाच्या कालावधीत पर्यटन विभागातर्फे खूप कामे झालेली आहेत. त्याठिकाणी तीन प्रोजेक्ट सुरु आहेत. रिव्हीएरा सर्कीट-1, रिव्हीएरा सर्कीट-2 आणि कोकण पॅकेज घोषित केलेले आहे. तीन प्रकारे तेथे कामे सुरु आहेत. या कामाच्या संदर्भातील माहिती आवश्यकता असेल तर मी पटलावर ठेवतो. मा.सदस्यांनी इको टुरिझम व्हिलेज तसेच बेड ब्रेकफास्ट स्कीम बाबत विचारणा केली. बेड ब्रेकफास्ट स्कीम त्याठिकाणी चालू केलेली आहे. त्याबाबतीत काही सूचना असतील तर दुरुस्ती करता येईल. इको टुरिझम व्हिलेजच्या बाबतीत तेथील ग्रामपंचायतीने प्रस्ताव पास करुन आमच्याकडे पाठविला तर त्याबाबतीत आम्ही विचार करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 5064....)

श्री. अनंत तरे : कोकणाची नेहमीच उपेक्षा केली जाते. 545 कोटीचा आराखडा आहे. परंतु राज्य शासनाने एकही पैसा दिलेला नाही. केन्द्र शासनाने पैसे दिलेले आहेत. उत्तराच्या भाग (ड) मध्ये असे म्हटलेले आहे की, सिंधुदुर्ग येथे दिशादर्शक व माहिती फलक, धक्का विकास, सौदर्यीकरण, उद्यान निर्मिती व किल्ल्याचे सौदर्यीकरण यासाठी रु. 3.02 कोटीचा निधी केन्द्रीय सा.बां. विभागाला उपलबध करुन दिला असून विजयदुर्ग किल्ला येथील काम सुरु करण्यात आले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 13:30

ता.प्र.क्र.5064...

श्री. अनंत तरे...

सभापती महोदय,उत्तराच्या "इ" मध्ये कोकण पॅकेज अंतर्गत राज्य शासनाने सिंधुदूर्ग जिल्हयासाठी सन 2004-05 या आर्थिक वर्षात रुपये 1866.61 लाखाचा निधी उपलब्ध करुन दिला असून कामे प्रगतीपथावर आहेत असे नमूद केले आहे. या निधीतून कोणकोणती कामे सुरु करण्यात आलेली आहेत ? कोकण पॅकेज अंतर्गत राज्य शासनाने सिंधुदूर्ग जिल्हयासाठी जो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे त्यातील किती निधी प्रत्यक्षात खर्च झालेला आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सिंधुदूर्ग जिल्हयासाठी कोकण रिव्हीएरा सर्कीट-1 अंतर्गत केंद्र शासनाने 2003-2004 या वर्षात 3.02 कोटी रुपयांचा निधी केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला उपलब्ध करुन दिलेला आहे. केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून त्या ठिकाणी पर्यटनाची कामे केली जात आहेत. त्याच प्रमाणे केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनाला 2004-2005 या आर्थिक वर्षात 2.51 कोटी रुपयांचा निधी नुकताच मंजूर केलेला आहे. महाराष्ट्र शासनाने आतापर्यन्त 1586 लाख रुपये या कामी दिलेले आहेत. या ठिकाणी कोणकोणती कामे हाती घेतली आहेत याची यादी माझ्याकडे उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांचा आग्रह असेल तर ती यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. 2004-1005 या आर्थिक वर्षात पर्यटन विभागातर्फे 307 लाख रुपयांची कामे त्या ठिकाणी केलेली आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : माननीय पर्यटन राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते मला थोडेसे चुकीचे वाटते. कोकण रिव्हीएरा सर्कीट-2 अंतर्गत केंद्र शासनाने 5.02 कोटी रुपयांचा निधी केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला उपलब्ध करुन दिलेला आहे. तो निधी मंजूर होऊन दोन वर्षांचा कालावधी होऊन गेलेला आहे. केंद्र शासनाकडून केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दोन वर्षापूर्वीपासून निधी येऊन पडलेला आहे. परंतु त्या निधीचा विनियोग सिंधुदूर्ग तसेच रत्नागिरी जिल्हयात कुठेही करण्यात आलेला नाही. रत्नागिरी जिल्हयात जयगड किल्ल्याच्या विकासासाठी 2 कोटी रुपये, विजयदूर्ग किल्ल्याच्या विकासासाठी 2.50 कोटी रुपये, मालवण येथील किल्ल्याच्या विकासासाठी 1 कोटी 10 लाख रुपये केंद्र शासनाने दिलेले आहेत. परंतु त्यातील एकही पैसा खर्च झालेला नाही. केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कुठेही काम सुरु झालेले नाही. केंद्र शासनाकडून कोकण रिव्हीएरा सर्कीट-2 अंतर्गत 5 कोटी 2 लाख रुपये

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5064...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी..

आलेले आहेत. तो पैसा केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग ताबडतोब खर्च करीत नसेल तर आपल्या एजन्सीच्या माध्यमातून हा पैसा आपल्या राज्यात आणून तो खर्च केला जाणार आहे काय ? तो पैसा आणला तर तो किती कालावधीत खर्च केला जाईल ? 1985 साली तत्कालिन मुख्यमंत्री श्री. शरद पवार असताना यांनी सिंधुदूर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केलेला आहे. त्या ठिकाणी तीन पंचतारांकित हॉटेलचे प्रकल्प उभारण्याचे प्रस्ताव आले. मोचे मोड येथे तिमलो हे गोव्याचे पंचतारांकित हॉटेल होणार होते. वेळागर शहरामध्ये 134 एकर जमीन ताजमहाल हॉटेलसाठी उपलब्ध करुन देण्यात आली, ऑबेरॉय हॉटेलचा प्रकल्प होणार होता. हे प्रकल्प आजपर्यन्त पेंडींग आहेत. हे प्रकल्प सुरु करण्यासाठी आपण काय कार्यवाही करणार आहात ? हे विकासक हे प्रकल्प त्या ठिकाणी विकसीत करणार नसतील तर त्यांचे परवाने रद्द करुन नवीन विकासाला त्या ठिकाणी उद्योग प्रकल्प उभारणीसाठी परवानगी देणार आहात काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकण रिव्हीएरा सर्कीट-2 च्या संदर्भात उल्लेख केला. यासंदर्भातील पॅकेजसाठी केंद्र सरकारकडून पैसे आले होते.त्यासंबंधीची कामे सुरु झाली नाहीत त्याची कारणे अशी आहेत की, सदर कामे ही सी.पी.डब्ल्यू करणार होते हे खरे आहे. परंतु या कामांसाठी मेरिटाईम बोर्डाकडून एन.ओ.सी. हवे होते, त्याच प्रमाणे यु.एस.आय.कडून एन.ओ.सी.हवे होते, तसेच सी.आर.झेड.चे एन.ओ.सी. हवे होते. असे तीन एन.ओ.सी. न मिळाल्याने काम थांबले होते. आता राज्य शासनाने स्वत: दखल घेऊन सी.आर.झेड. आणि यु.एस.आय. ची परवानगी आपण घेतलेली आहे. आणि लवकरच केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ही कामे सुरु होतील. या ठिकाणी तीन हॉटेल्स प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करुन दिल्या होत्या यासंबंधीचा दुसरा प्रश्न विचारला गेला. त्याबाबतीत सांगतो की, तिमेलो, ताजमहाल हॉटेल, ऑबेरॉय हॉटेल यांची नावे घेतली गेली. या हॉटेल प्रकल्पांना मान्यता देऊन दहा वर्षे होऊन गेलेली आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतू ही संपूर्ण जागा सी.आर.झेड. झोन मधील आहे. सी.आर.झेड. झोनमध्ये कुठलीही डेव्हलपमेंट होऊ शकत नाही. म्हणून या तिन्ही कंपन्या आपल्याकडे वारंवार आल्या. दिल्ली येथे परवानगीसाठी प्रयत्न केले. परंतु त्यांच्या कामात प्रगती झाली नाही. दोन महिन्यापूर्वी या कंपनी मालकांबरोबर एक बैठक घेतली. सी.आर.झेड. चा

3..



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 13:30

ता.प्र.क्र.5064...

श्री. सुरेश शेट्टी

कायदा लक्षात घेऊन त्या ठिकाणी रिसॉर्ट काढणे शक्य आहे काय याबाबतचा प्रस्ताव शासनातर्फे त्यांना देण्यात आलेला आहे. या संबंधी ते वर्कआऊट करीत आहेत. एक दोन महिने आपण त्यांची वाट पाहू. नाही तर या जागेसाठी पुन्हा रिटेंडर मागवू.

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 13:35

ता.प्र.क्र. 5064 पुढे सुरु....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विविध जिल्हयांच्या पर्यटनाच्या योजनेसाठी टाटा कंसलटन्सी सर्व्हीसेसने 545 कोटी रुपयांची योजना शासनाकडे सादर केली होती. खात्याने 18 कोटी रुपयांची योजना तयार केलेली आहे. या गतीने काम केले तर पुढील 25 वर्षामध्ये सुध्दा ही सर्व कामे पूर्ण होणार नाहीत. शासनाने असे धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे की जी कामे शासकीय पैशातून करणे शक्य आहेत ती करावयाची. कर्नल श्री. सुधीर सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे बोटींग सुरु करणे,टेंटस् उभारणे,गार्डन तयार करणे,इतर सुविधा पुरविणे ही कामे शासनाने करावयाची. यासाठी तिकीट लावता येऊ शकते. तसेच बीओटी तत्वावर कामे केली तर लवकरात लवकर चित्र बदलेल आणि जास्तीत जास्त पर्यटक येतील. योजना यशस्वी होईल. या योजनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी याठिकाणी खाजगी गुंतवणूकदार किती येतील आणि त्यातील किती काम व्हायेबल आहे याचा विचार शासनाने केला आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, टाटा सर्व्हीसेसकडून 8 रिपोर्ट आलेले आहेत. कोकणासाठी,विदर्भासाठी,मुंबईसाठी,पश्चिम महाराष्ट्रासाठी अशा वेगवेगळया विभागांसाठी रिपोर्ट तयार केलेले आहेत. हे रिपोर्ट शासनाने मान्य केलेले नाहीत. रिपोर्ट तयार करुन ठेवले आहेत. शासनाने रिपोर्ट मान्य केले आणि कामांना मंजुरी दिली असे नाही. रिपोर्टमध्ये जी कामे सुचविण्यात आली आहेत त्यातील कामे बांधकाम खात्याने आणि एमटीडीसी विभागाने केली आहेत. सभापती महोदय,....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, टाटा कंसलटन्सीने अहवाल सादर केला परंतु शासनाने तो स्वीकारलेला नाही. परंतु लेखी उत्तरामध्ये होय असे म्हटले असून कंपनीने 245 कोटींचा आराखडा सादर केला आहे असे म्हटले आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, रिपोर्ट शासनाकडे आलेला आहे. रिपोर्टमध्ये अंदाजपत्रक किती आहे ते मी सांगितलेले आहे. रिपोर्ट स्वीकारलेला नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 545 कोटी रुपयांचा आराखडा हा मोठा आहे. मला एका गोष्टीचा आनंद आहे की यावर्षीच्या बजेटमध्ये पर्यटन खात्यासाठी 70-80 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. केंद्र शासनाकडून किती पैसे आणणार हा वेगळा भाग आहे.

...2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 13:35

ता.प्र.क्र. 5064 पुढे सुरु ...

श्री. नितीन गडकरी ....

सगळयात जास्त रोजगार हा टूरिझममधून मिळतो असा तज्ज्ञांचा अहवाल आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, बेसिक काम शासन करु शकेल. म्हणजे बोटींगसाठी धक्के उभे करणे,रस्ते करणे इ. 100 कोटींची कामे यामध्ये होऊ शकतील. टाटा कंपनीचा अहवाल शासनाने स्वीकारला नाही आणि कंपनीने खर्चाचे एस्टीमेट दिले आहे ही गोष्ट खरी आहे. माझी शासनाला विनंती आहे की, हा अहवाल शासनाने स्वीकारावा. हा अहवाल इतका चांगला आहे की यातील शिफारशींची अंमलबजावणी केली तर राज्यातील निरनिराळया विभागात 50 लाख लोकांना नवीन रोजगार निर्माण होऊ शकतो. कोकणासारख्या भागात रोजगार मिळू शकतो. 18 कोटीच्या माध्यमातून खाजगी कंपन्यांकडून 100 कोटीची कामे होऊ शकतात. कालच आपण वीजेबाबत करार केला खरे पाहता हा करार आधीच केला पाहिजे होता. शासनाचा पैसा वाचला असता. मला वाटते दोघांचा समन्वय असल्याशिवाय या योजनेच्या अंमलबजावणीला काही अर्थ राहणार नाही. हा पैसा खर्च करण्याच्या आधी दोन्ही विभागांनी इंटरलिंक केले तर योजना यशस्वी होऊ शकेल. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, टाटा कंपनीचा अहवाल स्वीकारावा. हा अहवाल शासन स्वीकारणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5064....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांनी मंत्री म्हणून आणि मी राज्यमंत्री म्हणून, या खात्याच्या कारभार स्वीकारल्यानंतर, आम्ही सहयाद्री येथे एक बैठक आयोजित केली होती आणि त्या बैठकीत या क्षेत्राशी संबंधित असलेल्या सर्व लोकांना बोलावले होते. तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले होते की, टाटा कन्सलटन्सीचा रिपोर्ट आमच्याकडे आलेला आहे आणि आपल्याला हवी असेल तर त्या रिपोर्टची कॉपी देण्यास आम्ही तयार आहोत. ज्या प्रायव्हेट कंपन्या आहेत, त्यांनी या रिपोर्टचा अभ्यास करावा आणि ज्या बाबीमध्ये त्यांना इंटरेस्ट असेल, त्या बाबी सबंधी त्यांनी शासनाकडे यावे त्याला मंजुरी देण्यास आम्ही तयार आहोत.

श्री.नितीन गडकरी : तो अहवाल अजून आपण मंजूर केलेला नाही असे असतांना खाजगी लोकांना बोलावून या अहवालाला आम्ही मंजुरी देऊ असे आपण कसे म्हणू शकता ?

श्री.सुरेश शेट्टी : त्यातील त्यांच्या ज्या काही चांगल्या सूचना आहेत त्या स्वीकारण्यास आम्ही तयार आहोत.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. माननीय मंत्रीमहोदय आणि माननीय राज्यमंत्रीमहोदय या दोघांच्याही भावना बरोबर आहेत. दोघांचीही अशी इच्छा आहे की, जे लोक या क्षेत्रातील कामे करण्यास पुढे येतील त्यांना ही कामे दिली गेली पाहिजेत.परंतु कामे देत असतांना टेन्डर काढलें होते काय ? असा प्रश्न येईल. त्याबाबतीत भ्रष्टाचाराचे आरोप होतील. दुसरी गोष्ट आहे की ,जी कामे प्रायवेट इनव्हेस्टर्स करण्यास तयार असतील ती कामे सरकारी बजेटमधून होतील , जी कामे प्रायव्हेट इनव्हेस्टर्स करण्यास तयार होतात ती कामे सरकार करील.त्यातून मोठा गोंधळ उडण्याची शक्यता आहे.तेव्हा याला सिक्रोनाईज करुन यातून कोणती कामे प्राव्हेट इनव्हेस्टर्सकडून होतात हे ठरविले गेले पाहिजे हा पहिला मुद्दा असून माझा दुसरा मुद्दा मी आपल्याला इलॉबरेट करतो.एखादे काम जर प्रायव्हेटमधून करणे व्हायबल होत नसेल तर त्या ठिकाणी 20 टक्के इक्वीटी देण्यात यावी.त्यातून 18 कोटी रुपयातून 100 कोटी रुपयांची कामे करता येतील. सिंधुदूर्ग जिल्हा हा येत्या तीन वर्षात देशातील पर्यटनाच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा जिल्हा होईल. या

जिल्हयात पर्यटनाच्या दृष्टीने मोठे पोटॅशिंअल आहे. त्या ठिकाणी स्वच्छ समुद्र किनारा आहे तेथील

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5064 श्री. गडकरी ...

निसर्ग सुध्दा सुंदर आहे.आज अनेक पर्यटक गोव्याला जात आहेत तेव्हा हे सर्व पर्यटक महाराष्ट्रात येतील. त्यामुळे कोकणचा विकास होईल आणि येथील तरुणांना रोजगार मिळेल.तेव्हा पर्यटनाच्या दृष्टीने विचार करीत असतांना प्रोजेक्ट टू प्रोजेक्ट असे आपल्याला सूत्र ठरवावे लागणार आहे.तेव्हा याबाबतीत शासन जो पर्यन्त धोरणात्मक निर्णय घेणार नाही.आणि 20 टक्के इक्विटी देण्याच्या बाबतीत जोपर्यन्त धोरण जाहीर करणार नाही तोपर्यन्त फारशी प्रगती होणार नाही असे मला वाटते. पर्यटन विभागाच्या अलमारीमध्ये किंवा पर्यटन विकास महामंडळाच्या अलमारीमध्ये ज्याचा इंटरनल रेट ऑफ रिटर्न 16 च्या वर आहेत असे इकोनॉमिक व्हायबल पॅकेज अनेक आहेत आणि ज्याचा एवढा रेट नसेल त्या पॅकेजच्या संदर्भात 20 टक्के इक्विटी दिले गेले पाहिजे किंवा त्याकरता काही सवलतीचे दर जाहीर करण्यात आले पाहिजे. त्याकरता टॅक्स माफ केला जाईल असे सांगण्यात आले पाहिजे. याबाबतीत अनेक उपाय सुचविण्यासारखे आहे. त्या खोलात मी जात नाही.परंतु या बाबतीत आपण सर्वागीण विकास कसा करणार आहात ? असा
माझा प्रश्न आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी या ठिकाणी जी सूचना दिली आहे ती अतिशय चांगली आहे.या रस्त्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे.महाराष्ट्रात प्रथम टयुरिझम प्रमोशन कौन्सिल माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्यामध्ये सर्व संबंधित विभागाचे मंत्री असतील तसेच एन.जी.ओ.असतील त्याचबरोबर जे लोकल टयुरिझमशी सबंधित लोक आहेत त्यांना तसेच टूर ऑपरेटर्सना कौन्सिलमध्ये घेण्यात येणार आहेत. बी.ओ.टी.तत्वावर कोणते प्रोजेक्ट आपण घेऊ शकतो तसेच इक्वीटी पार्टिसिपेशनच्या तत्वावर कोणते प्रोजेक्ट घेऊन शकतो हेसुध्दा तेथे ठरविले जाणार आहे. त्या कौन्सिलमध्ये वन विभागाचे मंत्रीसुध्दा राहणार आहेत.महाराष्ट्रामध्ये इको टयुरिझ ाम कसा डेव्हल होईल याचाही विचार केला जाणार आहे. तसेच मायनिग टयुरिझमच्या बाबतीत नवीन कनसेप्ट आला आहे त्याचाही विचार केला जाणार आहे. इतकेच नव्हेतर स्पोटर्सचा विचार केला जाणार आहे महाराष्ट्रात पिलीग्रीम सर्किट चांगले आहे तेव्हा पिलीग्रीम सर्किट आणि ॲडव्हेन्चर स्पोर्टस सर्किट या सर्वाचा विचार केला जाणार आहे जितकें सर्किटस आहेत ते सर्व सर्किटसचा विचार होणार आहे.संपूर्ण महाराष्ट्रासाठी आम्ही अशी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉलीसी करीत आहोत की, The State of Maharashtra will be converted as a forest destination not only in India but all over the World. Mr. Chairman, Sir, this is the policy of the Government of Maharashtra and we are working on that path in the right direction.

श्री.अरविंद सावंत :सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी मघाशी उत्तर देतांना असे सागितले की, 2003-2004 साली केन्द्र सरकारकडून 302 कोटी रुपये मिळालेले आहेत उत्तरामध्ये असेही सांगण्यात आलेले आहे की, "सावतवाडी येथील कामे केन्द्र शासनाच्या आर्थिक सहाय्यातून घेण्यात आली आहेत.".या बाबतीत माझा असा प्रश्न आहे की, पाच नोडल पाईन्टस कोणती आहेत ? केन्द्र सरकारकडून जे 302 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती ते पैसे वितरित करण्यात आलेले आहेत काय ? त्या पैशातून कोणती कामे हाती घेण्यात आली होती आणि कोणती कामे पूर्ण करण्यात आली होती? त्यातील काही निधी अजून शिल्लक आहे
काय ?302 कोटी रुपयापैकी अजून काही निधी यावयाचा आहे काय?.

श्री.सुरेश शेट्टी (बसून) 3.02 कोटी रुपये असा मी उल्लेख केला होता.

श्री.अरविंद सावंत :मघाशी 302 कोटी रुपये केन्द्र शासनाकडून आले होते असा आपण उल्लेख केला होता.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे चालू...) ता.प्र.क्र.5064 ...

म्हणून माझा मुलभूत प्रश्न असा आहे की, यातील पाच नोडल पॉईंटस् कोणते ? आणि केंद्र सरकारकडून किती निधी वितरित झाला आहे आणि अजून किती यावयाचा आहे ? तसेच रस्त्यांवरील सुविधांसाठी आपण काय करीत आहात ?

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी 302 कोटी असा जो उल्लेख केला आहे ते आकडा 302 लाख असा आहे. दुसरे म्हणजे सावंतवाडी येथे काय काम झाले आहे असेही त्यांनी विचारले आहे तर मी सांगू इच्छितो की, तेथे घोटी तलावाचे विकासाचे काम झालेले आहे आणि मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी, आंबोली आणि मिठबाव हे पाच नोडल पॉईंटस् आहेत.

श्रीमती सुधा जोशी : अध्यक्ष महाराज, मघाशी या ठिकाणी श्री.माधवराव सिंदिया यांचे नाव घेतले होते. श्री. माधवराव सिंदिया जेव्हा 1992 मध्ये केंद्रीय पर्यटन मंत्री होते त्यावेळेस ते सिंधुदुर्गला आले होते आणि तेव्हा श्री.सुधाकरराव नाईक हे राज्याचे मुख्यमंत्री होते. श्री.सुधाकरराव नाईक आणि महाराष्ट्रातील अन्य खासदार श्री.माधवराव सिंदिया सिंधुदुर्गला आले असताना त्यांना तेथे भेटले होते आणि त्या वेळी श्री.माधवराव सिंदिया यांनी 16 नॅशनल सर्किटस् म्हणून सिंधुदुर्गला जाहीर केले होते आणि या ज्या गोष्टी आहेत त्या राज्य सरकारच्या मागणी वरूनच करण्यात आलेल्या आहेत ही गोष्ट माननीय राज्यमंत्री महोदयांना ठाऊक आहे काय ? आणि म्हणूनच केंद्राचे पैसे आपल्याकडे येत आहेत हे आपणास माहीत आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुधाकरराव नाईक आणि केंद्रीय पर्यटन मंत्री श्री.माधवराव सिंदिया हे दोघेही आता आपल्या सोबत नाहीत तसेच त्यांची त्यावेळी जी काही चर्चा झाली ती सुद्धा मला माहिती नाही. परंतु या संबंधात जे काही रेकॉर्ड आहे ते मी आपल्याला सांगू इच्छितो. अध्यक्ष महाराज, 26.8.98 ला सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला गेला आणि त्यानंतर 9.3.1999 ला कॅबिनेटने त्याला मान्यता दिली. त्यानंतर 16.3.1999 ला हे प्रपोजल केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले. .... अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्या जे काही सांगत आहेत ती माहिती माझ्याकडे आता नाही. वाटल्यास, मी ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

..... जे 2 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5064 ...

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, माननीय राज्यमंत्र्यांनी पाच नोडल पॉईंटस् सांगितले आहेत त्यामध्ये मिटबावचा समावेश आपण केलेला आहे. परंतु कुणकेश्वर हे पर्यटन केंद्र आहे आणि त्याचा समावेश यामध्ये आहे काय आणि त्यासाठी किती निधी दिलेला आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, कुणकेश्वर मध्ये पब्लिक सेक्टर मधून 48.85 लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत.

****

..... जे 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वाल्हे (जि.पुजे) येथील स्मशा□भूमीची दुरावस्था**

**(4) * 3443 श्री. शांताराम ञरमळञर , श्री. मधुञर चव्हाज , श्रीमती ञांता □लावडे , श्री. प्रञाश शेंडजे** : स-मा-ा-ीय □ामवि□ास मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) वाल्हे (जि.पुजे) जावात दो-ा स्मशा-ाभूमी असू-ा सध्या दो-हीची दुरावस्था झाली आहे, हे जरे आहे ञाय,
(2) असल्यास, येथील स्मशा-ाभूमीतील दह-ा जाजेस मोठे जड्डे पडले असू-ा बांधञामाची पडझड झ ाली आहे, तसेच मार्जातील रस्ते जित्येञ वर्षात दुरुस्त ञेलेले -ाहीत, विद्युत दिव्यांची सोय -ाही, पाजी जिंवा -िवाऱ्याची सोय -ाही, हे जरे आहे ञाय,
(3) असल्यास, या दो-ही स्मशा-ाभूमींची दुरुस्ती ञरु-ा सर्व सोयी उपलब्ध ञरज्याबाबत शास-ा-ो जोजती ञारवाई ञेली आहे वा ञरज्यात येत आहे,
(4) अद्याप ञारवाई ञेली -ासल्यास विलंबाची ञारजे ञाय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (1) होय.
(2) होय.
(3) व (4) मुंबई ग्रामपचांयत अधि-ियम 1958 मधील तरतुदी-ुसार प्रस्तुत सोयी उपलब्ध ञरु-ा देज्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. ग्रामपंचायतीचे आर्थिञ स्थिती ञमजुवत असल्या-ो या सोयी ञरता आलेल्या -ाहीत. त्यामुळे सदर सोयी ञरज्यासाठी व योज्य त्या सुधारजा ञरज्याच्या दृष्टी-ो उपअभियंता उपविभाज सासवड ता.पुरंदर जिल्हा पुजे यांचेञडू-ा अंदाज पत्रञ तयार ञरु-ा घेवू-ा सदर ञामासाठी लाजजारी आर्थिञ तरतूद उपलब्ध ञरु-ा घेज्यासाठी ग्रामपंचायतीच्या मासिञ सभेत विषय घेज्यात येवू-ा सदर आर्थिञ तरतूद मा.जासदार,मा.आमदार,-िधी जिंवा जिल्हापरिषद -िधीतू-ा रक्ञम उपलब्ध ञरु-ा घेवू-ा स्मशा-ाभूमीच्या अडचजी सोडविज्याची ञार्यवाही जिल्हा परिषद पुजे ञडू-ा ञरज्यात येत आहे.

श्री. शांताराम करमळकर : अध्यक्ष महाराज, ग्रामसभा केव्हा होणार आहे ? आणि याचे एस्टिमेट आलेले आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, ग्रामसभा ग्रामपंचायत घेणार आहे आणि ग्रामपंचायतीने 29.3.2005 ला जिल्हा परिषदेकडे तांत्रिक मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविला आहे.

( यानंतर श्री. जागडे .... के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3443.....

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, ग्रामसभेमध्ये हा विषय घेण्यात येणार आहे काय? तसेच ग्रामसभेमध्ये काय काय ठरले आहे ?

श्री. रणजित कांबळे : पाण्याची टाकी, शेड व रस्त्याच्या दुरुस्तीबाबतचा ठराव ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये करण्यात आला. तसेच या बाबतचा प्रस्ताव तयार करुन तो जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांकडे दि. 29.3.2005 रोजी तांत्रिक मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी प्रश्न अगदी सरळ विचारण्यात आला आहे. प्रश्न असा आहे की, "दोन्ही स्मशानभूमीची दुरुस्ती करुन सर्व सोयी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे ?" स्मशानभूमीची दुरुस्ती करावयाची असेल अगर कोणतेही काम करावयाचे असेल तर त्यासाठी ग्रामसभेचा ठराव लागतो. सभापती महोदय, या ग्रामसभेची आर्थिक स्थिती चांगली नाही. त्यामुळे 11 व्या वित्त आयोगातून तसेच जिल्हा परिषदेच्या वेगळ्या फंडातून या स्मशानभूमीच्या दुरुस्तीचे काम करण्यात यावे, असे आदेश आपण जिल्हा परिषदेला देणार आहांत काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आपण ग्रामपंचायतीला कोणतेही आदेश देऊ शकत नाही. कारण ती स्वायत्त संस्था आहे. ग्रामपंचायतीने कोणती कामे करावयाची, हे त्यांनी ठरवावयाचे आहे. माननीय सदस्य श्री. फुंडकर असे म्हणत आहे की, या ग्रामपंचायतीकडे फंड नाही. मला या बाबत त्यांना सांगावयाचे आहे की, या ग्रामपंचायतीकडे आज रोजी रुपये 2,70,633 शिल्लक आहेत. जिल्हा परिषदेला स्वत:चा फंड आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेकडें या बाबतचा प्रस्ताव ग्रामपंचायत पाठवू शकते. तसेच वैधानिक विकास महामंडळाकडे या बाबतचा प्रस्ताव ग्रामपंचायत पाठवू शकते. आमदार आणि खासदारांच्या फंडातून देखील हे काम करता येऊ शकते.

श्री. पांडुरंग फुंडकर : 11 व्या वित्त आयोगामध्ये जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीचे सदस्य काम करीत असतात. त्यामुळे या स्मशानभूमीच्या दुरुस्तीचे काम 11 व्या वित्त आयोगातून करण्यात यावे, अशा प्रकारचे आदेश शासन जिल्हा परिषदेला देणार आहे काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, असे आदेश आपण देऊ शकत नाही. कारण 11व्या वित्त आयोगाचे काम 31 मार्च 2005 रोजी संपले आहे.

**सभापती :** खासदार आणि आमदार निधीचा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आला आहे. त्या दृष्टीने शासन काय करणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आम्ही मा. खासदार आणि मा. आमदारांना विनंती करु.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तरावरुन असे दिसून येते की, या स्मशानभूमीच्या दुरुस्तीच्या कामाला खूप उशीर होणार आहे. तेव्हा आता तेथील कलेवरानी जावयाचे कोठे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, त्या ठिकाणी तीन स्मशानभूमी आणि एक दफनभूमी आहे.

श्री. प्रमोद नवलकर : तेथील कलेवरानी जावयाचे कोठे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, कामाठवाडी येथे एक स्मशानभूमी आहे आणि वाल्हे गावठाण येथे मुसलमान समाजाची एक दफनभूमी आहे. सभापती महोदय, दोन्ही स्मशानभूमीमध्ये 11 व्या वित्त आयोगामार्फत काम चालू आहे.

--

( यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वैद्यजीय प्रवेशाबाबत जाजजी महाविद्यालयां□ी शासजीय जोटयातू□ प्रवेश □ दिल्याबाबत

**(5) * 2961** **प्रा. जोजेंद्र जवाडे , श्री. रमेश □जोसे** : स-मा-ा-ीय वैद्यजीय शिजज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) शैजजिज वर्ष 2004-2005 प्रवेश प्रक्रियेजरिता महाराष्ट्र शास-ा-ो संचालज वैद्यजीय शिजज व संशोध-ा मुंबई यां-ा सजम प्राधिजारी म्हजू-ा घोषित जेले हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, उक्त संचालजाजडे वैद्यजीय प्रवेशाबाबत शासजीय जोटयातू-ा जाजजी महाविद्यालयां-ी प्रवेश दिला -ासल्याच्या जिती तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत,

(3) असल्यास, त्याबाबत जाजजी महाविद्यालयावर जोजती जारवाई जरण्यात आली आहे,

(4) असल्यास, शासजीय जोटयातू-ा जाजजी महाविद्यालयां-ी प्रवेश दयावा म्हजू-ा तशा प्रजारचे आदेश संचालजां-ी जाढले आहेत जाय ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (1) होय.

(2) शासजीय जोटयातू-ा जाजजी महाविद्यालयां-ी प्रवेश दिला -ासल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या -ाहीत.

(3) व (4) प्रश्-ा उद्‌भवत -ाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन 2004-05 या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण संचालक व संशोधन, मुंबई यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले हे खरे आहे काय? या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिले आहे. परंतु दुसरा प्रश्न असा की, शासकीय कोटयातून खाजगी महाविद्यालयात प्रवेश दिल्याच्या तक्रारी आल्या आहेत हे खरे आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, उत्तरामध्ये तक्रारी आलेल्या नाहीत असे म्हटले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या वर्षी झालेल्या सीईटी परिक्षा व्दारे खाजगी महाविद्यालयातील किती सीट रिक्त राहिल्या, व त्या कशा प्रकारे भरल्या?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या संदर्भात असलेल्या काझी कमिटीच्या शिफारशीप्रमाणे सर्व खाजगी महाविद्यालयामध्ये विद्यार्थी पाठविण्याची तारीख 4 सप्टेंबर दिली होती. शासनाची सीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना चार तारखेपर्यंत प्रवेश



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

* **2961** ......

दिला पाहिजे. आणि 4 सप्टेंबर नंतर ज्या सीट रिकाम्या रहातात त्या खाजगी महाविद्याल्यांनी भराव्यात असा निर्णय काझी कमिटीने दिला. त्याप्रमाणे के.जे. सोमय्या कॉलेजमध्ये इन्टेक कॅपॅसिटी 50 सीटची होती, त्यामध्ये शासकीय कोटा 25 सीटचा होता व मॅनेजमेंट कोटा 25 सीटचा होता. त्या सर्व सीट भरण्यात आल्या. त्यानंतर महात्मा गांधी मिशन मेडिकल कॉलेज, नवी मुंबई येथे इन्टेक कोटा 50 चा होता त्यापैकी 48 सीट भरण्यात आल्या, 2 सीट रिकाम्या होत्या त्या 4 सप्टेंबर नंतर भरण्यात आल्या. तेरणा मेडिकल कॉलेजमध्ये 50 पैकी 45 सीट भरण्यात आल्या व 5 रिक्त असलेल्या सीट 4 सप्टेंबर नंतर भरल्या. त्यानंतर एम.आय. मेडिकल कॉलेज तळेगाव येथील सर्व सीट सीईटीमार्फत भरण्यात आल्या, डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेज मधील 50 पैकी 41 सीट सीईटीमार्फत भरण्यात आल्या, आणि 9 रिक्त सीट 4 सप्टेंबर नंतर भरण्यात आल्या. बाकीची माहिती मी आपल्या अनुमतीने पटलावर ठेवतो.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, शासनाचे उत्तर अत्यंत दिशाभूल करणारे आहे. महाराष्ट्रामध्ये वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी किल्ले उभे राहिले आहेत. अगदी मुंबईपासून ते नागपूर पर्यंत सर्व ठिकाणी सर्व ठिकाणाहून लोकांच्या तक्रारी आल्या आहेत. असे असतांना उत्तरामध्ये एकही तक्रार आलेली नाही असे म्हटले आहे. महात्मा गांधी विद्यामंदीर या संस्थेच्या दंत महाविद्यालयामध्ये चालू वर्षी 60 जागा होत्या, त्यापैकी 20 जागा मागासवर्गीयांसाठी राखीव होत्या. असे असतांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांना डावलून व प्रवेश प्रक्रिया नियमांचे उल्लंघन करुन प्रवेश देण्यात आला आहे. याबाबत श्री. प. रा. माटे यांनी त्यांचा मुलगा कु. स्वप्नील परमेश्वर माटे या अनुसूचित जातीतील मुलाचा प्रवेश नाकारल्याबद्दल उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्जेस दंत महाविद्यालय इमारत, कुलगुरु , महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे तक्रार सादर केल्यानंतर त्यांना न्याय न मिळाल्यामुळे त्यांनी मा.राज्यपाल श्री. मोहम्मद फजल यांच्याकडे तक्रार केली. असे असतांना छापील उत्तरामध्ये एकही तक्रार आली नाही असे शासनाने म्हटले आहे. अशाप्रकारच्या तक्रारी नागपूर, मुंबई व पुण्यातून आलेल्या आहेत. असे असतांना याठिकाणी सभागृहाची दिशाभूल करण्यात आली आहे. प्रश्न असा आहे की, मागील वर्षी डोनेशन देऊन काही मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. परंतु डोनेशन देऊ न शकल्यामुळे या विद्यार्थ्याला प्रवेश मिळालेला नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MHM पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:00

ता.प्र.क्र.2961 . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की,शासकीय नियमाप्रमाणे स्कॉलरशीपच्या बाबतीत किंवा इतर बाबतीत मागासवर्गीयांना ज्या ज्या सवलती मिळतात, त्या देण्याच्या दृष्टीने यावर्षी कमीतकमी स्पेशल जी.आर.काढून तो खाजगी शिक्षण संस्थांना देणार आहात का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी येथे आश्वासन देऊ इच्छितो की, घटनात्मकरित्या मागासवर्गीयांसाठी जे रिझर्वेशन आहे, त्याअनुषंगाने ॲडमिशनच्या संबंधात कोणतीही मालप्रॅक्टीस वापरली जात आहे असे लक्षात आले तर ते टॉलरेट करणार नाही. मग त्या कोणत्याही खाजगी संस्था असोत. त्यांच्यासंबंधात याबाबतीत काही तक्रारी आल्या तर त्वरित कारवाई केली जाईल. तसेच आम्ही यावर्षी नॉर्म्स्‌मध्ये बदल करणार आहोत. गेल्या वर्षाचे आकडेही माझ्याकडे आहे.

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : सन्माननीय सदस्य चुकीचे सांगत आहेत का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चुकीचे सांगत आहेत असे आमचे म्हणणे नाही. त्यांनी याबाबतीत काही पुरावा दिला तर आम्ही त्यासंबंधात ॲक्शन घेऊ.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थी किंवा पालक जेव्हा या संस्थांमध्ये जातात, तेव्हा पैशाची मागणी केली जाते. तेव्हा . . . .

**सभापती** : मी मघाशीच सांगितले की, प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----

. . . .एम-2

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : मी औचित्याच्या मुद्याबाबत कालच सांगितलेले आहे. अजून त्याबाबत निर्णय झालेला नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मग माझा पॉईंट ऑफ इंफर्मेशन आहे.

**सभापती** : सभागृहासमोर कोणतेही कामकाज सुरु नाही, मग पॉईंट ऑफ इंफरमेशन मांडता येणार नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, आपण मला माझ्या दालनामध्ये येऊन आपला मुद्दा सांगावा. आपण त्याबाबत चर्चा करु.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, वैधानिक विकास महामंडळाची मुदत 30 एप्रिल रोजी संपली. त्यासंदर्भात ही मुदत पुढे वाढविण्याच्या बाबतीत विधानसभेमध्ये घोषणा करण्यात आली आहे आणि कालपर्यंत ही घोषणा या सभागृहामध्ये करावयास हवी होती आणि आपणही शासनाला तशा प्रकारचे निदेश दिले होते. पण याठिकाणी काल अशा प्रकारची घोषणा झालेली नाही.

**सभापती** : मी माननीय संसदीय कामकाज मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, विधानसभेमध्ये काल वैधानिक विकास मंडळाच्या अनुषंगाने शासनाने धोरणात्मक निवेदन केलेले आहे. मी या सभागृहामध्ये कालच असे सांगितले होते की, अशा प्रकारचे निवेदन वरिष्ठ सभागृहामध्ये देखील आपण करावे. पण अद्यापि अशा प्रकारचे निवेदन या सभागृहामध्ये झालेले नाही. तेव्हा कोणत्याही परिस्थितीत शासनाने आज, लवकरात लवकर हे निवेदन करावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय.

----

. . . .एम-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादितचा सन 2002-2003 चा तेहतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.धर्मरावबाबा अत्राम(खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितचा (नागपूर) सन 2003-2004 चा तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2003-2004 चा 46 वा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

. . . . एम-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेचे सन 1982 चे पहिले ते सन 2004 चे पाचवे अधिवेशन या कालावधींमध्ये देण्यात

आलेल्या एकूण 404 आश्वासनांच्या पूर्ततेबाबतच्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्राची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

----

. . . .एम-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2004 च्या पाचव्सया अधिवेशनात दिनांक 6 डिसेंबर 2004 ते दिनांक 18 डिसेंबर 2004 या कालावधीत मंत्री महोदयांनी दिलेल्या एकूण 339 आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे..... 14:05

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मंजूर केलेले मागील वर्षाचे दोबार पेरणीचे रु. 4 कोटी 29 लाख अद्यापही वाटप न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "लिगडेर या समाजाच्या लोकांना जात पडताळणी समितीकडून प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर होत असलेला अन्याय", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावरील लक्षवेधी सूचना प्राप्त झालेली आहे, त्याबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल.

यानंतर मा.सदस्य सर्वश्री अरविंद सावंत व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 4-4-2005 रोजी विदर्भातील मेळघाट येथे लागलेल्या आगीत वन विभागाच्या शेकडो हेक्टर जमिनीवरील वन संपत्ती खाक होणे", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर मा. सदस्य श्री अनंत तरे, डॉ.अशोक मोडक व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 4-3-2005 रोजी कोकण भागात चक्रीवादळाचा तडाखा बसल्यामुळे एका मुलाचा झालेला मृत्यू व आंबा, काजू आदि पिकांचे तसेच घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर मा.सदस्या श्रीमती कांता नलावडे व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 3-4-2005 रोजी दहिवली, ता.मुरबाड गावाजवळील काळू नदीत 20 ते 25 बॅगांमध्ये जिवंत स्फोटकांचा साठा सापडणे", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, शासनाने या विषयावर निवेदन करावे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, मी 93 ची सूचना दिलेली होती, त्याचा उल्लेख झालेला नाही.

**सभापती** : इतर सर्व सन्माननीय सदस्यांच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

पृ.शी. : प्राथमिक शिक्षणाचा घसरलेला दर्जा उंचावण्यासाठी वाचन लेखन हमी कार्यक्रम राबविण्यात येणे.

मु.शी. : "प्राथमिक शिक्षणाचा घसरलेला दर्जा उंचावण्यासाठी वाचन लेखन हमी कार्यक्रम राबविण्यात येणे".याबाबत श्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री वसंत खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे यांनी "प्राथमिक शिक्षणाचा घसरलेला दर्जा उंचावण्यासाठी वाचन लेखन हमी कार्यक्रम राबविण्यात येणे".या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या विषयाची लक्षवेधी सूचना 17 मार्चला या सभागृहामध्ये चर्चेला आलेली होती. त्या अनुषंगाने अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. आज महाराष्ट्रामध्ये मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. वाचन लेखन हमी प्रकल्प कार्यक्रमांतर्गत शासनाने काही चाजक अटी लावलेल्या आहेत. या संदर्भात अनेक संघटनांनी निषेध करुन 70 ते 80 टक्के प्राथमिक शिक्षकांनी या योजनेच्या संबधाने बहिष्कार. टाकलेला आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, निवेदनाच्या पान दोन वरील तिसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की," दिनांक 01/03/2005 ते 30/04/2005 पर्यन्त लेखन, वाचन व साध्या गणितात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना शाळेच्या व्तितिरिक्तच्या वेळेत 3 तास सराव देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. असे असले तरी प्रत्येक शिक्षकाला शालेय वेळेनंतर अधिकचे तीन तास शाळेत उपस्थित रहावे लागेल, अशी वस्तुस्थिती नाही. अर्धा तास लेखन, अर्धातास वाचन व अर्धा तास गणित, यासाठी शिक्षक आलटून पालटून शिकवत होते किंवा तसे शिकवण्याची त्यांना मुभा होती." या संदर्भात प्रश्न असा आहे की, अशाप्रकारचे आदेश लेखी दिले असतील तर आपण आज किंवा उद्या ते पटलावर ठेवाल काय ?

दुसरा प्रश्न असा आहे की, "शिक्षकांना जनगणना व निवडणूक या राष्ट्रीय कार्याशिवाय दुसरी कामे देण्यात येऊ नयेत, असे आदेश देण्यात आलेले आहेत", असे म्हटलेले आहे. या संदर्भाने हे काही आदेश किंवा सूचना लेखी दिलेल्या असतील त्या देखील आपण पटलावर ठेवाल काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या सभागृहामध्ये एखाद्या विषयाबद्दल माहिती करुन घेणे हा सन्माननीय सदस्यांचा हक्क आहे परंतु लेखन वाचनाचा जो कार्यक्रम घेतलेला आहे तोच मुळात बदनाम करण्याचा प्रयत्न हे सन्माननीय सदस्य करीत आहेत हे दुर्दैव आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हा आक्षेप बरोबर नाही. हा आक्षेप आपण काढून टाकावा.

**सभापती** : मी सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांना कोणताही सार्वजनिक प्रश्न या सभागृहामध्ये विचारण्याचा हक्क आहे आणि शासनाकडून त्याचे उत्तर काढून घेण्याचा हक्क आहे. एखादा प्रश्न मला किंवा अन्य कोणाला काहीसा रुचना नाही म्हणून विशिष्ट पध्दतीने उत्तरात हेत्वारोप करणे बरोबर नाही. आपण आपले शब्द मागे घ्यावेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी माझे शब्द परत घेण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्यांनी जी नियम 93 ची सूचना दिलेली आहे त्यामध्ये आत्महत्या केल्यासंबंधीचा प्रश्न आहे आणि आता सन्माननीय सदस्य वेगळाच प्रश्न विचारत आहेत.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, आपण सांगितल्यानंतरही माननीय मंत्रिमहोदय अशा प्रकारचे उत्तर देत आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : ते शब्द मी मागे घेतलेले आहेत. राज्यातील 8 लाख 31 हजार 75 मुलांना लिहिता वाचता येत नाही म्हणून एक प्रयोग करावा यादृष्टीने हा प्रयोग सुरु केला. या प्रयोगाची सुरुवात केल्यानंतर या ठिकाणी लक्षवेधी सूचना आली. आधी आपण असे आदेश काढले की, शाळा चालू होण्यापूर्वी दीड तास आणि शाळा सुटल्यानंतर दीड तास या वेळेत, ज्या मुलांना लिहिता वाचता येत नाही त्यांना एकत्र करुन त्यांच्याकडून गिरवून घेऊन लेखन वाचन करावयाचे. त्यानंतर लक्षवेधी सूचना आल्यानंतर माननीय शिक्षण मंत्रिमहोदयांनी संघटनेशी चर्चा करुन त्या वेळेमध्ये बदल करु असे सांगितले. त्यानंतर परत शासनाने आदेश निर्गमित केले की त्यामध्ये आता सकाळी शाळा चालू होण्यापूर्वी एक तास आणि नियमित वर्ग असे मिळून सहा तासांमध्ये हा कार्यक्रम करावयाचा आहे. हा कार्यक्रम 1 मार्च ते 18 मार्चपर्यन्त चालला. नंतर 19 मार्चपासून हा कार्यक्रम आम्ही परत सुरु केला. 5 एप्रिलला सगळया परीक्षा संपत आहेत. 5 एप्रिलला परीक्षा संपल्यानंतर 6 एप्रिल ते 30 एप्रिलपर्यन्त सुट्टी असते. तोपर्यन्त जे हुशार विद्यार्थी आहेत....

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, त्यांच्या मनामध्ये या योजनेच्या बाबतीत नेमके काय आहे हे समजत नाही. माननीय मंत्रिमहोदय सुध्दा कन्फ्युज झालेले आहेत. आपण जे लेखी उत्तर दिले तेच लेखी उत्तर सर्क्युलेट केले आहे असे म्हटले आहे. त्याची कॉपी आपण सभागृहाच्या पटलावर ठेवणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : ते सभागृहाच्या पटलावर ठेवतो. परंतु आम्ही जो कार्यक्रम केलेला आहे तो सर्व सन्माननीय सदस्यांना सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. आम्ही हे पटलावर ठेऊ.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : जनगणना आणि निवडणूक या राष्ट्रीय कामाशिवाय इतर कोणतेही काम या पुढे दिले जाणार नाही असे सुध्दा या निवेदनामध्ये म्हटले आहे. यासंदर्भातील जे आदेश काढले असतील ते सुध्दा तुम्ही उद्या पटलावर ठेवणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : तेही पटलावर ठेवले जातील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहामध्ये महाराष्ट्राच्या शिक्षणाकरिता जवळजवळ एकचतुर्थांश अर्थसंकल्प खर्च होणाऱ्या विषयावर जास्तीत जास्त चर्चा होते याचा आम्हाला अधिक आनंद आहे. शिक्षकांचे हित जपले जाते ही बाब सुध्दा चांगली आहे आणि शिक्षकांच्या बारीकसारीक उणिवांकरिता शिक्षक मतदारसंघातून निवडून आलेले सन्माननीय सदस्य हिरिरीने लढतात त्याबाबतीतही आम्हाला आनंद वाटतो. कारण कधीकाळी आमच्याही काही शिक्षकांवर अन्याय झालेला असतो याची जाणीव होते. मागे सन्माननीय श्री. पाटील साहेब बसलेले आहेत. मागे आम्ही त्यांचे म्हणणे टी. व्ही. वर ऐकलेले आहे. म्हणून मी अत्यंत व्यथित अंत:करणाने या ठिकाणी उभा आहे. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रामध्ये ग्रामीण भागातील अत्यंत छोटया छोटया मुलांना शाळेमध्ये पाठविल्यानंतर माझा मुलगा मोठा होईल पण त्याला लिहायला वाचायला येईल एवढे तरी त्याने शिकले पाहिजे असे ग्रामीण भागातील अनपढ आई वडिलांची किमानपक्षी अपेक्षा असते.. महाराष्ट्रामध्ये या शिक्षकांचे हित जपण्याकरिता प्रयत्न होतो ही आनंददायी बाब असली तरी 8 लाखाच्या वर विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नसेल तर ज्या शिक्षकांमुळे हे सर्व घडलेले आहे त्या शिक्षकांच्या जबाबदारीच्या संदर्भात काय करणार आणि शासन त्यासंदर्भात कोणता निर्णय घेणार आहे ही बाब मी त्यांना विचारु इच्छितो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, काल लक्षवेधी सूचनेच्यावेळी देखील सांगितले होते की, महाराष्ट्रातील ज्या विद्यार्थ्यांना लिहिता, वाचता येत नाही त्यासंबंधी सर्वेक्षण केले होते. त्यामुळे अशा मुलांसाठी कार्यक्रम घेतला असल्याचे मी मघाशी सांगितले होते. अशा मुलांना बाजुला काढून त्यांच्याकडून गिरवून घेणे, लेखनपाठ करुन घेणे असा हा कार्यक्रम आहे. 30 एप्रिल पर्यंत आम्ही हया विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणार आहोत. यासाठी आम्ही ग्रामसभा, ग्रामशिक्षण सभा आणि पालकसभा घेतल्या असून त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे, त्याचा चांगला रिझल्ट प्राप्त झालेला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, लेखन वाचन हमी योजनेंतर्गत एक नवीन समस्या निर्माण झालेली आहे ती मी आपल्यामार्फत शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. डोंगराळ आणि दुर्गम भागामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. आता सर्व शाळा सकाळी सुरु केल्या आहेत. ही मुले सकाळी 7 वाजता येतात आणि दुपारी 1 वाजेपर्यंत असतात. त्यामुळे नवीन समस्या सुरु झाली आहे. रत्नागिरी जिल्हयातील काही लोक सभागृहाच्या बाहेर मला भेटण्यासाठी आलेले आहेत. त्यांनी असे निदर्शनास आणले आहे की, 1 एप्रिलपासून शालेय पोषण आहार योजना रत्नागिरी जिल्हयामध्ये बंद केलेली आहे. ही मुले सकाळी 7 ते दुपारी 2 वाजेपर्यंत शाळेत असतात. त्यामुळे अनेक विद्यार्थी चक्कर येऊन पडत आहेत. ही मुले सकाळी आपल्याबरोबर खाण्यासाठी काही आणत नाहीत. त्यामुळे त्यांना शालेय पोषण आहार योजनेतून खिचडी देण्याचा कार्यक्रम शासन या डोंगराळ व दुर्गम भागामध्ये चालू ठेवणार आहे काय, त्यासाठी काय उपाययोजना करणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : त्या मुलांसाठी दुपारी खिचडी देण्याचा कार्यक्रम चालू ठेवला जाईल.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, राज्यामध्ये 8 लाखाच्यावर विद्यार्थ्यांना लिहिता आणि वाचता येत नाही. ग्रामीण भागामध्ये जिल्हा परिषदेच्या आणि शहरी भागातील नगरपालिकेच्या शाळेत जाणारी मुले ही गरीब लोकांची आहेत. मध्यमवर्गीयांची व श्रीमंतांची मुले कॉन्व्हेंट शाळेमध्ये जातात. त्यांना पहिलीपासून शिकवण्या आहेत. त्यामुळे त्या मुलांचा प्रश्न नाही. परंतु शहरातील व ग्रामीण भागात राहणारे जे शेतमजूर, कामगार आहेत अशांची मुले हया

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख....

प्राथमिक शाळांमध्ये जातात. त्या शाळांमध्ये शिकत असणा-या 8 लाखाच्यावर मुलांना लिहिता, वाचता येत नाही याबाबत शिक्षण विभागाने आणि सर्वांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. मी ज्यावेळी शाळेमध्ये शिकत होतो त्यावेळी आमचे गुरुजी संध्याकाळी शाळेमध्ये आम्हाला मुक्कामाला ठेवून घेऊन अभ्यासाची तयारी करुन घेत असत. अशा परिस्थितीत शासनाने हा उपक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमासाठी इतर कार्यक्रम असतील ते तुम्ही कमी करावेत. परंतु शैक्षणिक कार्यक्रमासाठी, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी जे जे उपक्रम असतील ते शासन यापुढे करणार आहे की नाही आणि मी मा.सदस्यांनाही विनंती करीन की, शैक्षणिक उपक्रमाला पाठिंबा देण्याऐवजी आपण सरकारला नाउमेद करणार असू तर ते बरोबर होणार नाही. म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शासन हा उपक्रम करणार आहे की नाही ?

श्री.वसंत पुरके : सभापती महोदय, हया 93 च्या सूचनेचा मूळ हेतू हा होता की, हया शिक्षकांना शालेय वेळेच्या व्यतिरिक्त 3 तास जादा अध्यापनाची कामे करावी लागणार आहेत. राज्यातील 8 लाख अशिक्षित मुलांना साक्षर करण्यासाठी शासनाने ही एक नवीन योजना सुरु केली आहे. श्री.मोहन हिरुळकर या शिक्षकावर अतिरिक्त 3 तास जादा शिकवावे लागणार असल्याचे दडपण येऊन त्यांनी आत्महत्या केली हे म्हणणे बरोबर नाही आणि त्या शिक्षकाच्या मरणाचे येथे कोणीही राजकारण करु नये हे सगळयांनी मान्य केले पाहिजे. श्री.मोहन हिरुळकर हे आदिवासी भागामध्ये हिरीरीने काम करणारे शिक्षक होते. त्यांच्या मृत्यूचे कारण वेगळे आहे. त्यांच्यावर केंद्र प्रमुखांनी दबाव आणला किंवा त्यांना शिवीगाळ केल्यामुळे ते मरण पावले असे म्हणणे आहे. त्यांच्याविरुध्द आम्ही 100 टक्के कारवाई करणार आहोत.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 14:20

(प्रा. वसंत पुरके पुढे सुरु...)

शिक्षणाच्या संदर्भात जी जी माणसे मुलांचा खेळ करण्याचा प्रयत्न करतील त्यांना क्षमा केली जाणार नाही. शिक्षणाच्या संदर्भात चांगल्या योजना शासनाने हाती घेतलेल्या आहेत. त्यामध्ये काही त्रुटी असतील आणि त्या निदर्शनास आणून दिल्या तर त्या निश्चित दूर केल्या जातील.

श्री. मधुकर सरपोतदार : महाराष्ट्रातील शिक्षण हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. शिक्षकांना मुलांना शिकविण्यासाठी आणि त्यांच्यावर चांगले संस्कार करण्यासाठी पगार दिला जातो. अन्य कोणत्याही कामासाठी त्यांना पगार दिला जात नाही. कारखान्यांमध्ये काम करणा-या कामगारांच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने "नो वर्क, नो पे"असा निर्णय दिलेला आहे. मुले शाळेत जातात. त्यांना लिहिता वाचता येते की नाही हे पाहण्यासाठी तपासण्यासाठी होतात. अशा तपासण्या करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. ही जबाबदारी पार पाडली जात नसेल तर त्यांच्या बाबतीत देखील "नो वर्क, नो पे" हे धोरण राबविले पाहिजे. शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे मुलांना शिक्षण मिळत नसेल तर शिक्षकांना शासन पगार का देते ? ज्या शाळेतून रिझल्ट मिळत नाहीत त्या शाळेतील शिक्षकांना वेतन देऊ नसे अशा प्रकारची सूचना केली तर ती चुकीची ठरणार नाही. आमच्या वेळी मुले शाळेत नीट शिकत नसतील तर पहिल्यांदा पालकांना बोलावले जायचे आणि सांगितले जायचे की, तुमच्या मुलाचे अभ्यासात लक्ष नाही, त्याच्याकडे लक्ष द्या. आता तशी व्यवस्था होत नाही. शिक्षक जर आपल्या हक्कासाठी झगडतात तर मग त्यांच्या कर्तव्याच्या बाबतीत काय भूमिका घ्यायची हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

**सभापती :** मा.सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी एकत्रितपणे उत्तर द्यावे.

श्री. दिवाकर रावते : मघाशी माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नव्हते. मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाच्या उदाहरणासहीत सविस्तर प्रश्न विचारलेला आहे. शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव पाटील यांची टी.व्ही.वरील मुलाखत मी ऐकलेली आहे. त्यांनी सांगितले होते की, शासनाने निर्णय बदलला नाही तर आम्ही आंदोलन करु. शिक्षकांचे पगार कापणे शक्य नाही. ते कापले तर येथे काय होईल हे सांगता येत नाही. ज्या ज्या शाळांमधून मुलांच्या शिक्षणाचे रिझल्टस मिळालेले नाहीत अशा शाळेतील शिक्षकांची वेतनवाढ रोखली जाईल काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि मा. सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे मूल्यमापन कमिटी नेमून जे शिक्षक आपली जबाबदारी पार पाडीत नाहीत त्यांची वेतनवाढच काय पण त्यांना काढून टाकण्याबाबतही शासन विचार करील.

---

...3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : केंद्र शासनाच्या सुधारित शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या रकमेचे सुरु असलेले अनावश्यक वाटप

**मु.शी** : केंद्र शासनाच्या सुधारित शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या रकमेचे सुरु असलेले अनावश्यक वाटप याबाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी " केन्द्र शासनाच्या सुधारित शालेये पोषण आहार योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या रकमेचे सूुरु असलेले अनावश्यक वाटप" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : या शालेय पोषण आहार योजनेमध्ये भ्रष्टाचार होत आहे. अन्न शिजवण्यावरील खर्चाकरिता प्रतिविद्यार्थी प्रतिदिनी 50 पैसे एवढे अनुदान देण्यात येते. परंतु केंद्र शासनाकडून प्रति विद्यार्थी एक रुपया या प्रमाणे 139 कोटी रु. अनुदान प्राप्त झालेले आहे. ही योजना कशा प्रकारे राबवावा याची मागदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी...

आपल्या राज्याचा मागील इतिहास पाहिला तर अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना या खिचडीतून विषबाधा झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. इयत्ता 1 ली ते इयत्ता 5 वी पर्यन्त शिक्षण घेणा-या जवळपास 97 लाख विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या खिचडीमध्ये पाल आढळून आल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत. माझ्याकडे त्यासंदर्भातील पुरावे देखील उपलब्ध आहेत. काही ठिकाणी मिठाचा वापर करण्याऐवजी युरिया खताचा वापर करण्यात आलेला आहे. यामुळे अनेक ठिकाणी विषबाधेचे प्रकार या राज्यात घडलेले आहेत.

**सभापती** : मी तुम्हाला प्रश्न डेव्हलप करण्यासंबंधी सांगितलेले आहे. आपण स्पेसिफीक प्रश्न विचारा.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सध्याच्या परिस्थितीचे जे धोरण अस्तित्वात आहे. ते धोरण बदलणे गरजेचे आहे. नवी दिल्ली येथे अशा योजना चांगल्या प्रकारे राबविल्या जात आहेत. या योजनेचे सध्याचे जे धोरण आहे त्यात काही बदल करणार आहात काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना खिचडी शिजवून देण्याची योजना आहे. राज्य शासन पहिल्यांदा प्रति विद्यार्थ्यास 50 पैसे देत होते. केंद्र शासन यासाठी फक्त तांदूळ देत होते. आता केंद्र सरकारने 1 सप्टेंबर पासून प्रति विद्यार्थी 1 रुपया देण्यास सुरुवात केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांना सांगू इच्छितो की, पूर्वलक्षी प्रभावाने योजनेचा लाभ देण्यात आलेला नसून जून पासून 139 कोटी रुपये जिल्हा परिषदांना वर्ग केलेले आहेत. ही योजना राबविताना अन्न शिजविण्यासाठी किचन सेट, एल.पी.जी.गॅस स्टोव्ह, अन्न शिजविण्यासाठी भांडी ही योजना राबविण्यासाठी अस्तिवात असलेल्या शिक्षण समित्या, तसेच नव्याने गठीत करण्यात आलेल्या शिक्षण समिती असा एकूण प्लॅन केंद्र शासनाला सादर करावयाचा आहे. त्याप्रमाणे पैसे योजना राबविण्यासाठी पैसे उपलब्ध करुन देणार आहोत. त्यामध्ये आम्ही सांगितले की, अन्न शिजविण्यासाठी महिला बचत गटांना प्राधान्य द्यावे. महिला बचत गट पुढे येणार नसतील तर वेगळा खानसामा नेमावा. हे आम्ही पूर्वलक्षी प्रभावाने देणार नाही. प्रति विद्यार्थी दीड रुपया प्रमाणे अनुदान उपलब्ध करुन देणार आहोत.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मुळात मंत्री महोदयांना मला असे विचारावयाचे आहे की, पान क्रमांक 2 मधील खालच्या ओळीत म्हटले आहे की, केंद्र शासनाने अन्न शिजविण्याच्या प्रक्रियेसाठी प्रति विद्यार्थी, प्रतिदिन 1 रुपया अनुदान 1 सप्टेंबर, 2004 पासून देण्याचे मान्य केले आहे. किती तारखेस मान्य केले आहे याची तारीख आपण सांगू शकाल काय ? माननीय मंत्री महोदय, मी मुद्दाम आपण तारीख विचारु इच्छितो. त्यामागचे कारण असे आहे की, नियम 93 च्या निवेदनातील रोख हा पूर्वलक्षी प्रभावावर या शब्दावर आहे. समजा या योजनेमध्ये काही भ्रष्टाचार झाला असेल तो शोधण्याचा आमचा प्रयत्न आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हा दिनांक सांगितला तर बरे होईल ?

श्री. हसन मुश्रीफ : 1 सप्टेंबर पासून आमच्याकडे निधी प्राप्त झालेला आहे. आम्ही पूर्वलक्षी प्रभावाने फायदा देणार नाही. परंतु...

डॉ. अशोक मोडक : आपल्याकडे 1 सप्टेंबर पासून निधी उपलब्ध झालेला आहे. आपण या संबंधीचा जो कायदा केला आहे त्याचा उल्लेख निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 3 वर दिलेला आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचे वितरण दिनांक 31 मार्च, 2005 च्या शासन निर्णयान्वये फक्त जिल्हा परिषदांना वितरित करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, केंद्र शासनाचे अनुदान आपल्याला 1 सप्टेंबर, 2004 पासून उपलब्ध झालेले आहे. तर शासन निर्णय 31 मार्च, 2005 ला करण्याचे कारण काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : दिनांक 6.10.05 रोजी केंद्र शासनाच्या पत्राने मान्यतेसंबंधी कळविण्यात आले. केंद्र शासनाचा निधी आता आम्हाला प्राप्त झालेला आहे. आम्ही प्रति विद्यार्थी अन्न शिजविण्यासाठी 50 पैसे देत होतो. आता प्रति विद्यार्थ्यांवर दीड रुपया जून महिन्यापासून देण्यात येणार आहे.

डॉ. अशोक मोडक : हा विषय अतिशय गंभीर आहे. माझ्या एका प्रश्नाचे उत्तर अजून आलेले नाही. आपली मागची रक्कम व्यपगत झाली काय ? महाराष्ट्र शासनाने निर्णय पारीत केला तो 31 मार्च या तारखेचा मुहूर्त का काढला ?

यानंतर श्री. कानडे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना ...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, केंद्र शासनाकडून आता पैसे प्राप्त झाले. मी आता खुलासा केलेला आहे की हे पैसे म्हणजे 1.50 रु.प्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने देणार नाही. 1 जून पासून देणार आहोत. रक्कम व्यपगत झालेली नाही.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, शहरी विभागामध्ये अंगणवाडया आहेत.कोल्हापूर,सोलापूर,मुंबई सगळयाच ठिकाणी आहेत. याठिकाणी नवीन प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. गेल्या वर्षी टेंडर मागितली होती. त्याचा निर्णय अजून झाला नाही. पिरेड लॅप्स् झालेला आहे. शहरी भागात ब्रेंड देत होते त्याऐवजी खिचडी प्रपोज केली. मंत्रिमंडळाचा निर्णय झाला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवस ब्रेड आणि तीन दिवस खिचडी देण्याबाबतची योजना लागू करण्यात आली होती. ही योजना शहरी विभागातील विद्यार्थ्यांसाठी शासन लागू करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, महानगरपालिका,नगरपरिषदा आणि जिल्हा परिषदा यांच्या अंशत: अनुदानित आणि अनुदानित या सगळयांना ही योजना सुरु आहे.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय,यामध्ये असे दिलेले आहे की,केंद्र शासनाने योजनांतर्गत मंजूर केलेले अनुदान विद्यार्थ्यांना अन्न शिजविण्यासाठी त्यातून अनुदान शिल्लक राहिल्यास किचन शेड इ. सुविधा पुरविण्यात येतील असे म्हटले आहे. त्यानंतर शाळेच्या इमारतीपासून 100 फूट दूर ठेवणे ही सुध्दा अट आहे. शाळेच्या आवारामध्ये व्यवस्था होऊ शकणार नाही तर शासनाने स्वतंत्र व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मध्यंतरी तामिळनाडू राज्यातील कुंभकोण येथे 16 जुलै 2004 मध्ये जी घटना झाली होती त्यामुळे आपण हा नियम केला. शाळेच्या आवारातच ते राहील . परंतु शाळेच्या आवारातच ही व्यवस्था केली जाईल त्यांची हरकत असेल तर दुसरीकडे व्यवस्था केली जाईल. सुरक्षित रहावे म्हणून ही व्यवस्था केलेली आहे.

---

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर विद्यापीठात विद्यार्थ्यांना नियमबाहय प्रवेश देणेबाबत

**मु.शी.**: नागपूर विद्यापीठात विद्यार्थ्यांना नियमबाहय प्रवेश देण्याबाबत सर्वश्री रामनाथ मोते,श्रीमती संजीवनी रायकर,डॉ.अशोक मोडक सर्वश्री प्रतापराव सोनवणे,व्ही.डी.खोटरे,नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे व व्ही.यु.डायगव्हाणे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके (शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते,श्रीमती संजीवनी रायकर,सर्वश्री डॉ.अशोक मोडक,प्रतापराव सोनवणे,व्ही.डी.खोटरे,नानासाहेब बोरस्ते,जी.एल.ऐनापुरे व व्ही.यु.डायगव्हाणे यांनी नागपूर विद्यापीठात विद्यार्थ्यांना नियमबाहय प्रवेश देणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, नागपूर विद्यापीठामध्ये बेकायदेशीर पध्दतीने आणि नियमबाहय रीतीने विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आणि अशा अवैध प्रवेशांना प्रोटेक्शन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. नियमबाहय पध्दतीने जे विद्यार्थी बीपीएड परीक्षेसाठी पात्र नव्हते अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्याची विद्यापीठाने परवानगी दिली. हे विद्यार्थी परप्रांतीय होते आणि कोणत्याही अटी पूर्ण करीत नव्हते. असे असताना परीक्षेला बसण्याची परवानगी कशी काय दिली ? यापूर्वीही अशा प्रकारे नियमबाहय पध्दतीने विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता काय ? या प्रकरणात न्यायालयाने निर्णय दिल्यानंतरच परीक्षेला बसण्याची परवानगी दिली होती ? याबाबतीत विद्यापीठाने आणि शासनाने काळजी का घेतली नाही ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या विद्यार्थ्यांची अपेक्षित गुणवत्ता जे काही नियम विद्यापीठाने घालून दिलेले आहेत त्याच नियमानुसार त्यांचे प्रवेश होणे क्रमप्राप्त होते. परंतु काही कॉलेजना इंग्रजी विषय नागपूर विद्यापीठाने सक्तीचा मान्य केल्यानंतरही ज्या संविधानिक विद्यापीठाचे पदवी धारण करताना पाहणे गरजेचे होते ते पाहिले गेले नाही परिणामी 115 विद्यार्थी हे बेकायदेशीरपणे परीक्षेला बसले.

यांनतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ...

संबंधित विद्यार्थ्यांची दखल घेणे हे शासनाचे काम होते तसेच विद्यापीठाचे व. स्पोर्टस डिपार्टमेन्टचेसुध्दा काम होते.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय,या सदर्भात प्रशासनाकडून विशेषत: क्रीडा व युवक सेवा संचालकाकडून एक परिपत्रक पाठविलेले होते. सर्वच विद्यापीठासमोर हा प्रश्न आहे व हा प्रश्न काय आहे हे मी आपल्याला सांगतो. दिनांक.14 सप्टेंबर 2004 रोजी क्रीडा संचालनालयांने एक परिपत्रक पाठविले होते.त्यात असे म्हटले होते की ,"सामायिक प्रवेश परीक्षा घेऊन संचालनालयामार्फत प्रवेश देण्यात आलेल्या व महाविद्यालयामार्फत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची यादी संचालनालयामार्फत संबंधित विद्यापीठाकडे पाठविण्यात येणार आहे.त्यामुळे महाविद्यालयाने दिलेल्या प्रवेशास संचालनालयाची मान्यता असणे आवश्यक आहे. त्या संदर्भात महाविद्यालयांनी काही कसूर केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी त्या महाविद्यालयांवर राहील."हे संचालनालयाने परिपत्रक काढले होते. परीक्षा जवळ आलेल्या असतांनासुध्दा यादी आली नाही.त्यासंदर्भात ही परिस्थिती खरी आहे काय असा मी प्रश्न विचारणार आहे आणि ही परिस्थिती खरी आहे अशी माझी माहिती आहे.परीक्षा मार्च महिन्यात असतांना यादी मात्र एप्रिल महिन्यामध्ये आली होती. सर्वच विद्यापीठामध्ये हा प्रश्न निर्माण झाला होता. नागपूरच्या संदर्भातील प्रश्न येथे मांडण्यात आला मात्र बाकीच्या विद्यापीठांचा प्रश्न येथे मांडण्यात आला नाही.विद्यापीठासमोर हा प्रश्न असा असतो की अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला आणि महाविद्यालयांनी त्यांना परीक्षेला बसविले होते परंतु यादी अजून यावयाची आहे .त्यामुळे या बाबतीत विद्यापीठाने एक निर्णय मागच्यावेळीसुध्दा घेतला होता व तो निर्णय कोर्टात कायम टीकला होता. त्यानुसार या वेळीसुध्दा असा निर्णय घेण्यात आला होता की, या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू देण्यात यावे.नंतर इलिजिबिलीटी पाहण्यात येईल. जे विद्यार्थी लायक नाहीत त्यांना रिजेक्ट करण्यात येईल.परंतु एखादा लायक विद्यार्थी जर रिजेक्ट झाला तर मग त्याची पुन्हा परीक्षा घेता येणार नाही.याबाबतीत मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. परीक्षा सुरु झाल्यावर ही यादी संचालनालयाकडून पाठविण्यात आली होती .पत्रावर 23.3.2005 अशी तारीख असली तरी विद्यापीठाला 2 एप्रिल 2005 रोजी पत्र मिळाले होते. त्या अगोदरच परीक्षा सुरु झाली होती ही गोष्ट खरी आहे काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ..

.आणि जर ही गोष्ट खरी असेल तर ही परीक्षा सुरु होण्याच्या एक महिना अगोदर ही यादी पाठविण्यात आली पाहिजे अशी सक्त ताकीद त्यांना देण्यात येईल काय ?.त्याचबरोबर मागच्या वर्षी हायकोर्टाने असे म्हटले होते की] विद्यापीठाने जे केले होते ते बरोबर आहे.हायकोर्टाने मागच्या वेळी जो निर्णय दिला होता त्याची प्रत माझ्याकडे आहे.विद्यार्थी पात्र आहेत किंवा नाहीत हे ठरविण्याची संधी मिळाली नाही म्हणून महाविद्यालयांनी त्यांना परीक्षेला बसू दिले होते परतु जे विद्यार्थी पात्र नव्हते त्यांना डिसक्वालिफाय केले आणि त्यांचे रिझल्टस जाहीर केले नाहीत. ही कृती हायकोर्टाने व्हॅलीड ठरवली होती.ही गोष्ट खरी आहे काय ? क्रीडा संचालनालयाला सक्त ताकीद दिली पाहिजे की परीक्षा सुरु होण्याच्या अगोदर एक महिना ती यादी पाठविण्यात आली पाहिजे. तेव्हा या संबंधीची काळजी घेण्यात येणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदय, विद्यार्थ्यांची परीक्षा प्रक्रिया सुरु होण्यापूर्वीच विद्यापीठाने परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांची दखल घेतली किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी निश्चितच क्रीडा खात्याची होती. भविष्यात अशी घटना घडणार नाही याची मी आपल्याला ग्वाही देतो.जे विद्यार्थी परीक्षेला बसलेले आहेत परंतु त्यांचे भवितव्य अंध:कारमय असू नये यासाठी जे त्यांच्या बाबतीत नियमानुसार निर्णय घेतला जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : ज्यांनी गंभीर स्वरुपाच्या चुका केलेल्या आहेत त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे.या ठिकाणी या विद्यार्थ्यांना कसा प्रवेश देण्यात आला आहे याबाबतीत मी आपल्याला थोडक्यात सांगतो.त्याना प्रवेश मिळणार नाही असे सांगितल्यानंतर खाजगी महाविद्यालयांमधील संख्या मात्र नगण्य होती व ही महाविद्यालये बंद करावयाची काय अशी पृच्छा करीत संस्था संचालकांनी क्रीडा संचालकाकडे व क्रीडा सचिवांकडे धाव घेतली होती.शासनाने त्यांना बेकायदेशीर प्रवेश करावयाला परवानगी दिली.तुमच्या कडे कोणी येईल आणि सांगेल काय की ," आम्ही एवढया इमारती बांधल्या आहेत,आमचे विद्यापीठ कसे चालेल तेव्हा आमचा धंदा आम्ही कसा करावयाचा ? हा काही धंदा आहे काय ? हे सर्व विद्यार्थी परप्रांतीय आहेत आणि या सर्व शारीरिक शिक्षणातील परप्रांतीय विद्यार्थ्यांनी याच मुद्यावर गत वर्षी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.त्यावेळी नागपूरच्या खंड पीठाने त्यांच्याविरुध्द आदेश देत इंग्रजी शिवाय कोणतीही पदवी मिळणार नाही असे बजावले होते .असे असतांना तुम्ही या विद्यार्थ्यांना प्रवेश का दिला?

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

निवेदनात परस्पर विसंगत असे उत्तर दिलेले आहे. तेथे असे म्हटलेले आहे की,परंतु ही अट संबंधित महाविद्यालयाच्या स्तरावर पालन केली गेली नाही याबाबतीत आवश्यक ती चौकशी करुन सबंधित महाविद्यालयावर आवश्यक ती कारवाई केली जाणार आहे.शेवटी असे म्हटलेले आह
की," आमच्याकडे कोठलीही तक्रार आलेली नाही. ".तक्रार जर आलेली नाही तर संबंधित महाविद्यालयाच्या विरुध्द कारवाई करण्याचे आपण का ठरविले आहे ?. उच्च न्यायालयाच्या नागपूरच्या खंड पीठाने गेल्या वर्षी आदेश दिलेले असतांना 500 विद्यार्थ्यांना प्रवेश का दिला ?या शिक्षण संस्था चालकाच्या विरुध्द कोणती कारवाई करणार आहात ?

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : अध्यक्ष महाराज, या विद्यार्थ्यांना प्रवेश का दिला हे या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनीच स्पष्ट केलेले आहे. त्यांच्या इलिजिबिलिटीच्या संदर्भात आपण नंतर विचार करावा असेही सांगण्यात आले. पण जे पात्र विद्यार्थी असतील की जे परीक्षेपासून वंचित राहिले असते त्यांचेही नुकसान होऊ नये म्हणूनच त्यांना प्रवेश दिला गेला. परंतु इंग्रजीशिवाय जे विद्यार्थी परीक्षेला बसले असतील त्यांचे निकाल निश्चितपणे दिले जाणार नाहीत. त्यानंतर आपला दुसरा प्रश्न हा आहे की, या संस्थांवर आपण काय कारवाई करणार आहात ? तर मी त्याबाबत आपणास सांगू इच्छितो की, आपण येथे हे नम्रपणे मान्य केले पाहिजे की, या कॉलेजेसवर कारवाई करण्यापूर्वी माझ्या खात्याने ही बाब अत्यंत गांभीर्याने घेणे गरजेचे आहे आणि म्हणूनच या 96 कॉलेजेसवर आम्ही निश्चितपणे कारवाई करू परंतु तत्पूर्वी आमच्या खात्याकडून अशा बाबतीत काही दिरंगाई होत असेल तर त्याबाबत देखील निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. जी.एल. ऐनापुरे : अध्यक्ष महाराज, बीपीएड विद्यार्थी आणि कॉलेजांबाबतचा हा प्रश्न गंभीर आहे. या संदर्भात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला आहे की, सीइटीशिवाय प्रवेश द्यायचा नाही. असे असतानाही मॅनेजमेंट कोट्यातून 500 विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाने प्रवेश दिलेला आहे. इतकेच नाही तर बी.एड.च्या बाबतीत देखील त्यांनी असेच प्रवेश दिलेले आहेत. मात्र या संबंधात महाविद्यालये स्वत:हून काही करीत नाहीत. विद्यापीठामध्येच आणि शासनामध्येच असे प्रतिनिधी बसलेले आहेत की त्यांच्या संमतीशिवाय हे होत नाही. नागपूर विद्यापीठामध्ये तर असे एक रॅकेटच आहे. बीएड आणि बीपीएड प्रवेशासंबंधात. अध्यक्ष महाराज, आज बीपीएड संबंधात तर परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्या कॉलेजांचीही परिस्थिती अत्यंत वाईट आहे. कारण नोकऱ्या नाहीत म्हणून कोणी येत नाहीत. मागून आणावे लागतात पण तरीही त्यांना सीइटी बंधनकारक आहे. तेव्हा मी प्रश्न असा विचारू इच्छितो की, नागपूर विद्यापीठातील या संपूर्ण रॅकेटची एक सदस्य नेमून खास चौकशी आपण करणार का ? केवळ बीपीएडच नाही तर बीएड संबंधात देखील ही चौकशी होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अशी जी महाविद्यालये चालतात ती चालू राहावित यासाठी सुप्रीम कोर्टाकडून स्पेशन परवानगी घेऊन सीइटी मधून बीपीएड कॉलेजेस काढणार का ?

प्रा. वसंत पुरके : अध्यक्ष महाराज, मुळात हा बीपीएड हा अभ्यासक्रमच कालबाह्य आहे. बीपीएड्ची इन्टेक कपॅसिटी खूप असताना देखील मुले याकडे येत नाहीत आणि बीएड ला नंबर

.... यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लागत नाही म्हणून मुले मजबुरीने इकडे येतात. म्हणून या संदर्भात, बीएडच्या संदर्भात मला सांगता येणार नाही., पण या बाबतीत रॅकेट आहे असे जे आपले म्हणणे आहे तर त्याबाबत आपण चौकशी करू आणि त्यांचेवर कारवाई करू.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, 2004-05 मध्ये ही सीइटी पध्दती आली. खरे म्हणजे नागपूर विद्यापीठाने 2140 पैकी केवळ सीइटीच्या माध्यमातून 406 जणांना प्रवेश दिला. बाकीचे सगळे अनधिकृत आहेत. 115 इंग्रजी विषय नसलेल्या पदवीधरांना प्रवेश दिला, ते परप्रांतातील आहेत. आणि इंग्रजीशिवाय प्रवेश देऊ नये असा हायकोर्टाचा निर्णय होता. असे असतानाही ही यादी क्रीडा संचालकांकडून ॲप्रूव्ह होऊन आली कशी ? म्हणून त्या अधिकाऱ्यावर प्रथम कारवाई होणे आवश्यक आहे. एवढा मोठा अधिकारी असताना त्याला हायकोर्टाचा निर्णय वाचता येत नाही, माहिती नाही का ? म्हणून सन्माननीय सदस्य श्री.ऐनापुरे यांनी जी सूचना केली आहे की, या संदर्भात उच्च स्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे आणि त्यात तो क्रीडा संचालक आणि हे मॅनेजमेंट .. ज्यांच्या माध्यमाने हे सारे घडलेले आहे या दोघांचीही उच्च स्तरीय चौकशी एक महिन्याच्या आत केली जाईल काय ?

प्रा. वसंत पुरके : अध्यक्ष महाराज, येथे कुणालाही पाठीशी घातले जाणार नाही. मग शिक्षण संस्था कोणाची आहे हेही पाहिले जाणार नाही. क्रीडा संचालक आणि कॉलेजेस्, ज्यांच्या कडून हा प्रमाद घडला असेल त्यांच्या बाबतीत निश्चितच आम्ही एक व्यक्तीची समिती गठित करू.

प्रा.बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, मागील वर्षी हायकोर्टाने निर्णय दिला की विद्यापीठाच्या या ज्या पात्रतेच्या अटी आहेत त्या बरोबर आहेत. विद्यार्थ्यांना प्रोव्हिजनली परीक्षेला बसू दिले होते आणि त्यावेळेस त्यांच्याकडून लिहून घेतले होते की पात्रता नसेल तर डिस्क्वालिफाय केले जाईल म्हणून. हे सारे माहीत असतानाही क्रीडा संचालनालयाने ही यादी उशीरा का म्हणून पाठविली ? हे एवढे मोठे वर्ग 1 चे अधिकारी असताना त्यांनी हे विद्यार्थी पात्र आहेत का नाहीत याची खात्री करून हे पाठवावयास नको का ? का मुलांच्या जीवाशी खेळ खेळत रहावयाचे ? म्हणून माझा नेमका प्रश्न असा आहे की, क्रीडा संचालनालयाकडून पात्रतेच्या अटी न तपासता नागपूर विद्यापीठाकडे ही मुलांची यादी कशी आणि का गेली याची चौकशी आपण कराल काय ?



अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : अध्यक्ष महाराज, मी सुरूवातीलाच मान्य केल्याप्रमाणे ही बाब क्रीडा खात्यानेच तपासून पहावयास पाहिजे होती की ज्यातून मुलांचे नुकसान होऊ नये. म्हणून हे तपासून त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

*****

..... यू 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सोलापूर प्राणीसंग्रहालयातील 29 हरणांचा एकाच वेळी झालेला अकस्मात मृत्यू.

**मु.शी.** : सोलापूर प्राणीसंग्रहालयातील 29 हरणांचा एकाच वेळी झालेला अकस्मात मृत्यू याबाबत श्री.कन्हैयालाल गिडवानी, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयंत पाटील व श्री.अनंत तरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

---

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवानी, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयंत पाटील व श्री.अनंत तरे यांनी " सोलापूर प्राणीसंग्रहालयातील 29 हरणांचा एकाच वेळी झालेला अकस्मात मृत्यू " याबाबत जी नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. .. )

....... यू 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खाली मा.नगरविकास मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री.कन्हैयालाल गिडवानी : अध्यक्ष महाराज, सोलापूर महानगरपालिकेच्या प्राणी संग्रहालयातील जवळपास 29 हरणांचा एकाच रात्री मृत्यू झालेला आहे ही गंभीर अशी घटना आहे. निवेदनात या संदर्भात म्हटले आहे की, याबाबत चौकशी केली आहे, निलंबन केलेले आहे. परंतु हा इतका छोटा प्रश्न नाही की, या प्रकरणी एक दोघांना निलंबित करून प्रश्न सुटणार आहे. खरे तर या प्रकरणी न्यायालयीन चौकशी करण्याची गरज आहे. कारण यामध्ये निष्काळजीपणा होणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे. तेव्हा तशी न्यायालयीन चौकशी आपण करणार आहात काय ?

( यानंतर श्री.जागडे ...व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MHM/ SBT/ 14:45

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. दि. 28.3.2005 रोजी घटना घडली आहे. सहाय्यक आयुक्त यांनी याची चौकशी केली आहे. त्यांचे पोस्ट मार्टेम करण्यात आले आहे. व्हिसेरा हा तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. दोन दिवसात पोस्ट मार्टेम रिपोर्ट आणि व्हिसेराचा रिपोर्ट येईल. त्या अनुषंगाने नंतर पुढील कारवाई करण्यात येईल. या ठिकाणी पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. सुहास लांडगे व रखवालदार मल्लिनाथ चनबसप्पा पाटील यांना निलंबित केले आहे. यामध्ये योग्य प्रकारची कारवाई करण्यात आली आहे. माननीय सदस्य श्री.गिडवाणी यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पोस्ट मार्टेम रिपोर्ट आणि व्हिसेराचा रिपोर्ट आल्यानंतर या बाबत कारवाई करण्यात येणार आहे. या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हे दोन्ही रिपोर्ट यावयाचे आहेत. त्या बाबतची माहिती आज उपलब्ध नाही. दोन दिवसात हे दोन्ही रिपोर्ट येणार आहेत. न्यायालयीन चौकशी दोन महिन्यात पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्राणी संग्रहालयातील 26 हरणे मृत्यूमुखी पडली आहेत. यामुळे डॉ. लांडगे आणि रखवालदार श्री. पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच तेथील उद्यान अधिक्षक श्री. म्हैत्रस यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे. आता त्या ठिकाणी इनचार्ज कोण आहे ? आता त्या प्राणी संग्रहालयात असणा-या प्राणांच्या रक्षणाची जबाबदारी कोणावर टाकली आहे ? हे काम कोण पाहणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्राणी संग्रहालयात प्राणी आणि पक्षी यांची संख्या 88 आहे. हरणे 44, माकडे 32, कोल्हा 1, वाघ 1, सिंह 1, बिबटा 1, मोर 3 इ. प्राणी आणि पक्षी या ठिकाणी आहेत. सभापती महोदय, या प्राणी संग्रहालयातील अधिकारी आणि कर्मचा-यांची एकूण संख्या 26 आहे. सभापती महोदय, सहाय्यक आयुक्तांच्या अहवालावरुन या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. इतरही दुसरी कारवाई होणार आहे ?

श्री. दिवाकर रावते : आता त्या ठिकाणी आपण जबाबदार कोणाला धरणार आहे ? त्या ठिकाणी आता इनचार्ज कोण आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या बाबतची आता माहिती नाही.

-- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी** . : मौजे रहाटी येथील पूर्णा नदीवरील कोल्हापूर बंधा-याचे बांधकाम.

**मु. शी** . : मौजे रहाटी येथील पूर्णा नदीवरील कोल्हापूर बंधा-याचे बांधकाम या बाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( जलसंधारण राज्यमंत्री) : अध्य□ महोदय, श्री. दिवाकर रावते यांि□ मौजे रहाटी येथील पूर्णा नदीवरील कोल्हापूर बंधा-याचे बांधकाम .या विषयावर ि□यम 93 अ□्वये जी सूच□ा दिली होती, तिला अ□ुल□ू□. आप□ ि□देश दिल्याप्रमा□ मला ि□वेद□ □रावयाचे आहे. ि□वेद□ाच्या प्रती सदस्यां□ा अ□ोदरच वितरीत □ेलेल्या असल्या□ मी हे ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

ि□वेद□

( प्रेस : येथे सोबतचे ि□वेद□ छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय परभणी शहराला पाणी पुरवठा व्हावा, म्हणून हा बंधारा बांधला होता. हा बंधारा फुटला आहे. त्यानंतर या बाबतची चौकशी करण्यात आली आहे. याबाबतच्या चौकशीचा अहवाल शासनाकडे आता आहे. त्या बाबत काय झाले आहे ? कोणावर आणि कोणत्या प्रकारची कारवाई झाली आहे ? चौकशी अहवालामध्ये अनेक कारणे दिले आहेत. हा बंधारा पुन्हा बांधण्यासाठी कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात आली आहे ? सभापती महोदय, निवेदनात असे म्हटले आहे की, " दि. 14.3.2005 अन्वये एकूण रुपये 79,01,381 एवढ्या निविदा किंमतीस मंजूरी दिली आहे. "

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सदर कामाची सुरुवात एप्रिल 2005 मध्ये करण्यात येणार आहे असे आपण म्हणत आहात. एप्रिल महिन्याचा पहिला आठवडा सुरु आहे. तेव्हा या कामाची सुरुवात झाली आहे काय? नसेल तर ती कां झाली नाही? ती केव्हा होणार आहे?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या कामाची सुरुवात दिनांक 9 एप्रिल रोजी गुढी पाडव्याच्या शुभदिनी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जर होकार दिला तर त्यांच्या शुभहस्ते करणार आहोत.

श्री. दिवाकर रावते :आपण त्यासाठी ठेकेदार नेमला आहे कां?

डॉ. सुनील देशमुख : आपण जर होकार दिला तर आपल्या हस्ते कामाचा शुभारंभ होईल.

----

**नियम 93 च्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : निवेदन क्रमांक 6 व 7 च्या संदर्भात माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपण काही कामानिमित्त बाहेर जात असल्यामुळे ही निवेदने उद्या घेण्यात यावीत अशी विनंती केली आहे. त्यानुसार ही दोन्ही निवेदने उद्या घेण्यात येतील.

श्री. दिलीप वळसे पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, प्रत्येक दिवशी तीन निवेदने घेण्याचे ठरले होते.परंतु आता निवेदनांची संख्या वाढत चालली आहे.

**सभापती** : आज आपण सहा निवेदने घेतली आहेत. हे प्रमाण कमी कमी होत जाईल अशी अपेक्षा करु या.

**(सभापतीस्थानी मा.उपसभापती)**

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना**

पृ. शी. : मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस होत असलेल्या वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण होणारी वाहतुकीची कोंडी.

मु. शी : मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस होत असलेल्या वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण होणारी वाहतुकीची कोंडी यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृह. मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस होणारी वाहनांची वाढ, त्यामुळे निर्माणहोणारी वाहतुकीची कोंडी, रस्त्यावर बेकायदेशीरपणे होणारे गाडयांचे पार्कींग, त्यावर मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेने घेतलेली बघ्याची भूमिका, वाहतूक शाखेतील संबंधित शिपाई व अधिकारी यांचे खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बस चालकाकडे होणारे दुर्लक्ष, तसेच रहदारीच्यारस्त्यावर प्रितम हॉटेल ते दादर पोष्ट ऑफीस, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर (प) या ठिकाणी असणारे पदपथावरील बेकायदेशीर स्टॉल्स व फेरीवाले याकडे हेतुपुरस्सर पोलिसांचे व महापालिकेचे होणारे दुर्लक्ष, खाजगी प्रवासी बसेसना उभी करण्यास दिलेली अनधिकृत परवानगी व त्यामुळे निर्माण झालेली वाहतुकीची कोंडी, त्यामुळे आबालवृध्द पादचाऱ्यांना पदपथावरुन चालतांना होणारी गैरसोय, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे जनतेच्या मनामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शासनाने दिलेले निवेदन स्पष्ट नाही. आपण आपल्या स्थानावरुन निदेश दिले असतांना वितरीत करण्यात आलेल्या निवेदनामध्ये सर्व गोष्टींचा अंतर्भाव झ ाालेला नाही.

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी पहिल्यांदा मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. मंत्रिमहोदयांनी त्वरीत दखल घेऊन दादर परिसरातील वहातुकीची कोंडी दूर केली आहे. आपण गेल्या वेळी अधिवेशन काळात कायम स्वरुपी आदेश दिल्यानंतर आणि दुसरे असे की, त्या ठिकाणी बेकायदेशीर स्टॉल आहेत ते आजही चालू आहेत. त्यांच्या बाबत आपण कोणती कारवाई करणार आहात? शेवटच्या परिच्छेदामध्ये वहातूक सुरळीत होण्यासाठी आपण अनेक उपाय सुचविले आहेत. तेथील वहातुकीची कोंडी फोडून वहातूक सुरळीत होण्यासाठी आपण दीर्घकालीन उपाययोजना कशाप्रकारे करणार आहात? सदरहू कारवाई आपण 7-8 दिवसात करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण व मी स्वत: जाऊन त्या जागेची पहाणी केली. दादर पूर्व आणि पश्चिम भागातील कोहिनूर मिलपर्यंतच्या रस्त्याची पहाणी केली. त्या पहाणीनंतर खाजगी लक्झरी बसेस त्या ठिकाणी थांबू नयेत व उड्डाण पूलावरुन जाव्यात याकरिता नोटिफिकेशन काढण्यात आले आहे.

.... ....

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन विलंबाने होणे.

**मु.शी.**: महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन विलंबाने होणे या संबंधी माननीय सदस्य सर्वश्री प्रा. बी. टी. देशमुज, सर्वश्री व्ही.यु. डायज्व्हाजे, वसंतराव जोटरे, -ाानासाहेब बोरस्ते, जी.एल. अै-ाापूरे य्ानी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ाुमती-ो नियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ाी -िावेद-ा ज्रावे, अशी वि-ांती ज्रतो.

"महाराष्ट्रातील शेज्डो महाविद्यालयांमध्ये अ-ोज महि-यांचे पजार विलंबा-ो होजे, 19 महि-याच्या महाजाई भत्त्याच्या वाढीची रज्जम भविष्य-िर्वाह निधीमध्ये जमा -ा होजे, शास-ा निर्जय निर्जमित होऊ-ासुध्दा महाजाई भत्त्याच्या 50 टज्जे भाज मूळ वेत-ाात समाविष्ट ज्रज्याची जारवाई पूर्ज होज्यास होत असलेला अजम्य विलंब, तात्पुरत्या, अस्थायी व पार्टटाईम अधिव्याज्यात्यांच्या थज्बाजीची रज्जम अजू-ा अदा -ा होजे, दि-ाांज 21 सप्टेंबर 1977 च्या शास-ा निर्जया-वये नियमित व वेळेवर वेत-ा ज्रज्यासाठीच्या योज-ोचे प्रमुज प्रशासज व देजरेज अधिजारी म्हजू-ा संचालज यांचेज्डे सोपविज्यात आलेली जबाबदारी पार पाडज्यात उच्च शिजज संचालज यां-ाा आलेले अपयश, आपले अपयश झाज्ज्यासाठी "महाविद्यालयातील शिजज व शिजज्ेत्तर ज्र्मचाऱ्यांचे वेत-ा देज्याची जबाबदारी संस्था प्रमुजांची असल्याचे " शास-ा निर्जयाच्या विरुध्द परिपत्रज दि-ाांज 23 फेब्रुवारी,2005 रोजी उच्च शिजज संचालजां-ाी जाढजे त्यामुळे उच्च शिजज जेत्रात निर्माज झालेला तीव्र असंतोष, दि-ाांज 17 मार्च,2005 रोजी ज्िंवा त्या दरम्या-ा महाराष्ट्र प्राध्यापज महासंघाच्या अध्यज व सचिवां-ाी उच्च शिजजमंत्री यां-ाा एज निवेद-ा सादर ज्रु-ा बेमुदत जाम बंद आंदोल-ाासह धरजे, निदर्श-ो इत्यादी आंदोल-ाांचा सादर जेलेला जार्यज्रम, उच्च शिजज संचालजांच्या बडतर्फीची ज्रज्यात आलेली माजजी, शास-ा निर्जयाच्या विरोधात यापूर्वी अ-ोज जारवाया त्यां-ाी जेल्याची उदाहरजे या निवेद-ाासोबतच्या आंदोल-ा ठरावामध्ये पुराव्यासह समाविष्ट असजे, "स्टडी मटेरिअल" व शास-ा निर्जय यातील फरज -ा ज्ळल्यामुळे दि-ाांज 17 जुलै,2002 चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परिपत्रज संचालज ां-ी ज ाढजे व पुढे ते परिपत्रज माजे घेऊ-ा दि-ाांज 6 ऑजस्ट 2002 रोजी उच्च शिजज मंत्र्यां-ाा विधा-ापरिषदेत त्यांच्या ज़ृतीमुळे दिलजिरी व्यक्ती ज रावी लाजजे, अधिव्याज्यात्यां-ाा ज़ंत्राटी -ोमजुज ा देतां-ाा 2 वर्षासाठी -ोमजुज ा देज्याची दि-ाांज 25 जुलै 2002 रोजीच्या शास-ा -िर्जयात तरतूद असतां-ाा एज्च वर्षासाठी -ोमजुज ा देज्याचे शास-ा -िर्जय विरोधी आदेश उच्च शिजज संचालज ां-ी विपरित हेतू-े -िर्जमित ज रजे, -ंतर ते आदेश माजे घ्यावे लाजजे, (दि-ाांज 26 मे, 2004 ता.प्र.ज़्र.41778) स्था-ा-िश्चिती समितीच्या बैठज़ीला हजर -ासलेल्या सहसंचालज ां-ी वि-ााज ारज प्रस्ताव रोजू-ा ठेवज्याचे स्पष्ट झाल्या-ंतरही संचालज या -ात्या-े त्यांच्याज डू-ा स्पष्टीज रज माजज्याचा देजावा ज रजे व विधा-ापरिषदेत दि-ाांज 11 जू-ा 2004 रोजी लजवेधी सूच-ोवरील -िवेद-ाात/चर्चेत ही जोष्ट स्पष्ट होवू-ा सुध्दा सहसंचालज ांच्या अपज़ृत्यावर पांघरुज घालजे, -िवड श्रेजीत स्था-ा-िक्श्चती ज रतां-ाा वरिष्ठ श्रेजीतील सेवा ज मी पडत असेल तर अधिव्याज्यात्यांची एज़ूज सेवा मोजज्यात यावी अशी स्पष्ट तरतूद 1998 च्या युजीसीच्या -ोटीफिज ेश-ामध्ये व दि-ाांज 11 डिसेंबर 1999 च्या शास-ा -िर्जयामध्ये असतां-ाा संचालज ां-ी दि-ाांज 14 फेब्रुवारी 2002 रोजी त्याच्या विरोधात परिपत्रज ज ाढजे, ही जोष्ट लजात आजू-ा दिली असतां-ाा शास-ााला टाळू-ा परस्पर विद्यापीठ अ-ुदा-ा आयोजाज डे विषय पाठवू-ा शेज डो शिजज ां-ाा शास-ा -िर्जयातील लाभापासू-ा वंचित ठेवजे, असे ज रतां-ाा ज ाही -िवडज व्यक्तीं-ाा ह्या सवलतीचा फायदा देजे, दि-ाांज 12 -ोव्हेंबर 2003 च्या शास-ा पत्रा-वये रजा विषयज तरतुदींचा तुल-ाात्मज तक्ता सादर ज रज्याचे आदेश असतां-ाा, समज ज मी असल्यामुळे ज़िंवा शिजज ांविषयीच्या आज सामुळे" शासज़ीय ज र्मचाऱ्यां-ाा अ-ुज्ञेय असलेल्या रजा शिजज ां-ाा लाजू ज रज्याची वि-ंती ज रजारा" प्रस्ताव संचालज ां-ी सादर ज रजे, त्यातू-ा झालेली ज़ृती माजे घेज्याचे दि-ाांज 15 फेब्रुवारी,2005 चे परिपत्रज ज ाढज्याचा -ाामुष्ज़ीचा प्रसंज शास-ाावर येजे, ज ामाचा समज -ासल्यामुळे पाचव्या वेत-ा आयोजाच्या वेत-ा -िश्चितीचे व थज बाज़ीचे -ामु-े वारंवार बदलविज्याची पाळी संचालज ांवर येजे, दि-ाांज 7 डिसेंबर 2000 रोजी शास-ााला ही जोष्ट ज बूल ज रावी लाजजे, वेत-ेत्तर अ-ुदा-ा वितरित ज रज्यात त्यांच्याज डू-ा होत असलेले अजम्य दुर्लज, त्यामुळे एज़ूजच उच्च शिजज जेत्रात -िर्माज झालेले असंतोषाचे वातावरज, याबाबत शास-ा-े तातडी-े ज रावयाची उपाययोज-ाा, याबाबत शास-ााची भूमिज ा व प्रतिज़्रिया."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूच-ेसंबंधीच्या निवेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत ेल्या असल्यामुळे मी ते निवेद-ा आपल्या अ-ुमती-े सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेद-ा सभागृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

निवेद-ा

( प्रेस : येथे सोबतचे निवेद-ा छापावे. )

.... ....

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MHM पूर्वी श्रीह.सरफरे . . . . 14:55

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालकांनी दि.23-2-2005 रोजी जे परिपत्रक काढले होते, ते दि.28-3-2005 रोजी रद्द केलेले आहे आणि त्यांनी सर्वांना तशी पत्रेही पाठविलेली आहेत. तसेच दिलगिरीही व्यक्त केली आहे. त्यामुळे त्याबद्दल मी आता प्रश्न विचारु इच्छित नाही. पण निवेदनात म्हटलेले आहे की, "काही महाविद्यालयांमध्ये 50 टक्के महागाई भत्ता समाविष्ट करुन वेतन देण्यात आलेले आहे. परंतु, तरतूदीअभावी काही महाविद्यालयात महागाई भत्ता समाविष्ट करुन वेतन देता आलेले नाही." तशाच प्रकारची बाब भविष्य निर्वाह निधीच्या बाबतीत आणि वेतनाच्या बाबतीत आहे. म्हणजे एकेका महाविद्यालयाच्या माणसाने जावयाचे आणि आपले काम करुन घ्यावयाचे, ही पध्दत बरोबर नाही. म्हणून माझे ठामपणे असे म्हणणे आहे की, त्यांनी 50 टक्के महागाई भत्ता मर्ज करण्याचे पत्रक वगैरे काढलेले आहे. पण खरे म्हणजे आम्ही सभागृहात भांडलो आणि माननीय वित्त मंत्र्यांना सांगितले की, याबाबतीत वेगवेगळया विभागाने आदेश काढण्यापेक्षा तुम्ही एकत्र आदेश काढा आणि त्यांनी त्याप्रमाणे आदेश काढले. त्यांनी आदेश काढले, उच्च शिक्षण संचालकांनी आदेश काढले. त्याची काही ठिकाणी अंमलबजावणी झाली आणि काही ठिकाणी झालेली नाही. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, महागाई भत्ता समाविष्ट करणे, भविष्य निर्वाह निधी आणि महिना-दोन महिन्याची जी थकीत रक्कम राहीलेली असेल ती, अशा तीनही बाबी मिळून, तसे पाहिले तर या निवेदनामध्ये पॉझिटीव्हली दिलेले आहे, पण नक्की तारीख दिलेली नाही. म्हणून माझे म्हणणे आहे की, एप्रिल पेड इन मे किंवा मे पेड इन जून मध्ये हे सर्व रेग्युलराईज होईल यादृष्टीने आपण त्यांना स्पष्ट आदेश देणार आहात का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, एकदा राज्य शासनाने निर्णय घेतल्या नंतर कर्मचा-यांना किंवा शिक्षकांना लाभ द्यावयाचे असतील तर त्यासंदर्भात सहसंचालक स्तरावर संस्था चालकांना किंवा शिक्षकांना आपापले प्रस्ताव मान्य करुन घ्यावे लागू नयेत हे अभिप्रेत आहे. म्हणून अशा प्रकारच्या काही घटना निदर्शनास आल्या असतील, तसेच सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे जेथे जाणीवपूर्वक किंवा काही हेतू मनामध्ये ठेऊन काही होत असेल तर अशा बाबी आपण शासनाच्या लक्षात आणून दिल्या तर संबंधित सहसंचालकांविरुध्द कारवाई करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे की, शासनाने जो निर्णय घेतलेला आहे, त्याप्रमाणे जे द्यावयाचे राहीलेले आहे, ते जूनच्या पगारात क्लीअर करण्यात येईल.

. . . .एक्स-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता उत्तरात सांगितल्यामुळे मी त्या मुद्यावर बोलत नाही. पण यामध्ये एक अत्यंत गंभीर प्रश्न आहे. मंत्रीमंडळाने निर्णय घेतला, स्वत: माननीय मंत्री महोदय त्यावेळी तेथे होते. यामध्ये दिलेले आहे की,"विद्यापीठ अनुदान आयोगाचे परिपत्रक एप्रिल 2000 मधील क्लॉज क्र.2.8 मध्ये प्राध्यापक पदावर पदोन्नतीसाठी अनुज्ञेय होण्याकरीता जी तरतूद करण्यात आली आहे." आम्ही लक्षवेधी सूचनेमध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की," निवड श्रेणीत स्थाननिश्चिती करताना वरिष्ठ श्रेणीतील सेवा कमी पडत असेल तर अधिव्याख्यात्यांची एकूण सेवा मोजण्यात यावी अशी स्पष्ट तरतूद 1988 च्या यूजीसीच्या नोटीफिकीशेनमध्ये आहे." ही नोटीफिकेशन मंत्रीमंडळाने ॲप्रुव्ह केलेली आहे. त्याप्रमाणे 11 डिसेंबर 1999 ला शासन निर्णय निघाला आहे. यूजीसी मध्ये पॅरिग्राफचे नंबरींग कन्टीन्यअस आहे. पण आपल्या शासन निर्णयामध्ये चुकून ते सारे प्रोफेसरच्या खाली टाकण्यात आले आहे. रिफ्रेशन कोर्सला आणि याला वेगळा नंबर दिलेला नाही. परंतु रिफ्रेशर कोर्सला हे लागू केले, पण यांना लागू केले नाही. नंतर 14 फेब्रुवारी 2002 मध्ये यूजीसी च्या नोटीफिकेशनच्या विरोधात, शासन निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी पत्रक काढले. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, 14 फेब्रुवारीला जे पत्रक काढलेले आहे, ते ताबडतोब मागे घेतले पाहिजे आणि मंत्रीमंडळाने 24 डिसेंबर 1998 रोजी जे मान्य केले आहे, जे शासन निर्णयात आले आहे, फक्त परिच्छेद नंबरींग करण्याची आवश्यकता आहे. तर त्याप्रमाणे करुन ही तरतूद ताबडतोब लागू केली जाईल का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, नाही, मग मी . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन याचा अर्थ संचालकांनी जे परिपत्रक काढलेले आहे, ते मागे घेतले जाईल आणि यूजीसीच्या नोटीफिकेशन प्रमाणे मंत्रीमंडळाने जो निर्णय घेतला आहे, त्याप्रमाणे सुधारीत जी.आर.काढला जाईल. सजेशन फॉर ॲक्शन म्हणजे तुमची सजेशन आम्ही मान्य करतो, असा त्याचा अर्थ आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, नंतर माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले, त्यामुळे ते स्पष्ट झाले. मी माननीय मंत्री महोदयांचा आभारी आहे. माझे म्हणणे असे आहे की, या मध्ये एवढया ओमिशन आणि कमिशन आहेत की, ते सांगून सभागृहाचा वेळ घेणे मला योग्य वाटत

. . . .एक्स-3





प्रा.बी.टी.देशमुख . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. नागपूरच्या सह संचालकांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांनी मला सांगितले. त्याबाबतीत मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, इतक्या ओमीशन ॲण्ड कमिशन आहेत आणि त्याची येथे चर्चा करावयाची म्हटले तर वेळ जाईल. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आता त्या संघटनेने आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. दर महिन्यामध्ये दर सोमवारी जॉईंट डायरेक्टरच्या कार्यालयावर मोर्चा काढला जाणार आहे म्हणजे त्यांची जी कामे आहेत, त्यामध्ये त्यांना ही कामे देखील करावी लागत आहेत. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, या सर्व मुद्यांच्या बाबतीत त्यांच्याशी चर्चा करुन निर्णय घ्यावा आणि हे महिन्या भरामध्ये करावे. आज महाराष्ट्रात जे वातावरण निर्माण होत आहे, ते योग्य नाही. माननीय मंत्री महोदयांनी घेतलेले दोन निर्णय अतिशय योग्य आहेत. खरे म्हणजे घेतलेलेच निर्णय अयोग्य केले होते. ते आपण आता पुन्हा योग्य मार्गावर ओढून आणले आहेत. तेव्हा एक महिन्याची किंवा दीड महिन्याची तारीख देऊन संबंधितांबरोबर चर्चा केली जाईल का ? तसेच या प्रश्नाच्या बाबतीत शासन पातळीवर निर्णय घेतला जाईल का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे दोन विषय उपस्थित केलेले आहेत. पहिली बाब म्हणजे याठिकाणी त्यांनी बैठकीच्या संदर्भात मागणी केली आहे. तर यासंदर्भात महिनाभराच्या आत एक बैठक बोलावून सर्व संघटनांबरोबर चर्चा केली जाईल.

यानंतर श्रीह.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी सौ.रणदिवे... 15:00

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे चालू...

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला. लहानलहान प्रश्नाच्या बाबतीत सभागृहाचा फार वेळ जातो. त्याबाबत देखील मॅकॅनिझम तयार केले पाहिजे. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत मा.सदस्यांना सांगू इच्छितो की, असे लहानलहान प्रश्न लक्षवेधी किंवा प्रश्नाच्या माध्यमातून त्याची चर्चा सभागृहात करावयाची असेल तर त्याची चर्चा मंत्री किंवा सचिव यांच्याबरोबर झाल्याशिवाय अशाप्रकारचा प्रश्न किंवा लक्षवेधी स्वीकृत करु नये.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या आपल्याला सूचना आहेत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : यामध्ये वेळ जाऊ नये हा हेतू आहे.

डॉ..वसंत पवार : सभापती महोदय, मी संस्था चालकांच्या वतीने बोलतो आहे. सभापती महोदय, दिनांक 23 फेब्रुवारी 2005 रोजी उच्च शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढलेले आहे. त्याप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांना वेतन देण्याची जबाबदारी संस्था प्रमुखांची आहे,असे म्हटलेले आहे. या परिपत्रकामुळे गैरसमज निर्माण झाले, चुकीचे आदेश काढल्याचे लक्षात आल्यानंतर 28-3-2005 रोजी ते आदेश मागे घेतले. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते, त्या वेतन अनुदानाच्या 5 टक्के इतका निधी वेतनेतर अनुदान म्हणून देण्याचा निर्णय शासनाने दिनांक 23 सप्टेंबर 2003 अन्वये घेतलेला आहे". अजूनही किती वेतनेतर अनुदान बाकी आहे आणि ते शासन केव्हा देणार आहे, हे मंत्री महोदयांनी सांगावे,अशी विनंती आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ही बाब तपासून घेऊन एक महिन्याच्या आत त्याबाबतचा निर्णय घेतला जाईल.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, निवेदनाच्या पान 2 मध्ये बजेटमध्ये तरतूद नव्हती असे म्हटलेले आहे. यामध्ये मला दोन ट्रेंड दिसतात. बजेट सरप्लस दाखविणे आणि ते पैसे दुसरीकडे खर्च करणे, दुसरे असे की, बजेटमध्ये तरतूद दाखवायची नाही आणि नंतर पूरक मागण्यांमध्ये ते पैसे मंजूर करुन घ्यावयाचे, असा ट्रेंड तर नाही ना, असा प्रश्न समोर येतो. या संबंधाने गेल्यावर्षी किती तरतूद केलेली होती आणि या वर्षी किती तरतूद केलेली आहे, त्याबाबतचा खुलासा करावा, अशी विनंती आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : राज्याचे जे बजेट केले जाते, ते साधरणत: वेगवेगळे रिसोर्सेस गृहित धरून केले जाते. तेवढे पैसे उपलब्ध होत नव्हते याच कारणामुळे केवळ आपण राज्याचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे चालू...

बजेट या वर्षी लहान केले. 17-18 हजार कोटी रुयाचे बजेट स्प्लीट करुन तयार करावयाचे आणि नंतर त्यामध्ये कट लावायचा यामुळे प्रश्न निर्माण होतात. म्हणून या संदर्भात कोणत्याही परिस्थितीमध्ये मा.वित्तमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे की, कॅश फ्लो च्या संदर्भात तरतूद केलेली आहे, ती निश्चित प्रकारे खर्च करावी. प्राधान्याने सेक्टरमध्ये पेमेंट करायला पाहिजे. या ठिकाणी सॅलरीचे अनुदान नॉन सॅलरीला दिले गेले, असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सहसंचालकांनी अनुदान वितरित करताना ते दुसऱ्या बाबीवर खर्च करण्याची कृती झाली असेल तर सह संचालकांविरुध्द कारवाई करण्यात येईल. शासन स्तरावरच वेतनाची रक्कम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याच्याबाबतीत सातत्याने दक्षता घेतली जाते. एखाद्या ठिकाणी खालचे अधिकारी चुकीचे वागतात, त्यामुळे हजारो कर्मचाऱ्यांना मनस्ताप सोसावा लागतो, त्याबरोबर सभागृहाचाही वेळ जातो. या गोष्टी थांबविण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर यापुढे संचालक किंवा सह संचालकांच्या किंवा अन्य कोणाच्या चुकीमुळे अशाप्रकारचा मनस्ताप भोगण्याची वेळ येणार नाही, या संदर्भात एक रचना तयार करुन सर्व शिक्षकांना वेळेवर पगार मिळेल असे आश्वासित करण्यात येत आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत सहसंचालक श्री. राठोड यांच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत. ते पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत अशा तक्रारी आहेत. नागपूर युनिव्हर्सिटीमध्ये या वर्षात स्थान निश्चितीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? 1996 पासून भविष्यनिर्वाह निधीचा हिशेब दिलेला नाही. स्लीप दिलेल्या नाहीत. गेल्या दोन वर्षामध्ये या विद्यापीठाच्या अंतर्गत वेतन अनियमितपणे दिले जात आहे. तीन चार महिन्याचे वेतन एकदम दिले जाते. ते नियमित केले जाईल काय ? स्थान निश्चितीची जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्यासंदर्भात एक महिन्यात निर्णय घेणार काय ? 1996 पासून भविष्य निर्वाह निधीच्या हिशेबाच्या चिठ्ठया दिलेल्या नाहीत त्यासंदर्भात सुध्दा एक महिन्यात ठोस निर्णय घेऊन त्यांना दिलासा देणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, स्थान निश्चितीच्या संदर्भात सर्व संचालकांना आजच आदेश देण्यात येतील की, वाटेल त्या परिस्थितीमध्ये त्यांनी सर्व स्थान निश्चितीची प्रकरणे दोन महिन्याच्या आत पूर्ण करावीत. ज्या ज्या ठिकाणी रकमा देण्याच्या राहिलेल्या आहेत त्यासंदर्भात जी बैठक घेणार आहोत त्या बैठकीमध्ये चर्चा करुन ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी दिल्या जातील.

प्रा. बी. टी. देशमुख : स्थान निश्चितीच्या बाबतीत पंधरा दिवसामध्ये ते केले पाहिजे असे सध्याचे आदेश आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ते आल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत केले पाहिजे परंतु थकलेली प्रकरणे असतील तर त्याचा निपटारा केला पाहिजे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : भविष्य निर्वाह निधीच्या संदर्भात 1996 पासून हिशेबाच्या चिठ्ठया दिलेल्या नाहीत. त्यासंदर्भात एक महिन्यात निर्णय घेणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : यासंदर्भात सर्व हिशेब ताबडतोबीने करुन घेण्याचे सांगण्यात येईल.

श्री. जी. एल. ऐनापुरे : निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, अध्यक्ष व सचिव, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲन्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन यांनी दिनांक 17 मार्च, 2005



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. जी. एल. ऐनापुरे ....

रोजी माननीय मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक 28.3.2005 रोजी शिवाजी युनिव्हर्सिटी टिचर्स असोसिएशन या संघटनेबरोबर बोलणी केली असून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास बोलणी करण्यासाठी निमंत्रित केलेले आहे. परंतु अशाच इतर प्राध्यापकांच्या संघटना आहेत. त्यांनाही आपण चर्चेला बोलविणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महाराष्ट्रामध्ये जेवढया संघटना असतील तेवढया संघटनांना बोलविण्यात येईल.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी जे निवेदन आलेले आहे त्याबाबतीत माझी हरकत आहे. हा विषय वैद्यकीय शिक्षण विभाग आणि गृह विभाग या दोन विभागांचा आहे. या ठिकाणी फक्त गृह खात्याने उत्तर दिलेले आहे. यामध्ये दोन्ही खाते अंतर्भूत आहेत. त्यामुळे हे निवेदन आपण परत घ्यावे आणि पुन्हा वैद्यकीय शिक्षण आणि गृह विभाग या दोन विभागांनी मिळून या संदर्भातील उत्तर द्यावे. विधानसभेमध्ये तसे झालेल आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, हा विषय दोन्ही विभागाशी संबंधित असल्यामुळे दोन्ही माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, सांगली जिल्हयातच नव्हे तर मुंबईमध्ये देखील असे किडनी विकण्याचे प्रकार होत आहेत. वर्तमानपत्रामध्ये फार मोठे रकानेच्या रकाने छापले गेले आहेत. लोकांनी ते वाचलेले आहेत. सांगली जिल्हयात अशा प्रकारचे रॅकेट आहे तसेच मुंबईमध्ये देखील खाजगी डॉक्टरांचे रॅकेट आहे. हे वर्तमानपत्रात लिहून आलेले आहे. यासंदर्भात जे निवेदन दिलेले आहे त्यावरुन सांगलीमध्ये जे घडत आहे त्यामध्ये खाजगी डॉक्टर आणि त्यांचे रॅकेट आहे. खाजगी धंदेवाले यामध्ये गुंतलेले आहेत. यासंदर्भात शासन काय धोरण घेणार आहे ? निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, असे गुन्हे नोंदविले गेलेले नाहीत. जो धंदा खाजगीरित्या चालतो, गुप्तपणे चालतो, डॉक्टर गुप्तपणे किडनी काढून विकतात, पैसे घेतात अशा परिस्थितीमध्ये सरकारचे काय धोरण आहे ? याबाबतीत गृह खात्याचे काय धोरण आहे ? आरोग्य खात्याचे काय धोरण आहे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, किडणीसारखे मानवी अवयव हे रुग्णाच्या नातेवाईकाच्या काढून त्याचे प्रत्यारोपण केले जाते अशा अनेक ठिकाणी आपल्याला केसेस आढळून येतात किंवा असे करणारे त्याचे रॅकेट आहे. राज्याच्या लिमिटमध्ये अशाप्रकारच्या घटना आहेत तोपर्यंत मेडिकल कौन्सिल ॲक्ट आणि दुसरा नर्सिंगचा ॲक्टनुसार कारवाई केली जाते. एखाद्या वेळेला डॉक्टर वैयक्तिकरित्या दोषी असतो त्यावेळी मेडिकल कौन्सिल ॲक्टच्या अंतर्गत त्या डॉक्टरविरुध्द कारवाई करु शकतो आणि ज्यावेळी हॉस्पिटलमध्ये अशाप्रकारची घटना घडते त्यासंबंधीची कारवाई करण्यासाठी नर्सिंग ॲक्ट सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत आहे. म्हणून खालच्या सभागृहामध्ये यासंदर्भात प्रश्न उपस्थित झालेला होता त्यावेळी मी आश्वासन दिलेले आहे की, गोरगरीब रुग्णांच्या असहायतेचा फायदा घेऊन मानवी अवयवांची चोरी करणे किंवा त्यासंबंधीची घटना घडणे यासाठी या राज्यामध्ये आपल्याला एक स्वतंत्र धोरण स्वीकारुन या सभागृहामध्ये मांडले जाईल. यासंदर्भात कोणताही डॉक्टर किंवा कोणतेही हॉस्पिटल या व्यवसायामध्ये गुंतून राहील, पैशाचे आमिष दाखवून गोरगरीब माणसांचे अवयव काढण्याचे प्रकार करील ही बाब राज्यामध्ये चालू देणार नाही. यासाठी गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग हे तिन्ही एकत्रितपणे कारवाई करतील आणि हे प्रकार थांबविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : मंत्रिमहोदयांनी जे धोरण स्वीकारले आहे त्याचे मी स्वागत करतो. शासनाचे हे धोरण अस्तित्वात येण्यासाठी काही काळ जाणार आहे. तोपर्यंत मी एक सूचना करु इच्छितो. मानवी अवयवांचे प्रत्यारोपण ॲक्ट हा केंद्र सरकारचा ॲक्ट आहे. महाराष्ट्र शासनासाठी त्यामध्ये काही सुधारणा करणार आहे त्याला वेळ लागणार आहे. तोपर्यंत ज्या संस्थांकडून किडणी प्रत्योरोपित केली जाते त्या त्या संस्था लोकेट करणार काय ? त्यांची एक यादी तयार करणार काय ? त्याला विशेष नोंदणी देणार का ? आणि जे जे डॉक्टर प्रत्यारोपणामध्ये गुंतलेले असतात मग ॲनेस्थेटिस्ट असो किंवा युरोसर्जन असो, अशा डॉक्टरांची एक वेगळी यादी तयार करुन ती प्रसिध्द करणार काय ? त्यामुळे शासन जोपर्यंत हे धोरण जाहीर करीत नाही तोपर्यंत किडणी प्रत्योरापणाच्या अवैध धंद्याला आला बसेल. यासंबंधी शासनाचे काय म्हणणे आहे ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : अशाप्रकारच्या घटना साधारणपणे चुकीचे घडून गेल्यानंतर निदर्शनास येतात. यामध्ये दोन बाबी असतात. एका नातेवाईकाची किडणी काढून दुस-या नातेवाईकाला बसविण्यासाठी लगेच मान्यता दिली जाते. परंतु अनरिलेटेड पर्सनला ज्यावेळी किडणी द्यावयाची असते त्यावेळेला वैद्यकीय शिक्षण संचालकांची एक समिति आहे, त्या समितीने परवानगी दिल्यानंतर किडणी किंवा अवयवाचे प्रत्यारोपण केले जाते. या कायद्यामध्ये आपल्याला राज्य स्तरावर सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. ती करीत असताना सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना असतील, मते असतील, काही सुधारणा करावयाच्या असतील त्या जरुर सुचवाव्यात, त्याबाबत एकत्रितपणे विचार करता येईल. परंतु राज्यामध्ये किडणीचे प्रत्यारोपण करणारी हॉस्पिटल्स असतील किंवा डॉक्टर्स असतील त्यासंबंधी माझ्याकडे विस्ताराने भूमिका मांडली तर निश्चितपणे आपण केलेल्या सूचनांचा विचार करुन त्यांची यादी करणे किंवा हॉस्पिटल्स आयडेंटिफाय करुन डिक्लेअर करणे यासंबंधी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.संजय दत्त : अनधिकृतपणे अवयवांचे प्रत्यारोपण होऊ नये यासाठी अधिकृत सेवा देण्यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : त्यासाठी स्वतंत्र कायदा आहे. आताच सांगितले की, एका नातेवाईकाची किडणी दुस-या नातेवाईकाला द्यावयाची असेल तर त्याला मान्यता दिली जाते. परंतु एखादा माणूस जो नातेवाईक नाही तरी सुध्दा त्याला किडणी द्यावयाची आहे अशा केसमध्ये वैद्यकीय शिक्षण संचालक स्तरावर समिती आहे, त्या समितीमध्ये हया केसेस जातात आणि त्यांची मान्यता मिळाल्यानंतर अवयवाचे किंवा किडणी काढून प्रत्यारोपित केली जाते तोपर्यंत केले जात नाही.

------

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 15:15

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी क्रमांक 4 बाबत

**उप सभापती** : मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेल्या लक्षवेधी क्रमांक 4च्या बाबत माननीय मंत्री महोदयांनी, "ही लक्षवेधी सूचना नंतर घ्यावी" अशी विनंती केलेली आहे. त्यानुसार ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : ही लक्षवेधी सूचना केव्हा घेण्यात येईल ?

**उप सभापती** : अधिवेशन संपण्यापूर्वी ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, नागपूर द्वारा चालविण्यात येणा-या सर्व शाळांमध्ये व्यवस्थापनाने केलेले गैरप्रकार

**मु. शी** : राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, नागपूर द्वारा चालविण्यात येणा-या सर्व शाळांमध्ये व्यवस्थापनाने केलेले गैरप्रकार यासंबंधी स□मा□□य सदस्य श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते व प्रतापराव सोनवणे यां□ दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ □□म 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वज□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□य शालेय शिक्षण मंत्र्यांचे ल□वेधू इच्छिते आ□□ त्याबाबत त्यां□ □□वेद□ □रावे, अशी वि□ती □रते.

"राष्ट्रीय स्नेही िक्षण संस्था, नागपूर द्वारा चालविण्यात येणा-या सर्व शाळांमध्ये व्यवस्थापनाने गैरप्रकार व गैरव्यवहार केले असून, शासनाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणात अफरातफर करणे, या संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा नागपूर, शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे तक्रारी दाखल करुन देखील या तक्रारीबाबत काहीही कारवाई न होणे, या संदर्भात शेवटची तक्रार शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक 7 फेब्रुवारी 2005 रोजी करणे, या संदर्भात प्रामुख्याने तक्रारी म्हणजे संचालकाच्या मुलाला खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर नेमणूक देणे, तसेच संस्था अध्यक्षांच्या मुलास कामावर उपसिथत नसताना सन 1978 ते 1980 या कालावधीत पगार देण्यात येणे, शिक्षकांच्या पगारातून वसूल केलेली रक्कम संबंधित विभागाकडे जमा न करणे, गट विमा योजना बंद करणे व अशाच अनेक तक्रारी असतानाही कारवाई न करणे, यामुळे कर्मचा-यांमध्ये पसरलेले संतापाचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या □□वेद□च्या प्रती मा□□य सदस्यां□ आधीच वितरित □ल्या असल्यामुळे मी ते □□वेद□ आपल्या अ□मती□ सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : □□वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

**□□वेद□**

( प्रेस : येथे सोबतचे □□वेद□ छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्थेच्या बाबतीत गैरप्रकार, गैरव्यवहार, अनियमितता याबाबतीत केलेल्या तक्रारीच्या संदर्भात,सविस्तर चौकशी करण्याचे आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर यांना दिलेले आहेत असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. वास्तविक हे प्रकरण 1995 सालापासून सुरु आहे. ज्या तक्रारींचे निवेदन दिलेले आहे त्यामधील काही गंभीर तक्रारींकडे मी मा.मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. इंदिरा गांशी हायस्कूल येथील लिपिक श्री.निलय माकडे हे संस्था अध्यक्ष यांचा मुलगा आहे. ते स्वत: शिकलेले नाहीत. तरी खोटी प्रमाणपत्रे देऊन, शासनाची फसवणूक करुन त्यांना जी रक्कम दिली गेली ती परत घेतलेली नाही. त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे असताना काहीही कारवाई झालेली नाही. तसेच शाळेतील चौकीदार श्री. जोगी तसेच शिपाई, श्रीमती आकरे हे दोघेही शाळा संचालक यांचे घरी काम करतात. याबाबतीत काहीच चौकशी केलेली नाही. इंदिरा गांधी उच्च प्राथमिक कन्या शाळा, नागपूर ही मुलींची शाळा असताना व्यवस्थापनाने श्री. गुजरकर यांना मुख्याध्यापक म्हणून नियुक्त केलेले आहे. या सर्व तक्रारींचे निवेदन आता जरी दिले असले तरी हे सर्व गैरप्रकार 1995 पासून होत असताना अद्याप कोणतीही कारवाई का करण्यात आलेली नाही ? प्राथमिक शाळांवर प्रशासक नेमलेला आहे. माध्यमिक शाळेच्या बाबतीत असा प्रशासक नेमलेला आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ :राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेच्या 3 प्राथमिक शाळा आणि 1 माध्यमिक शाळा आहे. या शाळेमध्ये ज्या नियुक्त्या झाल्या होत्या त्या अनियमित आणि बेकायदेशीर होत्या म्हणून 13.9.96 रोजी शिक्षण संचालकांनी प्रशासकाची नियुक्ती केली. या नेमणुकीस उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आणि उच्च न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित आहे. मा.सदस्यांनी या ठिकाणी केलेल्या तक्रारी ख-या आहेत. त्याबाबतीत सविस्तर निवेदन प्राप्त झालेले आहे. या प्रकरणी उप संचालकांनी एक महिन्याच्या आत अहवाला द्यावा असे सांगितलेले असून तो अहवाला प्राप्त झाल्यानंतर कारवाई करु.

श्रीमती संजीवनी रायकर : याबाबतीत चौकशी करु असे मंत्री महोदयांनी सांगितले. 1995पासून हे गैरप्रकार होत असताना तेव्हा पासून कारवाई का केलेली नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : मी मघाशी सांगितले की, या प्रकरणी प्रशासकाची जी नियुक्ती केली होती त्या नियुक्तीला हायकोर्टाने स्थगिती दिल्यामुळे प्रकरण कोर्टात प्रलंबित आहे.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : शिक्षण उप संचालकांच्या माध्यमातून चौकशी केली जाईल असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. खरे म्हणजे या सर्व प्रकरणांची चौकशी झालेली आहे. अशा प्रकारचे गैरप्रकार झोलेले आहेत हे शासनाने मान्य केलेले आहे. शासनाने प्रशासकही नेमला. त्याबाबतीत न्यायालयीन अडचण मंत्री महोदयांनी सांगितली. माझा प्रश्न असा आहे की, गैरप्रकार झालेले आहे हे शासनाने मान्य केलेले असल्यामुळे या प्रकरणी तातडीने काय कारवाई केली जाणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने मला निवेदन दिले. त्यानुसार उप संचालकांनी एक महिन्याच्या आत तपासणी करावी आणि 4 मे पर्यन्त अहवाल द्यावा असे सांगितलेले आहे. वाटले तर आम्ही मान्यता देखील काढून घेऊ..

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 15:20

श्री. अनंत तरे : या ठिकाणी गैरप्रकार आणि गैरव्यवहार झालेला आहे. त्यामुळे संबंधितांवर फौजदारी खटला करावयास पाहिजे होता. संबंधितांवर फौजदारी खटला का दाखल केला नाही ?

श्री. हसन मुश्रीफ :आपण पहिल्यांदा त्याच्यावर कारवाई केली. तेथे 1996 साली प्रशासकाची नियुक्ती केली. प्रशासकीय नियुक्तीस उच्च न्यायालयाची स्थगिती आली. दुसरे असे की, डेप्युटी डायरेक्टरांकडून एका महिन्यामध्ये तपासणी करुन घेऊन यासंदर्भात योग्य ती कारवाई संबंधितांवर करण्यात येईल असे मी मघाशीच सांगितले आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : ही नागपूरची शिक्षण् संस्था आहे आणि या संस्थेमध्ये गैरप्रकार आणि गैरव्यवहार झालेले आहेत. राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, नागपूर असे या संस्थेचे नाव आहे. या संस्थेत अनेक प्रकारचे गैरव्यवहार आणि गैरप्रकार झालेले असताना या संदर्भात जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी, प्राथमिक आणि शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यासंदर्भात शासन संबंधितांवर एका महिन्याच्या आत कारवाई करतील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : उप संचालकांच्या व्दारे एका महिन्याच्या आत संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि आमचे जे कोणी अधिकारी असतील त्या सर्वांवर कारवाई करण्यात येईल असे मी मघाशीच सांगितले आहे.

----------------

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वसई (जि.ठाणे) येथील बॉस म्युझीकल या शाळेत शिकत असलेल्या मुलींवर होत असलेला अन्याय व अत्याचार.

**मु. शी.** :वसई (जि.ठाणे) येथील बॉस म्युझीकल या शाळेत शिकत असलेल्या मुलींवर होत असलेला अन्याव व अत्याचार यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड,प्रा.जोगेंद्र कवाडे,डॉ.वसंत पवार, सर्वश्री.राजेंद्र जैन,सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण,प्रा.फौजिया खान,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वसई (जि.ठाणे) येथील बॉस म्युझीकल या शाळेमध्ये शिकत असलेल्या मुलींवर होत असलेले अन्याय,अत्याचार,शाळेमध्ये शिकत असलेल्या 40 मुलींनी घरी जाण्यास दिलेला नकार, या मुलींच्या पालकांनी दिनांक 27 मार्च,2005 रोजी वा त्या सुमारास पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवूनही सखोल चौकशी होऊन कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरिक तसेच महिला आणि सदर शाळेत शिकत असलेल्या मुलींच्या पालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप व चिडीची भावना, पसरलेले वातावरण, आंध्रप्रदेशमधील अशाच एका म्युझीकल शाळेतील विद्यार्थिनींनी केलेल्या सामुहिक आत्महत्येची मागील कालावधीत झालेली दुर्घटना लक्षात घेता गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी होऊन कारवाई होण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3.



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 15:20

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------------

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये निवेदन करण्यात आलेले आहे. ते अत्यंत संदिग्ध असल्याचे दिसून येते. दि बॉस स्कूल ऑफ म्यूझीक मुंबईतील ही संस्था आहे. 1996 पासून संगीताच्या क्षेत्रामध्ये पाश्चिमात्य, कर्नाटक, शास्त्रीय, संगीतावर संशोधन आणि प्रशिक्षण या संस्थेमार्फत दिले जाते. संगीताच्या बाबतीत सीडीज् आहेत, पुस्तके आहेत, इतर माध्यमे आहेत, त्या माध्यमातून इतरांना संगीत कसे शिकवावे हे या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविले जाते. येथे ज्ञान घेणारे विद्यार्थी इतरांना संगीताचे धडे देत असतात. परंतु वृत्तपत्रात ज्या बातम्या आलेल्या आहेत त्या गंभीर आहेत. या संस्थेमध्ये ज्या मुली संगीताचे शिक्षण घेत आहेत. त्यांच्या पालकांनी दि.10.3.05 रोजी तक्रार केलेली आहे. त्यामध्ये या मुलींवर अन्याय, अत्याचार करुन त्या मुलींना डांबून ठेवले जाते. त्या ठिकाणी संमुहशास्त्राचा वापर करुन तेथील विद्यार्थिनींना संमुहीत केले जाते. याचा परिणाम असा होतो आहे की, त्या ठिकाणच्या मुली आपल्या घरी जाण्यास नकार देतात...

**उप सभापती** : आपण प्रश्न विचारा..

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ही बाब अतिशय गंभीर आहे. मुलींचा प्रश्न आहे. या संस्थेत संगीताचे शिक्षण घेण्या-या मुली स्वतःच्या घरी जाण्यास नकार देतात. या प्रकरणाची चौकशी शासन अतिशय गंभीरतेने करणार आहे काय ? ही बाब जर खरी असेल तर शासन या संस्थेची सखोल चौकशी करुन या संस्थेच्या विरुध्द कठोर कारवाई करणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हत्रे : सभापती महोदय, या संस्थेची डी.आय.दर्जाच्या पोलीस अधिका-यांनी चौकशी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांना अजून सखोल चौकशी करण्याची गरज वाटत असेल तर यासंदर्भात पुन्हा सखोल चौकशी केली जाईल.

---------------

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मा.सभापतींनी औचित्याच्या मुद्यावर दिलेल्या निदेशास अनुसरुन निवेदन.

**मु.शी.**: मा. सभापतींनी औचित्याच्या मुद्यावर दिलेल्या निदेशास अनुसरुन वित्त राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांचे निवेदन.

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री): सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने एक निवेदन मला करावयाचे आहे. मा.श्री.दिवाकर रावते यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. खालच्या सभागृहामध्ये घोषणा झाली आणि वरच्या सभागृहामध्ये घोषणा केली नाही असे त्यांचे म्हणणे होते. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, अशासकीय प्रस्तावाच्या अनुषंगाने ही चर्चा होती आणि त्यामध्ये मी वैधानिक विकास महामंडळांना 30 एप्रिल 2000 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे आणि पुढील पाच वर्षासाठी मुदतवाढ देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे असे मी येथे निवेदन करतो.

---------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ.शी.**: केंद्र शासनाने लघुउद्योग आणि कृषी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देणा-या योजना राबविण्याबाबत.

**मु.शी.**: केंद्र शासनाने लघुउद्योग आणि कृषी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देणा-या योजना राबविणे याबाबत श्री.शांताराम करमळकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. शांताराम करमळकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे . त्यांनी ती मांडावी.

श्री. शांताराम करमळकर (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" केंद्र शासनाने लघुउद्योग आणि कृषी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देणा-या विविध योजनांमुळे देशभरात 71.19 लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र महाराष्ट्राची कामगिरी तितकी उत्साहवर्धक नाही. केवळ साडेपाच लाखांच्या घरात रोजगार निर्मिती झाली आहे हे देशाच्या तुलनेत महाराष्ट्राचा 11 वा क्रमांक लागतो. विशेषत: खादी व ग्रामोद्योग,ग्रामीण व कृषी पूरक उद्योग क्षेत्रात केंद्राच्या भरीव अनुदान व मदत असलेल्या योजनांचा परिणामकारक वापरच झ ालेला नाही. सार्वजनिक तसेच खाजगी औद्योगिक प्रकल्पातील एकंदर रोजगार 31 मार्च 2004 रोजी 35.6 लाख इतका होता व त्यापूर्वी तो 35.9 तुलनेत 30 हजारांनी घटला आहे व सध्याच्या बेरोजगाराच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे व त्यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करु इच्छितो.

----

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कर्जत तालुक्यात दलित महिलेला झालेली मारहाण.
**मु.शी.**: कर्जत तालुक्यात दलित महिलेला झालेली मारहाण याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे(नामनियुक्त): महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कर्जत तालुक्यातील दहिगावात दिनांक 31 मार्च 2005 रोजी राखी शिंदे ही दलित युवती कपडे धूत असताना अंगावर पाणी उडल्याच्या वादातून स्थानिक चिंतामण चव्हाण,सपोलीस पाटील राम पाटील आणि त्यांच्या 10-15 सहका-यांनी तलवार,गुप्ती,भाले काठयांचा वापर करुन गावातील दलित-बौध्द परिवारावर हल्ला केला. जातीवाचक शिविगाळ केली. बौध्द समाजातील कुटुंबांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. यात बौध्द महिला,पुरुष,मुलांना आपटून आपटून मारण्यात आले. मंदा व गुलाब शिंदे यांना बेशुध्द होईपर्यंत मारण्यात आले. पोलीस पाटील यांनी घटनेची तक्रार पूर्वनियोजितरित्या अगोदरच दिल्याने पोलिसांनी अन्याय झालेल्यांनाच पोलीस कोठडीत डांबले. ही अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना असून स्थानिक दलित जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाने हल्लेखोरांवर ॲटॉसिटी ॲक्ट अंतर्गत कठोर कारवाई करुन असले प्रकार राज्यात पुन्हा पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाने तात्काळ उपाययोजना करावी यासाठी सदर बाब मी सभागृहात सादर करीत आहे.

सभापती महोदय, कर्जत तालुक्यातील दहिगांव याठिकाणी केवळ साध्या पाण्यावरुन जातीवंत जातीयवाद्यांनी बौध्द महिलेला दलित महिलेला बेशुध्द होईपर्यंत मारहाण केली त्यासंदर्भात विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो आणि या दलित परिवारावर जो अत्याचार झाला त्याची शासनाने दखल घ्यावी अशी मी मागणी करीत आहे. 31 मार्च 2005 रोजी राखी शिंदे ही दलित बौध्द युवती दहिगावातील पाणवठयावर कपडे धूत होती. या पाणवठयावर गावातील सर्व जाती-जमातींची मंडळी कपडे धूत असतात. कपडे धूत असताना कपडयाचे पाणी वरिष्ठ समाजाच्या महिलांच्या अंगावर उडाले त्यामुळे त्या महिलेने शिविगाळ केली. ही दलित मुलगी राखी शिंदे हीने विनंती केली की कृपा करुन शिविगाळ करु नका. जातीवाचक शिविगाळ करु नका अशी विनंती केली. एवढयात राखी शिंदेचा भाऊ त्याठिकाणी आला त्यांनी देखील त्या महिलेला विनंती केली आणि याठिकाणी नंतर कॉम्प्रमाईज देखील झाले...

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

राखीच्या भावाने याबाबतीत समझोता घडवून आणला होता जे काही झाले असेल ते झाले आहे आता यावर आणखी वाद नको असे त्याने ठरविले होते.हें भांडण सुरु असतांना श्री.सूर्यकांत देशमुख नावाची व्यक्ती आली आणि त्यांनी या बहिण भावंडांना जातीवाचक शिवीगाळ केली.त्याचबरोबर धमकीसुध्दा दिली. जिच्या अंगावर पाणी उडाले होते त्या सुनंदा चव्हाण या महिलेचे पती श्री.चिंतामण चव्हाण हे दारुच्या नशेत बौध्दवाडयात गेले होते.त्या ठिकाणी जाऊन पुन्हा जातीवाचक शिवीगाळ करुन या संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची त्यांनी धमकी दिली होती इतकेच नव्हे तर त्यांनी दहा बारा माणसे बरोबर आणली होती आणि त्यांनी बौध्द वस्तीवर हल्ला करुन त्यांनी या कुटूंबाला मारहाण केली होती.बौध्द समाजातील कुटूंबाला ठार मारण्याची त्यांनी धमकी दिली होती. बौध्द समाजातील पुरुषांना, महिलांना व मुलांना मारहाण करण्यात आली होती. त्यांना आपटून आपटून मारण्यात आले होते.नंदा आणि गुलाब शिंदे यांना बेशुध्द होईपर्यन्त मारण्यात आले होते. पोलीस पाटलांनी घटनेची तक्रार अगोदरच दिली असल्यामुळे पोलिसांनी अत्याचार करणा-या लोकांविरुध्द कारवाई केलेली नाही तर अत्याचार पीडित अशा बौध्द ,दलित परिवारावर कारवाई केली. ही अत्यंत गंभीर आणि संतापजनक अशी बाब आहे.त्यामुळे दलित जनतेमध्ये बौध्द जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे महात्मा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षि शाहू महाराज यांचे नाव घेणा-या महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे जातीच्या नावाखाली जातीवंत लोक जर अत्याचार करीत असतील तर ही बाब आपल्या राज्यासाठी शरमजनक आहे म्हणून शासनाने हल्लेखोरांच्या विरुध्द ॲट्रॉसिटी कायद्याखाली कारवाई करुन असले प्रकार पुन्हा राज्यात घडणार नाही यासाठी त्वरित उपाययोजना करावी.या प्रकरणात पोलीस पाटील आणि अत्याचार करणारे लोक यांचे सेटींग होते. त्यामुळे अन्याय व अत्याचार करणा-या विरुध्द कारवाई करण्या ऐवजी अत्याचार पीडित व्यक्तीवर कारवाई क रण्यात आली आहे.या संदर्भात अत्याचार करणा-या जातीवाद्या विरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी.अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी :शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात रिक्त असलेली पदे त्वरित भरणे

मु.शी :शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात रिक्त असलेली पदे त्वरित भरण्याबाबत श्री.नतिकोद्दीन खतिब यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.नतिकोद्दीन खतिब यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.नतिकोद्दीन खतिब (विधान सभेने निवडलेले): महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :

" राज्यातील आयुर्वेद संचालनालयाच्या नियंत्रणा अंतर्गत शासकीय आयुर्वेद महाविद्यालये (मुंबई - नागपूर - नांदेड - उस्मानाबाद ) यातील आयुर्वेद प्रणालीच्या पदवी, पदव्युत्तर तसेच पदविका अभ्यासक्रमासाठीच्या विद्यार्थ्याची संख्या तसेच संलग्न आयुर्वेदीक महाविद्यालयातील व हॉस्पिटलातील खाटांची संख्या विचारात घेता पुरेसा वैद्यकीय अधिकारी कर्मचारी वर्ग कार्यरत नसणे, भारतीय चिकित्सा केन्द्रीय परिषदेच्या आकृतीबंधान्वये घोषित केलेल्या निर्देशानुसार आस्थापनेत सुधारणा करण्या विषयीचा आढावा अहवाल सन 2000 मध्ये शासनास सादर होऊनही त्याबाबत कोणाताही ठोस निर्णय वा धडक कार्यवाही अद्यापि न होणे, आयुर्वेदीक महाविद्यालयील अधिव्याख्याता, व्यखाता ,प्रपाठक, विभाग प्रमुख ,पाठयनिर्देशक आणि तत्सम कर्मचारी वर्गाची आकृतीबंधानुसार रिक्तपदे तात्काळ भरण्याची आवश्यकता आणि
शासनाची भूमिका या महत्वाच्या बाबतीसंबंधी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे कृपया ती स्वीकृत करावी ही विनंती."

सभापति महोदय, महाराष्ट्र राज्य में आयुर्वेद संचालनालय के नियंत्रण में मुंबई, नागपुर, नांदेड व उस्मानाबाद इत्यादि शहरों में जो आयुर्वेदिक महाविद्यालय चल रहे हैं, उनमें विद्यार्थियों की संख्या और बॅड्स की संख्या को देखते हुए वैद्यकिय अधिकारियों और कर्मचारियों की संख्या पर्याप्त नहीं है. भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद ने वर्ष 2000 में इस बारे में महाराष्ट्र शासन को निर्देश दिए थे और इन निर्देशों के अनुसार जो स्टाफ अपाइंट करना चाहिए था, वह नहीं किया गया है. इसकी वजह से विद्यार्थियों को बहुत ज्यादा कठिनाई होती है. इस विशेष उल्लेख के माध्यम से मैं शासन से विनंती करता हूँ कि भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद के निर्देशों पर अमल करते हुए वैद्यकीय अधिकारियों और अन्य स्टाफ की नियुक्ति करें. धन्यवाद.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : राज्यातील निवृत्त झालेल्या शिक्षकांना निवृत्ती वेतन मिळण्यास होत असलेला विलंब

मु.शी: राज्यातील निवृत्त झालेल्या शिक्षकांना निवृत्ती वेतन मिळण्यास होत असलेला विलंब याबाबत श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते. :

" पेन्शन केसेस मंजूर करण्याचा अधिकार उपसंचालकांकडून शिक्षणाधिका-यांकडे देण्यात आला आहे असे असतांना मंजुरीचा अधिकार कोणाचा यावर वाद निर्माण होऊन महाराष्ट्र शासनाकडून आदेश आल्याशिवाय पेन्शन केसेस पाठवू नयेत असे वेतन पथकाकडून कळविण्यात आले. त्यामुळे निवृत्तांना निवृत्ती वेतन मिळण्यास विलंब होत आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्याने त्यावर चर्चा करण्यासाठी मी तो आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छिते कृपया परवानगी द्यावी. "

सभापती महोदय, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना निवृत्ती सबंधीचा लाभ लवकरात लवकर मिळावा यासाठी शासनाने आदेश काढला परंतु त्याचा अर्थ न कळल्यामुळे किंवा विपरित अर्थ लावल्यामुळे गोंधळ निर्माण झाला आहे.त्यासाठी या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाचे लक्ष वेधणार आहे.निवृत्तीनंतर निवृत्तीचे लाभ तातडीने मिळावेत, वेळाचा अपव्यय होऊ नये म्हणून शिक्षणाधिका-यांना अधिकार देण्यात आलेले आहेत. यासाठी शिक्षण उपसंचालकांकडे जाण्याची काही गरज नाही.त्यांच्यापर्यन्त प्रकरणे नेऊ नयेत असे शासनाने सांगितले आहे परंतु सांगली च्या वेतन पथकातील पेन्शन केसेस मंजूर करण्याचा अधिकार कोणाचा ....

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती रायकर ...

याबाबतीत शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सांगली आणि वेतन पथक प्राथमिक विभाग अधिक्षक यांनी संपूर्ण शासन आदेशाचा संदर्भ व योग्य समर्थनीय उत्तरे पाठविली तरी देखील त्यांनी 16.3.2005 या पत्रान्वये पेन्शन केसेस मंजूर करणे अधिकार कोणाचा यावरून पेन्शन केस फाईल बंद करून परत पाठविल्या आहेत आणि मंजुरीचा अधिकार कोणाचा यासाठी महाराष्ट्र शासनाकडे हा प्रश्न मंजुरीसाठी पाठविला आहे. तोपर्यंत पेन्शन केसेस सादर करू नयेत असे संबंधित सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळविले आहे. अध्यक्ष महाराज, हे मी सांगलीचे प्रकरण सांगितले आहे अशी इतरही ठिकाणी प्रकरणे असण्याची शक्यता आहे. तेव्हा याबाबतीत परत स्पष्ट ऑर्डर्स काढण्याची गरज आहे यासाठी मी हा विषय 'विशेष उल्लेख'च्या निमित्ताने येथे उपस्थित केला आहे. त्याची दखल शासनाने घ्यावी ही विनंती.

****

....... एफएफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रत्नागिरी मंडळाच्या हद्दीतील मुंबई-गोवा महामार्गाची झालेली दुर्दशा.

**मु.शी.** : सार्वजनिक बांधकाम विभ्ंागाच्या रत्नागिरी मंडळाच्या हद्दीतील मुंबई-गोवा महामार्गाची झालेली दुर्दशा याबाबत डॉ. अशोक मोडक यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "सार्वजनिक बांधकाम विभ्ंागाच्या रत्नागिरी मंडळाच्या हद्दीतील मुंबई गोवा महामार्गाची दुर्दशा" या संबंधात 'विशेष उल्लेख' करीत आहे.

अध्यक्ष महाराज, सार्वजनिक बांधकाम विभाग रत्नागिरी मंडल (राष्ट्रीय महामार्ग) यांच्या कडून जिल्ह्यातील कामांबाबत दोन ठराविक ठेकेदारांनाच कामे देऊन मेहेरनजर दाखविली जात असल्याचे जाणवत आहे. हे ठेकेदार एक श्री.बी.डी.पाटील, कन्स्ट्रक्शन कंपनी,सावंतवाडी व दोन मे.डॉली कन्स्ट्रक्शन कंपनी,सातारा हे आहेत. गेली 5 वर्षे पंतप्रधान ग्रामसडक योजना व नॅशनल हायवे कडील देखभाल व दुरूस्तीची कामे ही फक्त बी.डी.पाटील कन्स्ट्रक्शन कंपनीलाच मिळताना दिसत आहेत. तसेच जिल्ह्यातील जे रस्ता लांबीची डांबरीकरण झालेले आहे त्या रस्त्याची सुस्थिती असतानाही पुन्हा पुन्हा त्याच लांबीची डांबरीकरणाची कामे काढून या कंपन्यांना दिली जात आहेत. या कामांच्या दर्जाबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी आहेत. साईडपट्टीच्या दुरूस्तीमध्ये वापरली जाणारी माती ही अत्यंत निकृष्ट दर्जाची असून त्याच्या तक्रारींकडे अधिकारी पूर्णत: दुर्लक्ष करीत आहेत.

या साईड पट्टीला वापरल्या गेलेल्या माती कामाचा दर्जा अत्यंत हीन असल्यामुळे अनेक गंभीर अपघात झालेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात तालुका कुडाळ येथील पावशी ते हुमरमळा या नॅशनल हायवे नं.17 च्या भागामध्ये साईड पट्टी व रस्त्याचा मध्यभाग यामध्ये 45 अंशाचा कोन असल्यामुळे वाहने चालविताना ती पूर्णपणे कललेल्या स्थितीमध्ये चालवावी लागतात. त्यामुळे वाहन

..... 2एफ 3 ...

KBS/ MAP/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 15:35

डॉ. मोडक ....

चालकांना वाहनांवर नियंत्रण ठेवणे मुश्किल होते. या सर्व बाबी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्या असता वरील ठेकेदारांच्या कामाच्या दर्जा तपासणीविषयी दुर्लक्ष करावे अशा सूचना वरिष्ठ पातळी वरून असल्याचे अधिकारी सांगतात. त्यामुळे या कामांच्या साईटवर एक सुद्धा पर्यवेक्षक अधिकारी हजर नसतो ही अत्यंत गंभीर बाब आहे. अध्यक्ष महाराज, 29 मार्च 2005 च्या दैनिक पुढारी या वृत्तपत्रातून याबाबत बातमी आली आहे तिचे कात्रण देखील माझ्याकडे आहे. त्यात म्हटलेले आहे की, या महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामात मोठा भ्रष्टाचार होत असल्याच्या गंभीर तक्रारी पुढे आल्या असून अनेकांनी याबाबत आवाज उठविण्यासाठी धाव घेतली आहे. रुंदीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे हात असल्याने भविष्यात या मार्गावरून वाहतूकही धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. रुंदीकरणासाठी मुरम माती ऐवजी पावडर सारखी निकृष्ट दर्जाची माती वापरली गेली असून त्याच पध्दतीने हे काम सुरू आहे. त्या पाठोपाठ आता साईडपट्टी खोदून जीएसबीचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी लागणारी खडी ही पावडरसह चार प्रकारची मिश्रित खडी पसरणे आवश्यक असते. मात्र स्वस्त मिळण ाारी फक्त चाळीस एमएम खडीच पसरवून वरती पावडर टाकून हे काम संबंधित उपरोल्लेखित ठेकेदार पूर्ण करीत आहेत. मात्र हे निकृष्ट दर्जाच्या कामामुळे हा महामार्ग भविष्यात वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनेल अशी शंका सर्वत्र व्यक्त होत आहे आणि त्यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी यात गांभीर्याने लक्ष घालावे आणि यामध्ये जो गैरव्यवहार चालला आहे त्याला पूर्णविराम मिळावा यासाठी मी या विषयी विशेष उल्लेख येथे करीत आहे, त्याची आपण गंभीरतेने दखल घ्यावी ही विनंती करतो आणि बोलणे संपवितो.

****

( यानंतर श्री. जागडे .... जीजी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील कुपोषित बालके.

**मु.शी.**: राज्यातील कुपोषित बालके याबाबत श्री. संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र राज्य हे सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक दृष्ट्या प्रगत राज्य समजले जाते. अशा राज्यात कुपोषणाने बालमृत्यू होतात. ही बाब महाराष्ट्रासाठी चिंताजनक आहे. राज्यामध्ये आदिवासी बांधवांच्या उत्कर्षासाठी अनेक कल्याणकारी योजना आजवर सुरु आहेत. पण कुपोषणाने होणा-या बालमृत्यूंच्या संख्येत दरवर्षी भर पडत असल्यामुळे या सर्व योजना कागदावरच आहेत, असेच म्हणावे लागेल. विदर्भ, खानदेश, ठाणे जिल्ह्यातील काही भाग या आदिवासींचा पट्टा म्हणून ओळखला जातो. विशेषत: मेळघाट, नंदूरबार, जव्हार, मोखाडा येथील कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण तांडव नेहमीच सुरु असते. आजघडीला राज्यात तीव्र कुपोषणाने 8 लाख तर अति तीव्र कुपोषणाने 1 लाख अशी 9 लाख बालके मरणासन्न अवस्थेत असून या प्रश्नाकडे सरकारचे असेच दुर्लक्ष राहिले तर दरवर्षी दीड ते अडीच लाख बालके तडफडून मरतील. येत्या 20 वर्षात हा आकडा 38 लाखांवर जाईल, असा धक्कादायक अहवाल डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील बालमृत्यू मुल्यमापन समितीने दिला आहे. समितीने केलेल्या अभ्यासात राज्यात 40 लाख बालके कुपोषित असल्याचे आढळून आले असून ग्रामीण भागात दरवर्षी 82 हजार बालमृत्यू होतात. तर आदिवासी भागात 23,500 आाणि शहरी भागातील झोपडपट्टयांत 56 हजार बालके दगावतात. कुपोषणाच्या प्रश्नावर राज्यात प्रत्येक अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला जातो. लोकसभेतही महाराष्ट्रातील कुपोषणाच्या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. मात्र आजपावेतो दीर्घ स्वरुपी उपाययोजना कुपोषणाच्या समस्येवर न राबविल्यामुळे आज या समस्येने गंभीर रुप धारण केलेले आहे. नुकत्याच केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये महिला व बालविकासासाठी सुमारे 1400 कोटी रुपयांचे जास्त प्रावधान करण्यात आले आहे. त्यामुळे काही

.....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ KGS/ MAP/ 15:40

श्री. संजय दत्त.....

अंशी हा प्रश्न सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. बहुतेक बालमृत्यू कुपोषण व जंतुदोषाचे रोग अशा संयुक्त कारणानी होतात. महाराष्ट्र शासनाने बालमृत्यू आणि कुपोषण हे दोन प्रश्नाना प्राथमिकता द्यावी. महाराष्ट्राचे घोषीत लक्ष 2010 सालापर्यन्त अर्भक मृत्यू दर 15 पर्यन्त कमी करणे प्राप्त करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती या तीनही शक्तीचा मेळ होणे आवश्यक आहे. त्यासाठी बालमृत्यू मुक्त महाराष्ट्र हे राज्यव्यापी अभियान सुरु करावे लागेल. बालमृत्यू झाल्यास निर्भयपणे कळवा, असे आश्वासन वातावरण शासकीय यंत्रणेत निर्माण होणे आवश्यक आहे. दारिद्र ही सर्वात महत्वाची समस्या आहे. आदिवासींना रोजगार मिळण्याची व्यवस्था त्वरीत करावयास हवी. कुपोषित मुलांना ग्रामीण रुग्णालयाच्या बरोबरीने आरोग्य केंद्रात भरती करण्याची परवानगी असावी. मातृत्व अनुदान योजनेस अनुदान वेळेवर मिळणे आवश्यक आहे. तसेच आदिवासींमध्ये विवाहाच्या वयाबाबत जनजागरण होणे गरजेचे आहे. सिकल सेल ॲनेमिया विषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करावयास हवी. कुपोषणाचा ही बाब पुरोगामी महाराष्ट्रास कलंकित करणारी असल्याने राज्य सरकारने त्वरीत ठोस उपाययोजना करावी, अशी विनंती मी आपणास या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पश्चिम द्रुतगती महामार्गावर वांद्रे येथै पूर्वेकडून पश्चिमेला जाण्यासाठी झालेला उड्डाण पूल.

**मु.शी.**: पश्चिम द्रुतगती महामार्गावर वांद्रे येथै पूर्वेकडून पश्चिमेला जाण्यासाठी झालेला उड्डाण पूले याबाबत श्री. मधुकर सरपोतदार यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" पश्चिम द्रुतगती महामार्गावर वांद्रे येथे पूर्वेकडून पश्चिमेस जाण्यासाठी उड्डाण पुलाची उभारणी करण्यात आलेली आहे. उड्डाण पुलाच्या उभय बाजुने माहीम कॉजवे मार्गावर जाण्यासाठी जो रस्ता तयार करण्यात आला आहे, तो अतिशय अरुंद असल्यामुळे विशेषत: सकाळी 9.00 ते दुपारी 12.00 व सायंकाळी 5.00 ते रात्रौ 9.00 वाजेपर्यन्त तेथील रहदारी ठप्प होते आणि वाहनांना रस्ता पार करुन जाण्यासाठी प्रतिक्षा करावी लागते. या संदर्भात तत्कालिन सार्वजनिक बांधकाम मंत्री ( सार्वजनिक्र उपक्रम ) यांना पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी या ठिकाणाला भेट देऊन वाहनांची ही अडचण दूर करावी अशी विनंती केली होती आणि संबंधीत मंत्रिमहोदयांनी त्याला प्रतिसाद देऊन तत्वत: मान्य केले होते. आता शासनामध्ये बदल होऊन नव्याने सार्वजनिक बांधकाम मंत्री ( सार्वजनिक उपक्रम ) नियुक्त झाले असले तरी समस्या मात्र जैसे थै अवस्थेत आहे व प्रतिदिन ती तीव्र बनत चालली आहे. सन 2004-05 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेद्वारे मी ही समस्या सभागृहामध्ये नव्याने मांडली आहे आणि सन्माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात प्रत्यक्षत जागेला भेट देऊन शक्य तितक्या लवकर उपाययोजना करण्याबद्दल आश्वस्थ केले आहे. तेथील रस्ता रुंद करण्यासंबंधी जाहिराती लावणयासाठी उभे केलेले काही लोखडी मनोरे हटवावे लागतील. हे केल्यामुळे रस्ताही रुंद होऊ शकेल. संबंधीत विभागाने या प्रकरणात लक्ष घालून त्वरेने रहदारीचा अतिशय बिकट झालेला हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास शिफारस करीत आहे."

--

( यानंतर श्री. सरफरे...

**पृ.शी.**: स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक

**मु.शी.**: स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयकावरील संयुक्त समितीच्या रचनेत केलेला फेरबदल.

श्री. दिलीप वळसे पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 20 - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, 2004 यावर विचार करण्यासाठी विधानसभेची सहमती घेऊन दिनांक 18 डिसेंबर 2004 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीच्या रचनेत फेरबदल करुन श्री. दिलीप वळसे-पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना उक्त समितीचे पदसिध्द सदस्य व समिती प्रमुख म्हणून नेमण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासकीय विधेयके**

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.

**L.A. BILL NO. XXIX OF 2005.**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)**

श्री.राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधा-तसभे-ते संमत ज्ेल्याप्रमाजे,मीआपल्या अ-तुमती-ते सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 29 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयज्‍ मांडज्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 29 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 144ब मध्ये तरतूद आहे. त्यामध्ये एसआरए योजनेच्या किंवा म्हाडा योजनेच्या 225 स्क्वेअर फूटाच्या सदनिकांना मालमत्ता करात 20 वर्षासाठी कमी दराने शासनाच्या अधिसूचनेच्या माध्यमातून कर आकारतो. त्या संदर्भात मागणी अशी आली आहे की, अल्प उत्पन्न गटासाठी व आर्थिक दुर्बल घटकातील लोकांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांच्या बाबतीत देखील सवलतीच्या दराने करामध्ये सवलत मिळावी. त्या अनुषंगाने हे विधेयक याठिकाणी आणले आहे. त्या संदर्भातील तरतूद 144 ब मध्ये आहे व त्याप्रमाणे 144 क मध्ये देखील समाविष्ट आहे. शासनाने सवलतीच्या दराने ज्या संस्थांना जमीन दिल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी 350 स्क्वेअर फूटाचे गाळे किंवा सदनिका बांधली असतील अशा सदनिका शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित केल्या जातील.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MAP पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:50

श्री.राजेश टोपे . . . .

अशा पध्दतीने मालमत्ता कर वेगवेगळया इमारतींना, त्याचबरोबर गाळयांच्या निरनिराळया वर्गासाठी निरनिराळे दर निश्चित करेल असे कलम 144(क) मध्ये दिलेले आहे आणि यासाठी ख-या अर्थाने मी हा प्रस्ताव येथे मांडत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

. . . .2 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक- 29 मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक मांडलेले आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आहे. यामध्ये कलम 144(ब) मध्ये आणखी भर घालून 144(क) असे कलम घालण्यात आलेले आहे. याबाबतीत शासनाच्या ही गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, आपण जी तरतूद करीत आहात, ती 350 चौ.फू.किंवा त्याहून कमी असणा-या गाळयांसाठी आहे. मला शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे की, मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळ हे खरे म्हणजे आर्थिकदृष्टया कमजोर असलेल्या वर्गासाठी निर्माण झालेले आहे आणि हे मंडळ निर्माण होऊन अनेक वर्षे झाली आहेत. हे मंडळ निर्माण झाल्यानंतर मुंबई शहरात अनेक खोल्या बांधल्या गेल्या, अनेक वसाहती निर्माण झाल्या. जसे शिवाजीनगर किंवा इतर निरनिराळया कॉलनी आहेत. संपूर्ण मुंबई शहरात अशा वसाहती आहेत. सुरुवातीला स्लम डेव्हलपमेंट अंतर्गत कार्यक्रम हाती घेतला गेला. त्याचबरोबर नंतर औद्योगिक कामगारांसाठी देखील वसाहती बांधण्यात आल्या. मला आठवते की, 1967-68 मध्ये या सर्व प्रभागात राहणा-या कामगार वर्गाने आणि तेथील रहिवाशांनी एक प्रचंड मोर्चा काढला होता. त्यावेळी माननीय कै.यशवंतराव मोहिते हे गृहनिर्माण मंत्री होते. त्यावेळी या लोकांनी अशी मागणी केली की, आम्हाला हे गाळे मालकी हक्काने द्यावेत. या मागणीचा सतत पाठपुरावा केल्यानंतर 1980 मध्ये हे गाळे औद्योगिक कामगारांच्या मालकीची झाली आणि त्यावेळेला असलेली किंमत म्हाडाने त्यांच्याकडून वसूल केली आणि हे गाळे हस्तांतरीत करुन त्या कामगारांच्या ताब्यात दिले. याठिकाणी तुम्ही 350 चौ.फू.च्या बाबतीत उल्लेख करीत आहात. पण 220-225 चौ.फू.जे गाळे आहेत, त्यावर सुध्दा मालमत्ता कर आकारला जात आहे. आज आपण कायद्यामध्ये सुधारणा करुन कलम 144(क) घालत आहात. पण ज्या इमारती 50-55 वर्षापूर्वी बांधलेल्या आहेत आणि ज्या दुरुस्त करण्यात आलेल्या नाहीत. त्या दुरुस्त करावयाच्या असतील तर त्या तेथील रहिवाशांनाच दुरुस्त कराव्या लागतात अशी स्थिती आहे. अशा अनेक इमारतींची परिस्थिती धोकादायक झालेली आहे. पण ती घरे मालकी हक्काने दिली म्हणून प्रॉपर्टी टॅक्स लागत असेल तर त्याबाबतीत काय करणार ? आपण आज एस.आर.ए.खाली बांधण्यात आलेल्या गाळयांचा दर्जा पाहिला तर असे दिसेल की, पुढच्या 20 वर्षांनी या इमारती

. . . .2 आय-3



APR/KGS/MAP 15:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

मोडकळीस येतील. मुंबईमध्ये गरीबांसाठी जी घरे बांधली जातात, त्यामध्ये दर्जा नावाची गोष्ट नसते. तर नुसती खुराडी उभी करावयाची, कबूतरखाने उभे करावयाचे आणि त्यावर टॅक्स लावावयाचा. याठिकाणी 20 वर्षाची सवलत दिलेली आहे आणि ही वर्षे बोलता-बोलता निघून जातील. आज सात-सात मजल्यांच्या इमारतींमध्ये झोपडपट्टीतील रहिवाशांना जागा दिलेल्या आहेत. तेथे लिफ्ट आहे. त्यावर होणारा खर्च,पाण्याचा खर्च, मालमत्ता कर इ.बाबी विचारात घेतल्या तर या रहिवाश्यांना 225 चौ.फू.च्या गाळयाच्या जागेसाठी दर महिन्याला जवळजवळ दोन हजार रुपये मेन्टेनन्स् साठी भरावे लागतील. ज्या लोकांचे महिन्याचे उत्पन्न 3 हजार रुपये देखील नाही, त्यांना जर मेन्टेनन्स् साठी दोन हजार रुपये खर्च करावे लागले तर त्या लोकांनी कसे जगावयाचे हा फार मोठा प्रश्न आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ पूर्वी सौ.रणदिवे..... 15:55

श्री.मधुकर सरपोतदार ( पुढे चालू.....

आपण चांगली गोष्ट केली. चटई क्षेत्रमध्ये मालमत्ता कर लावताना 20 वर्षापर्यन्त सवलत द्यावी अशाप्रकारची आपली सूचना आहे, परंतु 20 वर्षानंतर काय, आणि 20 वर्षाची एवढी लहान मुदत का घालता ? आज ज्यांची आर्थिक कुवत नाही -आज मुंबई शहर हे गरिबासाठी राहिलेच नाही, जास्तीत जास्त श्रीमंत लोकांचे हे शहर बनत चाललेले आहे. त्यांच्याकडून मालमत्ता कर वसूल करायचा आहे तो आपण करत आहात. पण यातील गरीब सेक्शन आहे, सर्वसाधारण माणसे आहेत त्यांच्याबाबतीत दहा वर्षांनी या मुंबई शहरामध्ये अशी परिस्थिती येईल की, घरकाम करण्यासाठी माणसे मिळणार नाहीत. अशी परिस्थिती मुंबई शहरामध्ये उभी रहाणार आहे. सर्वसामान्य माणसे या मुंबई शहरामधून तडीपार होणार आहेत. आपण जी घरे सांगत आहात, ती घरे जवळजवळ दहा-पंधरा वर्षामध्ये कोसळतील, त्या ठिकाणी पुन्हा टॉवर उभे रहातील, आकाशाला भिडणा-या, स्काय स्कॅपर ज्याला आपण म्हणतो, अशा गगनचुंबी इमारती उभ्या राहतील. त्या सगळयांकडे तुम्ही मालमत्ता करांच्यादृष्टीने पहाल, त्यातून प्रचंड प्रमाणावर मालमत्ता कर गोळा कराल. आज तुम्ही 20 वर्षासाठी सवलत देत आहात, पण 20 वर्षानंतर पुढे काय, हा माझ्यासमोर प्रश्न उभा आहे. ज्या इमारती 50 वर्षापासून मुंबई शहरामध्ये, हजारो, लाखो गाळे आहेत. त्यांच्याकडून आज महानगरपालिकने गाळे हस्तांतरित झाल्यापासून मालमत्ता कराची वसुली करण्यास सुरुवात केली, ही भयानक परिस्थिती आहे. या परिस्थितीचा गैरफायदा कोणत्याही संस्थेमध्ये -मग ती महानगरपालिका असो, अन्य शासकीय किंवा निम शासकीय यंत्रणा असो, त्यांनी घेऊन गरिबांना त्रास देऊ नये. सर्वसाधरण जीवन जगणारी माणसे आहेत, त्यांना मुंबई शहरामध्ये कोठेतरी स्थान असावे,या दृष्टीकोनातून आपण या सगळया प्रश्नाकडे पहाणार आहात काय, हा माझा आपल्याला प्रश्न आहे. म्हणून हे विधेयक जरी चांगले असले तरी सुदैवाने तुम्ही 350 चौ.फूटाचा उल्लेख केलेला आहे. परंतु 350 चौ.फुटापेक्षा ज्यांच्या गाळ्याचे क्षेत्रफळ कमी आहे, त्या लोकांच्याबाबतीत काय ? आज ज्या लोकांवर मालमत्ता कर लावला जातो त्या लोकांचे काय ? माझे मत असे आहे की, काही लोकांना 180 चौ.फुटाचे म्हाडाने गाळे बांधून दिलेले आहेत. आता 225 चौ.फूट बांधून देण्याची योजना आली. मग अशा पार्श्वभूमीवर ते एकदा मालक बनले की त्या ठिकाणी ताबडतोब मालमत्ता कर लागू होतो, या सगळया लोकांना याबाबतीत आपण सवलती देणार आहात काय, हा माझा या संदर्भातील प्रश्न आहे. सर्वसाधरण श्रम करणारा, कष्ट करणारा जो समाज आहे, असा बहुतांश समाज या घरामध्ये रहातो. या लोकांची काळजी घेण्याची नितांत गरज आहे. एक तर

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सगळे औद्योगिक कामगार बेकार झाले. त्यांना नोकऱ्या नाहीत. बेकार झालेली माणसे त्या घरामध्ये रहात आहेत. घराचा चरितार्थ चालविण्यासाठी डान्सबार ही संस्कृती निर्माण झाली, ती अशा गरजेतून निर्माण झाली. आपण आज मुंबईच्या बाहेरचे डान्सबार बंद केले, परंतु मुंबईतील डान्सबार बंद केले नाहीत. मुंबईतील डान्सबार का बंद केले नाहीत, कुणास ठाऊक. पण डान्सबारची संस्कृती कोठून निर्माण झाली ? त्यास कोणाची बेकारी कारणीभूत आहे ? अडीच लाख कामगार मुंबई शहरातील उध्वस्त झाला, त्यांची कुटुंबे उघड्यावर पडली आणि मालक मात्र त्या ठिकाणी गगनचुंबी इमारती बांधून ऐशारामामध्ये पहुडतात, अशाप्रकारचे भयानक चित्र मुंबई शहरामध्ये उभे राहिलेले आहे. अशा मालमत्ता कराचा विचार करताना या गोष्टीचा विचार होण्याची आवश्यकता आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, हे व्यापक बील असू द्यावे. 350 चौ.फुटापेक्षा कमी गाळे मुंबई शहरात आहेत, त्यावर मालमत्ता कर लावूच नये, अशाप्रकारची या विधेयकामध्ये तरतूद असेल तर मुंबई शहरातील लाखो हाऊसिंग बोर्डाच्या गाळ्यामध्ये रहाणा-या रहिवाशांनादेखील त्यापासून दिलासा मिळेल. मुंबई शहरामध्ये मूमीपुत्र म्हणून ज्या माणसांचा उल्लेख होतो, ती उद्या टिकून राहू शकतील. अन्यथा संपूर्णत: तमाम मुंबई शहरामध्ये ते दिसणार नाहीत. काय चमत्कार झ ााले ते मला माहीत नाही. हाऊसिंग बोर्डाच्या बिल्डिंग पाडून, हाऊसिंग बोर्डाशी साटेलोटे जमवून काही खाजगी बिल्डर्सनी अकरा-अकरा मजल्याच्या टॉवर्स उभ्या करण्यास सुरुवात केलेली आहे. हे टॉवर्स कोणत्याही योजनेखाली बांधलेले नाहीत. हे टॉवर्स तेथे रहाणारे ठराविक रहिवाशी आणि बिल्डर, म्हाडा आणि प्रशासन यांच्या संगनमताने उभ्या रहात आहेत. माझ्यासमोर काळजी आहे ती हीच आहे की, आज माणसांना वाटते की, वाऽ आज मी टॉवरमध्ये रहायला जातो आहे. मला जी जागा मिळते, ती 225 चौ.फुटाऐवजी 300 चौ.फूट मिळते आहे. मला आणखी एक खोली जास्तीची मिळते, म्हणून मी मजेत त्या टॉवरमध्ये जाऊन राहीन. परंतु प्रती दिन विजेच्या युनिटचे जे चार्जेस आहेत, ते वाढत चाललेले आहेत,त्या ठिकाणी लिफ्ट लावल्यानंतर किती युनिटस् खर्च होतील याची जरा कल्पना करा. कमीतकमी सात मजल्याच्या इमारती उभ्या राहतील. सुदैवाने मुंबई हायकोर्टामध्ये केस आहे. त्याबाबत आमच्या बांद्रा (प.) उपनगरामध्ये हायवेपासून दोन्ही बाजूला किती क्षेत्रामध्ये असे टॉवर उभे राहू नयेत, या संबंधीचे त्यांचे जज्जमेंट यावयाचे आहे.

यानंतर श्री.बरवड.....

अधिकृत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

परंतु सर्वसाधारपणे जे अंतरिम जज्जमेंट आले त्यात त्यांनी सांगितले की, या सगळया भागामध्ये असे टॉवर्स उभे राहता कामा नये. असे आदेश काढल्यामुळे काही कामे थांबली. ज्यावेळी असा काही आदेश येतो त्यावेळी मोठया प्रमाणावर भ्रष्टाचाराचा महापूर येतो आणि कशाही पध्दतीने त्या इमारती उभ्या राहतातच. माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, या मुंबई शहरामध्ये सगळा काळा पैसा घोंगावत आहे. या सगळया इमारतींची जर चौकशी केली तर त्या ठिकाणी काळे धन वापरले जाते आणि त्या काळया धनातून हे सबंध प्रोजेक्ट उभे राहतात. त्याच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. शासनाला कदाचित कराच्या रुपाने पैसा मिळेल, महापालिकेला पैसा मिळेल परंतु पुढे काय या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची आवश्यकता आहे. माझी शासनाला विनंती आहे की, आपण 350 चौरस फुटापर्यन्तच्या गाळयांना मालमत्ता करामध्ये 20 वर्षाची सवलत जाहीर केली आहे ती सवलत आपण 20 वर्षांऐवजी 50 वर्षे करावी अशी माझी सूचना आहे. त्यामुळे जो माणूस त्या ठिकाणी राहावयास जाईल तो श्वास घेऊन राहू शकेल. कोणत्याही प्रकारचे टेंशन घेऊन ते गाळे विकण्यास उद्युक्त होऊ नयेत अशी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीकोनातून मी या विधेयकाकडे पाहतो आणि या गोष्टींचा विचार करुनच हे विधेयक मंजूर व्हावे अशी सदनाला विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) सभापती महोदय, शासनाने या ठिकाणी जे मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक आणलेले आहे त्याचे मी स्वागत करतो. मी या बिलाचे स्वागत यासाठी करतो की, ज्या उद्देशाने बिल आणलेले आहे तो उद्देश नक्कीच चांगला आहे. मी बजेटवरील चर्चेच्या वेळी या विषयावर बोललो होतो. मालमत्ता कराचा जो प्रश्न निर्माण झाला त्यामध्ये फक्त दोन गोष्टींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. आपण यामध्ये फक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजना असे मर्यादित शब्द वापरलेले आहेत. माझे असे म्हणणे आहे की, निव्वळ झोपडपट्टी पुनर्विकास नाहीत तर पुनर्रचित चाळी म्हणजे जुन्या इमारती तोडून नवीन चाळी बांधणे किंवा ज्या इमारती धोकादायक परिस्थितीत आहे, ज्या इमारती कधीही कोलमडतील त्या इमारती पुन्हा घरदुरुस्ती मंडळातर्फे बांधल्या जातात त्या इमारतींमध्ये 225 चौ. फूट जागा देतो. जे बिल्डर जागा घेतात आणि चाळी डेव्हलप करुन पुन्हा उरलेला एफएसआय विकतात त्या ठिकाणी आपण 225 चौ. फूट जागा देतो. त्याला आपण झोपडपट्टी पुनर्विकास असे म्हणत नाही. कारण त्या ठिकाणी झोपडया नसतात तर चाळी असतात. त्या ठिकाणी विकासक येतो आणि चाळीतील लोकांना 225 चौ. फूट जागा देतो आणि सेलेबल एफएसआयमध्ये विक्रीसाठी इमारत बांधतो. हे केल्यानंतर ही चाळीत राहणारी माणसे कालपर्यन्त पाण्याकरिता 5 रुपये देत होती. परंतु आता त्यांना चाळीला 1 हजार लीटर्स पाणी देणार म्हणून 3 रुपये 50 पेसे प्रतिदिन आणि 2 रुपये 10 पैसे निचऱ्यापोटी असा कर महानगरपालिका आकारते. म्हणजे 3 रुपये 50 पैसे अधिक 2 रुपये 10 पैसे असे एकूण 5 रुपये 60 पैसे प्रतिदिन होतात. म्हणजे 30 दिवसांचे 168 रुपये महानगरपालिका आकारते. यापुढे मालमत्ता कर असा आकरला जातो की, ज्या विभागात ती पुनर्रचित इमारत बांधली गेली, मग गिरगाव असेल, दादर असेल, समजा गिरगाव भागात इमारत बांधत असतील तर त्याची रेटेबल व्हॅल्यू काढली जाते. समजा गिरगावात किंवा नाना चौकात एखादी इमारत बांधली आणि रेटेबल व्हॅल्यू 6 रुपये काढली तर त्यांना आपण 25 टक्के डिस्काऊंट देतो. त्या रेटेबल व्हॅल्यूमधून 25 टक्के काढले तर 4 रुपये 50 पैसे येतात. त्यानंतर तुम्ही सांगता की, आम्ही 20 टक्के मालमत्ता कर आकारु. साडेचार रुपयाचें 20 टक्के म्हणजे 90 पैसे होतात आणि 90 पैसे गुणिले 220 चौरस फूट याप्रमाणे 205 रुपये होतात किवा 202 रुपये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ MAP/ SBT

श्री. अरविंद सावंत .....

काही पैसे होतात. त्यामध्ये 168 रुपये मिळविल्यानंतर 370 रुपये होतात. म्हणजे त्या भाडेकरुला किंवा त्या नागरिकाला 370 रुपये भरावे लागतात. पहिल्या दहा वर्षाकरिता दरवर्षी 370 रुपये. 10 वर्षानंतर पुढच्या 11 ते 15 वर्षाकरिता 30 टक्के वाढवून 50 टक्के आणि 15 ते 30 वर्षाकरिता त्यामध्ये 30 टक्के वाढवून 80 टक्के आणि 20 वर्षानंतर 100 टक्के असे गणित आपण मांडलेले आहे. हे गणित पाहिले तर पहिल्या दहा वर्षाकरिता 370 रुपये, त्यानंतर ही रक्कम मालमत्ता करासह 580 रुपयांच्या घरात जाते. 15 ते 20 वर्षे या कालावधीमध्ये ही रक्कम 871 रुपये किंवा 900 रुपयांच्या घरात जाते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/ श्री.बरवडनंतर 16:05

श्री.अरविंद सावंत...

पाणीपट्टी आणि निच-यापोटी निव्वळ मालमत्ता करापोटी 1200 रुपये 20 वर्षानंतर द्यावे लागतील. म्हाडाच्या इमारती कधीच आकर्षक व चांगल्या नव्हत्या. परंतु सिडकोपेक्षा चांगल्या होत्या एवढेच म्हणता येईल. पवईसारख्या ठिकाणी म्हाडाने प्राईम लॅण्डवर इमारती बांधल्या. प्राईम व्हयूवर बांधल्या परंतु त्या विकत घेण्यासाठी कोणी आले नाही. त्याचे कारण असे की, त्या इमारती सुंदर, चांगल्या व सुबक नव्हत्या म्हणून लोक येत नव्हते. आता त्या इमारतींची 20 वर्षानंतर काय अवस्था होईल ? हया पुनर्रचित चाळीमध्ये काय घडत आहे ? त्या पुनर्रचित चाळी 4 मजली बांधल्या जात नाहीत तर 6-6, 7-7 मजली बांधल्या जात असल्याने लिफ्टचा खर्च आला. त्यामुळे त्या भाडेकरुंना मालमत्ता कराबरोबरच लिफ्टचा खर्च होणार आहे. मेंटेनंसवरील खर्च होणार आहे, वॉचमनसाठी खर्च होणार आहे यासाठी 500 रुपये दरमहा खर्च गृहित धरला तरी महिन्याकाठी त्याला 1700-1800 रुपये खर्च होणार आहे. त्यामुळे तेथे मराठी माणूस राहणार नाही, तो विकून निघून जाईल ही भीती मी त्यावेळी व्यक्त केली होती. त्याला अनुसरुन हे विधेयक येथे आले आहे असे मी समजतो. या विधेयकान्वये शासन आपल्याकडे अधिकार घेत असेल, पण शासनाने हा मालमत्ता कर कमी केला पाहिजे. कारण खरा मुंबईकर हया चाळींमधून राहत आहे. त्यांना पहिल्या वर्षासाठी 370 रुपये खर्च येणार आहे तो कायम स्वरुपी करावा. तरच मुंबईतील मराठी माणूस टिकेल अशी विनंती मी या बिलाच्या माध्यमातून करु इच्छितो. यामध्ये समाजातील आर्थिक दुर्बल घटक असा उल्लेख केलेला आहे. आर्थिक दुर्बल घटक म्हणतो तेव्हा झोपडपट्टीमध्ये राहणारा माणूस आर्थिकदृष्टया दुर्बल असतो असे नाही. परिस्थितीनुरुप त्याला जागा घेता येत नाही म्हणून तशी त्यात कंडिशन घालावी. मूळ चाळीमध्ये राहणारा माणूस आहे तो उपनगरामध्ये जाऊ शकत नाही, तो बँकेत नोकरी करतो पण येथे चाळीत राहतो. तो आर्थिकदृष्टया दुर्बल ठरत नाही. पण गिरगावामध्ये 25 लाखाचा फ्लॅट घेण्याची ताकद नसते म्हणून तो तेथेच राहतो. तो टिकला आहे म्हणून मराठी संस्कृती टिकून आहे आणि म्हणून मुंबई टिकून आहे. या बिलाचा उद्देश चांगला आहे. परंतु या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी नाही तर जे कोणी पुनर्रचित चाळीतील मूळ भाडेकरु आहेत आणि जे पुनर्रचित चाळीमध्ये जातील

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

ज्यांचे कालपर्यंत 10 रुपये, 20 रुपये भाडे होते त्यांना आता 1200 रुपये द्यावे लागतील, त्यामुळे तो टिकणार नाही, ज्या मूळ कारणासाठी तो टिकून आहे तो उद्देश असफल होईल आणि तो परागंदा होईल. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, हे चांगले बिल आणले आहे, जे आवश्यक होते. परंतु ते झोपडपट्टी पुनर्विकासापुरते मर्यादित ठेवू नका. आपण 350 चौ.फू.केले तरी त्याचे मी स्वागत करतो. कारण मूळ मुद्दा 225 चौ.फूटाच्या खोल्यांना होणारा त्रास हा आहे. मी मध्यंतरी नागरी निवारा योजनेबद्दल बोललो होतो. श्रीमती मृणाल गोरे यांनी तेथे बांधलेल्या खोल्या सुंदर, मोठया आहेत, म्हाडा आणि शासनापेक्षा चांगल्या आहेत. येथे 350 चौ.फू.जागेचा प्रश्न आणल्यामुळे मी त्याचे स्वागत करतो. माझी सूचना आहे त्या लक्षात घेऊन आर्थिकदृष्टया दुर्बल घटक न म्हणता पुनर्रचित चाळीतील मूळ भाडेकरुच्या चाळी होत्या ते भाडेकरु मालमत्ता कराचे पैसे देणार आहेत ते कायम स्वरुपी 370 रुपये ठेवावे. तरच तो माणूस राहील. याशिवाय त्यांना मेंटेनंसचे पैसे द्यावयाचे आहेत आणि 20 वर्षानंतर त्या इमारतीची काय अवस्था होईल हे आता सांगता येणार नाही. म्हणून त्याला वाचविण्यासाठी प्रयत्न करावा आणि या बिलाचे स्वागत करीत असताना त्यामध्ये दुरुस्ती कराल अशी अपेक्षा करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहासमोर विधेयक क्रमांक 29 वर चर्चा सुरु आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

पान क्र.2 वर कोणत्या उद्देशाने हे विधेयक शासनाने आणले आहे ते सांगितलेले आहे. त्याच्यामुळे कोणत्याही मध्यवर्गीय मराठी माणसाच्या झोपडपट्टयांच्या पुनर्वसन योजनेखाली ज्यांना 225 चौ.फू.ची जागा मिळाली आहे त्याचा किंवा पुनर्रचित इमारती यापैकी एकाचाही फायदा होणार नाही अशा शब्दांची यामध्ये रचना केली आहे. त्याला माझी सुधारणा आहे. त्याचे कारण असे की, 225 फूटांच्या खोल्यांमध्ये जे राहतात त्यांच्याकडून ही मागणी आली किंवा पीएमजीपीचा प्रकल्प आहे ज्यासाठी स्व.राजीव गांधी यांनी 100 कोटी रुपये दिले होते त्या योजनेतून जी घरे बांधण्यात आली त्याच्यासाठी तुम्ही पहिला जो बदल केला आहे त्याच्यामुळे काही फायदा होणार नाही. ज्या निवडक सोसायटयांनी सरकारकडे रिप्रेझेंटेशन केले आहे त्यांनाच फायदा मिळेल.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

कलम 144क मध्ये असे म्हटलेले आहे की, कलम 140मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) `अधिनियम, 2005 याच्या प्रारंभाचा दिनांक किंवा जागेचा प्रथमच ताबा घेतल्याचा दिनांक, यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून वीस वर्षाच्या कालावधीमध्ये..." टेक्निकॅलिटीमध्ये मी जात नाही. पण याचा फायदा कोणाला होणार आहे? 144कमध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "अशा प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांसाठी, गाळे बांधण्याच्या प्रयोजनासाठी, ज्या संस्थांना राज्य शासनाने नाममात्र दराने जमिनीचे वाटप केलेले आहे त्या संस्थांनी बांधलेल्या 350 चौ.फुटाहून अधिक नसलेल्या..." यामध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ येत नाही. कारण जमीन मालकाकडून म्हाडाच्या ॲक्ट प्रमाणे ॲक्वायर केलेल्या जमिनी कलेक्टरकडे दिलेल्या असतात. कलेक्टरने त्याचा ताबा म्हाडाकडे दिलेला असतो. ही जमीन नाममात्र भाड्याने केव्हा मिळणार हे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे यामधून ते लोक सुटतात. आपण एसआरअेच्या योजनेचा लोकांना फायदा देणार आहात. उदा. झोपडपट्टीवासीयांसाठी आपण 53 हजार घरे बांधलेली आहेत. या मधील कोणालाही फायदा मिळणार नाही. कारण या जमिनी नाममात्र भाड्याने दिलेल्या नाहीत. शासनाने त्या अक्वायर केलेल्या आहेत. म्हणून यासंदर्भात येथे क्लॅरिफिकेशन असणे आवश्यक आहे. "म्हाडा अंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारित ज्या इमारती येतील, झ ोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली ज्या इमारती येतील" असा स्पष्ट उल्लेख या विधेयकामध्ये केलेला नाही. त्यामुळे या लोकांना या विधेयकाचा काहीही फायदा होणार नाही. हे लोक या मंडळाकडे आले तर मंडळाचे अधिकारी या लोकांना हा कायदा दाखवतील आणि सांगतील की, 5 एप्रिलला हा जो कायदा झालेला आहे त्या कायद्यानुसार तुम्हाला फायदा मिळणार नाही. विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये आपण म्हटलेले आहे की, "महाराश्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून किंवा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, 1971 या अन्वये घोषित करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली किंवा झोपडपट्टीची सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या, केंद्र सरकारच्या, राज्य शासनाच्या किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही अन्य गृहनिर्माण योजनेखाली बांधण्यात आलेल्या व निवासाच्या

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

प्रयोजनासाठी वापरण्यात येणा-या इमारतींच्या संबंधात 20 वर्षाच्या कालावधीकरिता..." मला असे वाटते की, ज्या गोष्टी विधेयकाच्या उद्देश आणि कारणांमध्ये स्पष्ट केलेल्या आहेत त्या गोष्टी कायद्यामध्ये शब्दश: स्पष्ट केलेल्या नाहीत. त्यामुळे लोकांना या विधेयकामुळे फायदा होणार नाही. One can read between the lines. पण येथे असे कधी होत नाही. कायद्याचा अर्थ लावत असताना अधिकारी दोन ओळीमध्ये वाचत नाही तर कायद्याची शब्द रचना तो अधिकारी वाचतो. त्यामुळे तो ही सवलत लोकांना देणार नाही. म्हणून उद्देशामध्ये जे स्पष्ट म्हटलेले आहे ते कायद्यामध्ये येणे आवश्यक आहे. तसे ते आले नाही तर ज्या उद्देशाने आपण हा कायदा बनविला आहे तो उद्देश सफल होणार नाही. म्हणून हे क्रिस्टल क्लिअर असले पाहिजे.या कायद्यातील शब्द रचना अतिशय स्पष्ट असणे आवश्यक आहे. मी या ठिकाणी मा.सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती करु इच्छित नाही.  मा.सदस्य श्री. अरविंद सावंत आणि मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्या प्रमाणे 20 वर्षाचा कालावधी कशासाठी ठेवलेला आहे ? कारण 20 वर्षानंतर पुन्हा दोन गोष्टी पुढे येतील. या इमारतीचे अर्धे आयुष्य झालेले असल्यामुळे ही इमारत तुम्ही सोसायटीकडून ताब्यात घ्या, किंवा 20 वर्षासाठी तुम्हाला सवलत दिली होती. आता पाणीपट्टी वाढलेली आहे, बाकीचे चार्जेस वाढलेले आहे त्यामुळे त्या लोकांवर पुन्हा कर लादले जातील. याठिकाणी मी भाषिक अभिनिवेषाने बोलत नाही. अतिशय चांगल्या उद्देशाने हे बिल आणलेले आहे. या विधेयकामध्ये क्लॅरिटी असणे आवश्यक आहे.

श्री. राजेश टोपे : मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना यासंदर्भात हे विधेयक नाही. त्यासंदर्भात नवीन विधेयक शासन आणीत आहे. मा.सदस्यांचे कन्फ्यूजन होऊ नये.

श्री. मधुकर चव्हाण : श्री. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री असताना लोकांनी निवेदन केले आणि तेव्हा पासून या गोष्टीला चालना मिळत गेली आणि आता हे विधेयक याठिकाणी आलेले आहे. त्यावेळी श्री. मनोहर जोशी यांनी "भाडे कमी करता आले तर पहा" असे रिमार्क्स लिहिले होते. तेव्हा ज्या उद्देशाने आपण हे विधेयक आणलेले आहे त्यामध्ये या इमारती कव्हर होणार नाहीत. नाममात्र भुईभाड्याने घेतलेल्या अशा किती हौसिंग सोसायट्या असतील. फार तर 200



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 16:10

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

किंवा 300 असू शकतील. परंतु या ज्या गृहनिर्माण वसाहती मोठ्या प्रमाणावर आहेत त्यांना याचा फायदा होणार नाही. उदा. पेरु कंपाऊंडमध्ये ट्रान्झीट कॅम्प बांधलेले आहेत. त्याचे 1400 ते 1700 रु. भाडे लावलेले आहे.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

दुसरा भाग असा आहे की,सेक्शन 58 प्रमाणे एक अट घातली आहे. ज्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी आता ज्या चाळी आहेत. गिरण्यांच्या जमिनी विकताना आम्ही अट घालणार आहोत की, आधी गिरणी कामगारांचे पुर्नवसन केले पाहिजे. अशा पुर्नवसीत इमारतीमध्ये गिरणी कामगार जातील त्यांना नाममात्र भुईभाडयाने दिलेल्या जमिनीवर असा तुम्ही अयस अर्थ लावला तर त्यांना सवलत मिळणार नाही. त्यामुळे सेक्शन 58 प्रमाणे या लोकांच्या बाबतीत गिरण्यांच्या जमिनीवर तुमच्या धोरणाप्रमाणे गिरणी मालक किती अंमल करतील याबद्दल मला शंका आहे. सेक्शन 58 ची अंमलबजावणी योग्य झाली असे आपण गृहीत धरु, सुदैवाने त्या गिरणी कामगारांना जागा मिळतील असे गृहीत धरु. ते गिरणी कामगार सुध्दा यामध्ये कव्हर झाले पाहिजेत. नाही तर तुम्ही त्या कामगारांना सांगाल की, आम्ही तुम्हाला 225 चौ.फूट क्षेत्रफळाची जागा दिलेली आहे. आता तुम्ही 900 रुपये, 1000 रुपये, 1200 रुपये मेन्टेनन्स भरा. त्यांना असे सांगितले तर ते कामगार सरळ आपल्या जागा विकतील आणि गावी जातील किंवा डोंबिवलीच्या पलिकडे, अंबरनाथच्या पलिकडे, बदलापूरच्या पलिकडे रहावयास जातील. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, हे विधेयक या सभागृहात पास करुन घेण्यापूर्वी या ठिकाणी केल्या गेलेल्या सूचनांचे स्पष्टीकरण करावे. 350 चौ.फुटाच्या आत असलेल्या सदनिकेत गिरणी कामगार रहात आहेत अशा सर्व इमारती मग त्या मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणाने बांधलेल्या असतील. त्या झोपडपट्टी पुर्नवसन योजनेखाली बांधलेल्या असतील, या लोकांसाठी जेथे जेथे इमारती बांधल्या जातील तेथे रहाणा-या या सर्व कामगारांना मालमत्ता करामध्ये सवलत दिली तरच याचा फायदा होईल. नाही तर माझ्या कुठल्याही भूमिपुत्र मराठी माणसाला तुमच्या या अमेडमेंटचा फायदा होणार नाही. माझी पूर्ण विनंती आहे की, माझ्या सूचनाचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 29 सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे. या विधेयकास समर्थन देण्यासाठी व त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी सर्व प्रथम हे विधेयक आणल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. 350 चौरस फुटापेक्षा अधिक चटई क्षेत्र नाही अशा सदनिकांना मालमत्ता कराची सवलत मिळावी या संदर्भात सुधारणा सुचविलेली आहे. ती सुधारणा अत्यंत समाधानकारक आहे असे मला वाटते. समाजातील आर्थिकदृष्टया जो दुर्बल घटक आहे. या घटकामध्ये दलित,आदिवासी, ओ.बी.सी.बहुजन मागासवर्गीय, अल्प संख्याक या सर्व समाजाचा समावेश होतो. अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी किंवा ज्या समाज घटकांचे उत्पन्न अत्यंत कमी आहे अशा घटकांसाठी शासनाच्या वतीने निवासी गाळयांचे बांधकाम करण्यासाठी अत्यंत नाममात्र दराने जमिनीचे वाटप केले जाते. त्यावर जे निवासी गाळे बांधले जातात, त्या निवासी गाळयांवर मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम 140 अन्वये मालकत्ता कर बसविला जातो. त्यामध्ये सवलत मिळण्याच्या दृष्टीकोनातून हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे. सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा अधिनियम 1971 आहे. झोपडपट्टी पुर्नवसन योजनेखाली, झोपडपट्टी सुधारणेच्या नावाखाली केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या किंवा महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजना आहेत. या मुंबई महानगरीमध्ये रहाणा-या आमच्या गोरगरीब जनतेसाठी, कष्टकरी जनतेसाठी अत्यंत महत्वाच्या आहेत...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 16:20

प्रा. जोगेंद्र कवाडे ..

मा.सदस्य श्री. दादा सरपोतदार यांनी देखील याठिकाणी आपली भूमिका मांडली आहे. यामध्ये 20 वर्षांचा कालावधी जात आहे म्हणजे एक जनरेशन गॅप आहे. जनरेशनचा विचार करता या गोष्टीचा देखील मंत्रीमहोदयांनी विचार करावा अशी माझी मागणी आहे. अलिकडे मुंबई ही श्रीमंतांची होत चालली आहे. काही थोर लोकांची होत चालली आहे. भ्रष्टाचार करणारांची होत चालली आहे. डॉन लोकांची होत चालली आहे. फुकटखाऊ लोकांची होत चालली आहे. कष्टकरी मुंबईचे चित्र बदलत चालले आहे. कामगारांची मुंबई होती हे चित्र बदलत चालले आहे. मुंबईतील गिरणगांव आमच्या कामगारांचे गिरणगांव गिळंकृत केलेले आहे. गरीबांची मुंबई हे स्वप्न होत चालले आहे. चित्रपटनगरीतील किंवा समुद्र किना-यावरील स्वप्न नव्हे. देशातील आणि इतर राज्यातील लाखो लोकांना मुंबईमध्ये आस्था,प्रेम आहे. कष्ट करणा-या गरीब माणसाला सुध्दा या मुंबईबद्दल प्रेम आहे. येथे येणारे लोक कमीत कमी मेहनत करुन दोन वेळची कष्टाची भाकरी कमवू शकतो. खाऊ शकतो. याची गॅरंटी त्याला आहे.आपल्या राज्यातील तमाम जनतेमध्ये आणि देशातील तमाम जनतेमध्ये मुंबईबद्दल आस्था आणि प्रेम आहे. परंतु ही मुंबई नगरी हळूहळू बिल्डरांच्या घशात चालली आहे. कामगार नगरी राहिलेली नाही. कष्ट करणा-यांना येथे जागा नाही. गोरगरीब झोपडीमध्ये राहणा-या दुर्बल घटकांसाठी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी जे निवासी गाळे बांधण्यात येतात त्यासाठी सवलतीच्या दराने जमिनी गृहनिर्माण संस्थांना देण्यात येतात. त्या माध्यमातून त्यांच्यावर मालमत्ता कर लावला जातो. एसआरए योजनेच्या माध्यमातून झोपडपट्टी हलवायची आणि त्याठिकाणी बिल्डरांना जागा द्यावयाची आणि बिल्डरांनी गगनचुंबी इमारती बांधावयाच्या असे धोरण आहे. जो झोपडपट्टी धारक 5 रुपये पाण्याचे बिल देतो आणि 10-20 रुपये इलेक्ट्रीक बिल देतो अशा गरीब माणसाला एसआरए योजनेमधून 225 चौ.फूटाचे घर दिले जाते तो माणूस या एसआरए योजनेमध्ये कशा प्रकारे जीवन जगत असेल याचा विचार केला तर आर्थिकदृष्ट्या त्याला नागविण्याचा प्रयत्न या माध्यमातून होता कामा नये. एसआरए योजनेखाली बांधलेल्या अनेक इमारतींमध्ये लिफ्टची सोय नाही. लिफ्ट बंद पडली तर छोटया मुलांना तसेच आजारी माणसांना अतिशय त्रासदायक होते. एसआरए योजनेमधून ज्या इमारती बांधल्या जातात त्यांना सरकार मदत करते. विकासकांना मदत करते. येथे झोपडपट्टीतून आलेले लोक असतात त्यांना पिटाळून लावण्याचा प्रयत्न विकासकांकडून होत असतो. जास्तीत जास्त पैसे घेऊन इतर

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ..

लोकांना घरे देण्याचा प्रयत्न केला जातो हे देखील आता शासनाच्या लक्षात आलेले आहे. हे धोके लक्षात घेऊन शासनाने यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. या विधेयकाच्या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आहेत त्यांच्यासाठी निवासी गाळे बांधले जाणार आहेत. यासाठी जी तरतूद केलेली आहे त्याचे मी समर्थन करतो शासनाला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

जयहिंद,जयमहाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मांडलेल्या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, यासंदर्भात याच सभागृहात यापूर्वी मी जुन्या इमारतीमधील पुनर्बांधणी झाल्यानंतर जे भाडेकरु तेथे रहावयास जातात त्यांना एस.आर.ए. स्कीम प्रमाणे सवलती देण्यात याव्यात यासबंधी मी जुलै 2001 मध्ये एक अशासकीय विधेयक मांडले होते. त्या सबंधी सविस्तर चर्चा झाल्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी मला विधेयक मागे घेण्याची विनंती केली होती. तेव्हा त्यांनी मला असे सांगितले होते की, या बाबतीत एक बैठक घेण्यात येईल व तातडीने निर्णय घेण्यात येईल. त्यावेळी मी असा आग्रह धरला होता की मी जे विधेयक आणले आहे तेच विधेयक शासकीय म्हणून आणण्यात यावे परंतु तशी प्रोसिजर नसल्यामुळे हे विधेयक मागे घेण्यास सांगण्यात आले होते.व ताबडतोब शासकीय विधेयक आणून त्याप्रमाणे अंमलबजाणी करण्यात येईल असा मला शब्द देण्यात आला होता. माननीय राज्यमंत्री श्री.सुनील तटकरे यांनी मला असे सागितले होते की ,या साठी एक बैठक घेऊ व त्यानुसार माननीय मंत्रिमहोदयांनी एक बैठक घेतली होती. महानगरपालिका आयुक्त त्या बैठकीला उपस्थित होते.त्यांनाही यासंबंधीची सर्व माहिती देण्यात आली होती व त्या बैठकीचे मिनिटसही तयार झाले होते. त्यावेही श्री.लाला हे या विभागाचे सचिव होते . त्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेला शासनाने निर्देश दिले होते व महानगरपालिकेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता.त्या प्रस्तावाच्या बाबतीत आम्ही पाठपुरावा केला होता व तो प्रस्ताव एक वर्षाच्या आत सरकार दरबारी दाखल करुन यासंबंधीचे विधेयक आणावे अशा प्रकारे 2001सालापासून आम्ही मागे लागलो आहोत आज 2005 साल सुरु असतांना दुर्देवाने ते बिल अजूनही आलेले नाही.असे मला सांगावयाचे आहे.आपण कोणासाठी हे करीत आहात ? कशासाठी करीत आहात ?ज्यावेळी एखाद्या योजनेच्या अंतर्गत झोपडपट्टी पुनर्बांधणीच्या संदर्भात मुंबईमध्ये वेगळा अध्याय लिहिला गेला होता.त्यावेळी झ ोपडपट्टी विकासाला वेगळी गती मिळाली होती.महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रम या दोन्हीच्या माध्यमातून फक्त

झोपडपट्टयांना रस्ते, पाणी व संडास देणे एवढया पुरतेच मर्यादित काम होते परंतु त्या ऐवजी या लोकांसाठी ख-या अर्थाने नवीन इमारतीत कायम स्वरुपी जागा मिळवून झोपडपट्टी निर्मूलन करण्याचे काम शिवशाहीमध्ये सुरु झाले होते.हे काम करीत असतांना तेथील लोकांच्या आर्थिक परिस्थितीचा योग्य विचार करुन, भाडयाच्या टॅक्सचे स्ट्रक्चर कसे असावे याचा विचार करुन त्यांना

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

कोणत्या प्रकारची सवलती दिली जावी याचा विचार करण्यात आला होता. या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केला होता.पहिली दहा वर्षे 20 टक्के, पुढची पाच वर्षे 50 टक्के, आणि त्यानतर दहा वर्षे 80 टक्के आणि 20 वर्षानंतर 100 टक्के या प्रमाणे टॅक्स लावण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री.कवाडे यांनी मघाशी 20 वर्षाच्या कालावधीचा उल्लेख जनरेशन गॅप असा केला होता. मला त्याबाबतीत आनंद झाला होता. त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे डिफाईन केलेले आहे.त्यापुढचे वाक्य मात्र दुर्देवी होते. 20 वर्षानंतर त्याच्या मुलाबाळाने हे पैसे कोठून भरावयाचे ? 20 वर्षामध्ये जर तो प्रगत झाला नाही व त्या टप्प्यापर्यन्त पोहोचण्याची क्षमता जर पुढच्या पिढीत आली नसेल तर त्या पिढीला कोणताही हक्क राहत नाही.कशासाठी लढावयाचे आणि कोणासाठी लढावयाचे असा प्रश्न निर्माण होतो. विकास म्हटल्यानंतर विकासाच्या परिणामाकरता आणि विकासाच्या सुविधांकरता आणि भोगवटाकरता आपण सज्ज असले पाहिजे केवळ आम्हाला भोगवटा मिळाला पाहिजे आणि त्यातून निर्माण होणा-या कटकटी मात्र आम्हाला नको असे सांगता येणार नाही.या संदर्भात मी सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांच्याकडून काही मुद्दे समजावून घेण्याचा प्रयत्न केला होता. आपण मुंबईच्या मूळ नागरिकांकरिता,मुंबईतील मूळ भूमिपूत्रासाठी, ज्यांनी पिढयानपिढया ही मुंबई उभी केली, ती सजवली आणि मुंबईचे अस्तित्व टिकवले आणि येथे आपली संस्कृती निर्माण केली तसेच जुन्या चाळीतील दहा बाय दहा च्या खोलीत राहून सुखी संसार करुन अनेक पिढयांना मुंबईमध्ये समर्पित केले ..

नतर श्री.सुंबरे .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 16:30

श्री. रावते ...

त्यांच्यासाठी मी 2001 मध्ये विधेयक आणून, तातडीने हे विधेयक मान्य करा अशी विनंती केली होती ती मान्य देखील केली गेली होती. परंतु मुंबई शहरामध्ये बेकायदा पध्दतीने झोपडपट्टीच्या माध्यमातून मुंबई बकाल करणारी, मुंबईत मिळेल त्या जागेवर खाजगीमध्ये देखील ती आपल्याच बापजाद्याची जागा आहे असे समजून ती बळकाविणारे जे झोपडपट्टीतील आहेत त्यांचे लाड किती करायचे हा प्रश्न निर्माण होतो. त्यांच्या बाबतीत शेवटी मतांच्या लाचारीने का होईना सत्ताधाऱ्यांना त्यांच्यापुढे गुडघे टेकावे लागतात परंतु त्यालाही आता कोठे तरी मर्यादा असल्या पाहिजेत म्हणून शिवसेनेने याबाबत ठाम भूमिका घेतली आणि 1995 नंतर या मुंबईमध्ये कोणालाही याबाबतीत वाव राहणार नाही, तो असता कामा नये असे सांगितले. तेव्हा त्या झोपडपट्टीच्या संदर्भात विकास झाला पाहिजे असे आम्ही म्हणतो. परंतु या संदर्भात आपण विधेयक आणताना मात्र या झोपडपट्टी विकासामध्ये कोणती गती घेतली आहे हे माहीत नाही. हे विधेयक कोणाच्या संरक्षणासाठी आणले आहे हे कळत नाही. झोपडपट्टीतील इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी हे आणले आहे काय ? यामध्ये आपण काही चांगले शब्द घातले आहेत. यामध्ये आपण म्हटले आहे की, '.... अन्वये घोषित करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली किंवा झोपडपट्टीची सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या, केंद्र सरकारच्या, राज्य सरकारच्या किंवा महापालिकेच्या कोणत्याही अन्य गृहनिर्माण योजनेखाली बांधण्यात आलेल्या...' अध्यक्ष महाराज, केंद्र सरकारच्या जमिनीचा विकास महाराष्ट्र शासन करते आहे का ? पण काल परवा रेल्वेने जेव्हा त्यांच्या हद्दीतील झोपड्या पाडावयास घेतल्या तेव्हा त्यांना तुम्ही ताबडतोबीने 500 घरे दिलीत. बी.जे.शिर्के आणि कंपनीने युती शासनाच्या काळात बांधावयास घेतलेल्यापैकी 500 तयार झालेली घरे तुम्ही त्यांना दिली. हा जातीयवादाचा प्रश्न नाही, परंतु या झोपडपट्टीमध्ये कोण रहात होते ? मोठ्या प्रमाणात बांगला देशी नागरिक तेथे शिरले होते. ज्यांना तुमच्या सरकारच्या काळात रेशन कार्ड मिळाले, ज्यांना तुमच्या सरकारच्या काळात मतदार याद्यांमध्ये स्थान मिळाले आणि ज्यांना आंतरराष्ट्रीय कायद्या प्रमाणे देखील नागरिकत्व घेण्यासाठी त्रास पडत नाही एवढ्या सुखसोईंनी, समाधानाने आणि सोपेपणाने आपण नागरिकत्व प्राप्त करून दिले त्यांना हे पर्यायी गाळे दिले आहेत, त्यांच्याकरिता ही सवलत आता ताबडतोब लागू होते आहे. परप्रांतीयांच्या सोयी बघत असताना, त्यांच्या गरीबी बद्दल मला काही म्हणावयाचे नाही, सर्वसामान्य गरीबाला सोयी-सवलती मिळाल्या पाहिजेत, हे सारे

..... क्यूक्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

ठीक आहे. परंतु वारंवार या सभागृहामध्ये कंठशोष करून, अनेक वर्षे या सरकारच्या मागे लागून, वैधानिक आयुधे वापरून, या सभागृहाच्या माध्यमातून त्यांच्या व्यथा मांडून देखील इकडच्या सदस्यांनी एकच भूमिका येथे बोलत असताना मांडली आणि ती म्हणजे पुनर्रचित इमारती आहेत, ज्या जुन्या चाळी आहेत त्यांच्या बाबतीतील निर्णय आपण केव्हा घेणार ? आम्ही असे ऐकले आहे की, खालच्या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी 'याबाबतीत आम्ही तातडीने अमलबजावणी करतो'

**( सभापतीस्थानी - माननीय सभापती )**

अशा प्रकारची घोषणा केली आहे. ....

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी जरा खाली बसावे.

....... क्यूक्यू 3 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वैधानिक विकास मंडळा संबंधातील माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशांबाबत उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत ..

**सभापती** : परवा म्हणजे 1 तारखेला या सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेता श्री.गडकरी यांनी "माननीय राज्यपालांनी कलम 371(2) अन्वये दिलेल्या निदेश" या संबंधात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. माननीय राज्यपालांनी घटनेच्या कलम 371(2) अन्वये अगोदर ज्या काही डायरेक्शन्स दिल्या होत्या त्या संबंधात नंतर त्याच पध्दतीने त्यांना पत्र लिहिले आणि त्यावर आलेले त्यांचे उत्तर या संबंधात या सदनामध्ये फार मोठ्या प्रमाणात ऊहापोह झाला. त्यावेळी सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.गडकरी, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि श्री.दिवाकर रावते यांनी त्या अनुषंगाने आपले विचार येथे मांडले. त्यानंतर माननीय अर्थमंत्री यांनी आणि सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांनीही आपले विचार मांडले होते. कोणत्या परिस्थितीत माननीय राज्यपालांच्या डायरेक्शन्सच्या अनुषंगाने राज्यामध्ये असणारा अनुशेष.. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील, या संदर्भात ज्या डायरेक्शन्स दिल्या होत्या त्याबाबत चर्चा केली. या संदर्भात माननीय राज्यपालांना शासनाने जे पत्र दिले आणि त्यावर त्यांचेकडून जे उत्तरादाखल जे पत्र दिले गेले त्याबाबतीतील शासनाची भूमिका येथे मांडण्यात आली. त्यावेळेस मी माननीय अर्थमंत्र्यांना सांगितले होते की, त्यांनी याबाबतीत पूर्ण अभ्यास करावा ....

( यानंतर श्री. जागडे .... 2आर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

या बाबत आपण तंज्ञांचा सल्ला घ्या आणि तो सल्ला येथे सांगा. त्यानंतर मला त्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याचा मुद्दा मांडला होता, त्या बाबतचा मी निर्णय राखून ठेवला होता. माननीय अर्थमंत्र्यांनी या ठिकाणी आपले मत व्यक्त केल्यानंतर मला निर्णय घेणे शक्य होईल. म्हणून माननीय अर्थमंत्र्यांना ॲडव्होकेट जनरल यांनी जो सल्ला दिला आहे, तो सदनासमोर सादर करावा.

श्री. जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, मा. ॲडव्होकेट जनरल यांनी जो सल्ला दिला आहे, तो मी सभागृहासमोर वाचून दाखवित आहे.

"Sub: Directives issued by the Governor under Rule 7 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and rest of Maharashtra Order, 1994.

I have carefully perused your letter dated April 02, 2005. I have also read The State of Maharashtra (Special Responsibility of Governor for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra) Order, 1994 made by the President of India under Article 371(2) of the Constitution and the Development Board for Vidarbha, Marathwada and rest of Maharashtra Rules, 1994.

Before considering the questions raised for my opinion, it is necessary to have a look at the said Rules and in particular Rule 7. Rules 7(1) postulates that the Governor may issue Directives from ***time to time*** and such directives **shall** be complied with by the Board.

Under Rule 7(2) the schedule of preparation of Plans and Budget are required to be submitted to the Governor in advance for his information.

Rule 7(3) and (4) requires the Governor to take into consideration the "requirements of the State as a whole" and the recommendations of the

.....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील......

Board for deciding upon allocation of funds amongst the Boards. For this purpose, under Rule 7(4) the Planning Department is required to indicate to the Governor the approximate amounts of total resources that may be available to the State Government for development expenditure during the subsequent year.

( यानंतर श्री. सरफरे.....

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Jayant Patil....

Under Rule 7(5), while working out the likely amount for development expenditure for the subsequent year, due consideration must be given to the amounts required by the State Government for the item of expenditure listed in clauses (i) to (ix) thereof, which includes any item of expenditure deemed fit as a requirement of the State, as a whole, by the Governor.

Rule 7(6) is important inasmuch as it mandates that if and when there is occasion to revise the amounts of development expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor immediately after the State Government decides on such review.

The Governor by his letter dated February 25, 2005 issued Directives under Rule 7 regarding region-wise distribution of outlay in Irrigation Sector and outlay for backlog removal in sectors other than Irrigation Department in the Annual Plan for the year 2005-2006. By letters dated March 17, 2005 and March 20, 2005, the Planning Department brought to the notice of the Governor the restrictions on the Annual Plan for the year 2005-2006. By the said letter dated March 20, 2005 the Governor was requested to review the Directives and issue fresh Directives by drawing his attention to expenditure required to be earmarked for purposes falling within the ambit of clauses (vii) and (ix) to Rule 7(5). By his letter dated March 20, 2005 the Governor accorded his approval to the proposal submitted by the Planning Department vide its letter dated March 17, 2005. In the light of the aforesaid, I answer the issues raised as under:

...SS-2..



Shri Jayant Patil...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Q.(1): Whether the Governor is vested with the power of amending, altering reviewing his own directives?

Ans. In my view, the Governor has a power to amend or modify any directive issued by him. Rule 7(6) itself provides that the State Government should intimate the Governor if there is occasion for it to revise the amount of development expenditure available as communicated to the Governor earlier. In fact, on a reading of the entire scheme of the State of Maharashtra (Special Responsibility of Governor for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra) Order, 1994 and the Rules it would appear that what is contemplated is a process of constant consultation, monitoring and review by the Governor if the circumstances so warrant. It is not as if the Governor having once issued a directive becomes "functus officio". On a conjoint reading of the provisions of Rule 7 it is clear that it is open to the Governor to issue directives from "***time to time***" as may be warranted by the changing circumstances. In the circumstances where upon the relevant facts and material being placed before the Governor particularly in respect of availability of resources for allocation taking into consideration the Heads specified in Rule 7, he is of view that fresh directives are warranted, he may issue the same. There is no prohibition or embargo on the Governor to modify his earlier directives.

Q.(2): Whether the directives can be changed in the form of letter? A strong argument was put up that the directives can be changed only by directives and not in a form of letter.

SS-3..



Ans. It is pertinent to note that there is no form prescribed for the manner and mode in which a directive is to be issued by the Governor. The only requirement is that this special constitutional responsibility of issuing a directive is performed by the

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Governor. The letter dated March 20, 2005 issued by the Governor records that the Governor was pleased to accord his approval to the proposal submitted by the Planning Department. In my view by issuing, the said letter dated March 20, 2005 the Governor has discharged his special responsibility and exercised the discretion vested in him by the Constitution and the Presidential Order, 1994.

Q.(3) Whether the directives issued by the Governor are mandatory in nature or otherwise?

Ans. This question has already been answered in the opinion dated December 17/18, 2003 given by the then Advocate-General Shri G.E. Vahanvati and I agree with his view completely.

Q.(4) Whether the provisions made in pursuance of letter dated March 20, 2005 in the Annual Financial Statement are violative of the directives of the Governor particularly; in Irrigation Sector. (It is stated here that in the directives dated 25-2-2005, the Governor has directed that Rs.4685.46 crore outlay has been allocated in the Irrigation Sector in Annual Plan 2005-06 and whereas the actual allocation made in pursuance of letter dated March 20, 2005 is of Rs.1941.94 crore.)

Ans. The provisions made in the Annual Financial Statement have been made in pursuance of the Governor's letter dated March 20, 2005 whereby the Governor has accorded his approval to making the provisions

..SS-4..



as per the proposal submitted to him by the Planning Department letter dated March 17, 2005. Since the provisions have been made in the Annual Financial Statement pursuant to Governor's letter, which in my view, amounts to a directive within the meaning of Rule 7, the same is in compliance with the Governor's directive and not in violation thereof.

Yours sincerely,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SD/-

(R.M. KADAM)

या नंतर सौ.रणदिवे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:45

श्री.जयंत पाटील . . . .

सभापती महोदय, याठिकाणी हे जे ओपीनिअन आलेले आहे, त्यातून राज्य शासनाने कोणत्याही घटनात्मक बाबींचे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन केलेले नाही हे दिसून येईल. त्यामुळे त्यादिवशी ज्या मुद्यांवर चर्चा झालेली होती, त्या मुद्यांची स्वयंस्पष्ट उत्तरे ॲडव्होकेट जनरल यांच्या सल्ल्यात किंवा निर्णयात आहेत. म्हणून राज्य शासनाने कोणत्याही बाबतीत माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे अनुपालन केलेले नाही असे कुठेही दिसत नाही.

----

. . . .2 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मागच्या वेळी या सभागृहामध्ये अतिशय महत्वाच्या प्रश्नावर तीन तास चर्चा झाली आहे. या चर्चेमध्ये आम्ही आपल्याकडे मागणी केली की, माननीय राज्यपाल महोदयांनी जे लेटर दिलेले आहे. त्या डायरेक्शन्स् आहेत की ते लेटर आहे ? मी माननीय ॲडव्होकेट जनरलसाहेबांना धन्यवाद देतो की, त्यांनी 15 डिसेंबर 2001 रोजी माननीय राज्यपाल महोदयांनी जे पत्र दिले आहे, त्याला पत्र म्हटले नाही तर त्याला डायरेक्शन्स् असे म्हटलेले आहे आणि प्लॅनिंग विभागाचे सेक्रेटरी श्री.शंकरन् यांच्या पत्राला त्यांनी जे 4 पानी उत्तर दिलेले आहे, त्याला त्यांनी लेटर म्हटलेले आहे.

Shri Gurunath Kulkarni: That amounts to directives.

श्री.नितीन गडकरी : असे म्हटले नाही. सभापती महोदय, माझ्याजवळ चार वर्षाचे माननीय राज्यपाल महोदयांचे डायरेक्शन्स् उपलब्ध आहेत. 15 डिसेंबरला त्यांनी ज्या डायरेक्टीव्हज् दिलेल्या आहेत, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "Directives of the Governor of Maharashtra under Rule 7 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and rest of Maharashtra Order 1994 regarding the region-wise distribution of the Annual Plan outlays, the quantum of backlog, time frame for its removal and region-wise and sector-wise allocation for the removal of backlog in the Annual Plan 2002-2003." या ज्या डायरेक्शन दिलेल्या आहेत, त्यामध्ये मी माननीय अर्थमंत्र्यांना एक प्रश्न विचारु इच्छितो. या सर्वोच्च सभागृहात भारतीय घटनेच्या आणि भारतीय घटनेच्या आधारावर असणा-या कलमांची जी चर्चा होत आहे, ती चर्चा या लोकशाहीच्या गुणात्मकतेकरता आणि या सभागृहाचा लौकिक आणि वैभव वाढवणारी आहे. मला याची कल्पना आहे की, माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या वक्तव्याबद्दल किंवा त्यांच्या एखाद्या लेटरबद्दल डायरेक्टली किंवा इन-डायरेक्टली, जाणतेपणी किंवा अजाणतेपणी मी स्वत: किंवा या सभागृहातील कोणताही सन्माननीय सदस्यांनी कोणतेही शब्द किंवा प्रतिक्रिया देणे हे लोकशाहीमध्ये योग्य नाही. त्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्णयाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची मल्लीनाथी मला या सदनात करावयाची नाही. पण याठिकाणी या सभागृहात माननीय वित्तमंत्र्यांनी महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल यांचे ओपीनियन दिलेले आहे. ॲडव्होकेट जनरल यांच्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे Advocate General is a person who is

..TT-3





श्री.नितीन गडकरी .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

advocate and who is appointed by the Government of Maharashtra. ॲडव्होकेट जनरल हा महाराष्ट्र शासनाचा सेवक आहे असे मी म्हणणार नाही. पण महाराष्ट्राला वेळोवेळी कायदेशीर सल्ला देण्याकरता अधिकृत ॲडव्होकेट म्हणून ॲडव्होकेट जनरल म्हणून काम करतात. ॲडव्हाकेकेट जनरल या पदाची सॅन्टीटी आहे. ते महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल आहेत. म्हणून त्यांचे वेतन, भत्ते, त्यांचा बंगला, त्यांचे अधिकार हे महाराष्ट्र शासनाने डिफाईन केलेले आहेत. आम्हाला मिळालेल्या गाईड लाईन मध्ये या सदनात कशावर चर्चा करावयाची आणि कशावर चर्चा करावयाची नाही याचे मार्गदर्शन आम्हाला विधानमंडळांच्या नियमांच्या पुस्तकात डायरेक्ट केलेले आहेत. आम्ही माननीय राज्यपाल महोदयांच्या वेतन, भत्ते, त्यांच्यावर होणारा खर्च तसेच माननीय सभापती, माननीय अध्यक्ष, माननीय उप सभापती, माननीय उपाध्यक्ष यांच्यावर होणा-या खर्चाबाबत सभागृहात चर्चा करीत नाही. असे संकेत आहेत. पण याठिकाणी आपल्याला जे स्थान प्राप्त झालेले आहे, जे स्थान माननीय राज्यपाल महोदयांना आहे, जे स्थान चीफ जस्टीस यांना आहे किंवा हाय कोर्ट जज्जनां जे प्रिव्हीलेज भारतीय घटनेने दिलेले आहेत, ते पिव्हीलेजेस मात्र ॲडव्होकेट जनरलसाहेबांना कॉन्स्टीटयुशनमध्ये कुठेही दिलेले नाहीत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 16:50

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू...

त्यामुळे ॲडव्होकेट जनरलचे जे ओपिनियन आहे, या ओपिनियचे खरे-खोटे करण्यासाठी मी आणि सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख असे मिळून मुंबई हायकोर्टामध्ये अपील केलेले आहे. त्याचा जेव्हा निकाल लागेल, तेव्हा सत्य महाराष्ट्रातील जनतेसमोर येईल. परंतु या ठिकाणी आपल्याला माहिती असेल की, आजपर्यन्त या देशात अनेक केसेसच्याबाबतीत निकाल झालेले आहेत. विशेषत: अलाहाबाद हायकोर्टामधील न्या. श्री.सिन्हा साहेबांच्या समोर केस होती. ज्यावेळेला या देशाच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या विरुध्द त्यावेळेचे त्यांचे विरोधक उमेदवार श्री.राजनारायण यांनी इलेक्शन पिटीशन केले होते, त्या इलेक्शन पिटीशनच्या सदंर्भामध्ये अलाहाबाद हायकोर्टामध्ये जी चर्चा झाली, ती चर्चा मला वाचावयास मिळाली. त्यावेळी अलाहाबाद हायकोर्टाने निर्णय दिला. त्यानंतर भारतीय घटनेमध्ये दुरुस्ती करण्यात आली की, या देशातील प्रधानमंत्री आणि राष्ट्रपती यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची केसच कोर्टात टाकता येणार नाही. अशाप्रकारची घटनात्मक दुरुस्ती त्यावेळेस पार्लमेंटनी केली. ज्यावेळी इमर्जन्सी लागली त्यावेळेस सुप्रीम कोर्टामध्ये कॉन्स्टीटयुशनल अमेंडमेंटच्यादृष्टीने चर्चा झाली. त्यावेळेस श्री. निरन डे हे देशाचे ॲटर्नी जनरल होते. त्यांना सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींनी प्रश्न विचारला की,उद्या अशा पदावर असणाऱ्या व्यक्तींनी किंवा आपण इमर्जन्सी लागू केली, त्या काळामध्ये असलेल्या सरकारी सेवकांनी एखाद्या माणसाला गोळी मारली, तरी देखील त्याला अपील करण्याचा अधिकार नाही, असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? असा सन्माननीय न्यायमूर्तींनी जेव्हा हा प्रश्न विचारला, तेव्हा श्री. निरन डे साहेबांनी सुप्रीम कोर्टामध्ये उत्तर दिले की, "My Lord, I am very sorry to say." मला आपण माफ करा, परंतु मला आपल्याला सांगितले पाहिजे की, ज्याप्रमाणे राज्यपाल, प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांनी काहीही केले तरी त्यांच्या विरुध्द कोर्टात केस टाकता येत नाही. त्याचप्रमाणे अशाप्रकारचे एखादे कृत्य जर इमजन्सी काळामध्ये कोणी केले असेल तर त्याच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची काहीही कारवाई करता येत नाही. मी याकरिता रेफरन्स दिला की, ॲडव्होकेट जनरलच्या ओपिनियनचा आधार घेऊन आमचे ओपिनियन सभागृहाच्या रेकॉर्डवर ठेवण्याबद्दलचा आक्षेप एखाद्यावेळी येईल, म्हणून त्याबाबतीतील खुलासा करण्याकरिता मी एवढीच विनंती करतो की, आमचा हा दूरगामी लढा आहे, हा लढा आम्ही विचारपूर्वक सुरू केलेला आहे. ही अन्यायाची आणि न्यायाची केस आहे. लोकशाहीच्या दरबारामध्ये आम्ही याबाबतीत संघर्ष करत राहू, हा आमचा वैधानिक अधिकार आहे, आमचा कॉन्स्ट्युशनल राईट आहे, त्यापासून आम्हाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू...

कोणी परावृत्त करु शकत नाही. या भारतातील कोणतीही ताकद या मागासलेल्या भागातील जनतेच्या हक्कापासून दूर करण्याची वैधानिक ताकद कोणामध्येही नाही, तो आमचा अधिकार आहे. राज्यपाल महोदयांच्याबाबतीत आणि आपल्याबाबतीत पूर्ण सन्मान ठेवून आपण कोणताही निर्णय द्याल,त्या निर्णयाचे पालन करण्याचा आपल्याला विश्वास देऊन, ॲडव्होकेट जनरलने दिलेल्या ओपिनियनबद्दल काही मुद्दे मी आपल्या विचारार्थ मांडतो. मला खुलासा पाहिजे की, हे जे पत्र आहे,त्यामधील डायरेक्टीव्हज चार वर्षाच्या आहेत, ते एका टाईपचे आहेत. सभापती महोदय आपण हे डायरेक्टीव्ह पाहिलेले आहेत. मी डायरेक्शनचे डिक्शनरी मिनिंग काढले. त्यामध्ये "to act as a director", "to direct letters etc. commentary", "a direction aimed at a certain point", "the line or course in which anything moves or on which any point lies; actings, command, the body of persons who guide or manage a matter, the address or written name and residence of a person." असे म्हटले आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मला फक्त आपल्याला एवढेच म्हणावयाचे आहे की, ॲडव्होकेट जनरलनी सुध्दा आपल्या पत्रामध्ये अतिशय सूचकपणे काही ठिकाणी लेटर असा शब्द वापरलेला आहे आणि काही ठिकाणी डायरेक्टीव्हज हा शब्द वापरलेला आहे. आमचे प्रधान सचिव म्हणा किंवा अतिरिक्त मुख्य सचिव श्री. शंकरन ज्या पदावर आहेत, त्यांनी जे पत्र माननीय राज्यपाल महोदयांना दिले त्या पत्राच्या शेवटी त्यांनी जी विनंती केलेली आहे त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "Either you change your Directives or give us fresh Directives. वास्तविक ते असे म्हणू शकले असते की, "Sir, we have submitted this proposal in such a situation, which Government of Maharashtra is facing. So we will request you to consider our request and issue the fresh orders or issue the fresh letter." इश्यू दी फ्रेश ऑर्डर किंवा इश्यू दी फ्रेश लेटर असे न म्हणता त्यांनी असे शब्द वापरले की, "Either you give us a fresh directives" किंवा तुम्ही या डायरेक्शन्समध्ये सुधारणा करा. याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचे असे इंटेंशन होते की, माननीय राज्यपाल महोदयांच्या डायरेक्शन्समध्ये त्यांना नवीन डायरेक्शन्स पाहिजे होत्या किंवा जुन्या डायरेक्शन्समध्ये सुधारणा पाहिजे होती. सभापती महोदय, या चारही डायरेक्शन्स ज्या आलेल्या आहेत त्यामध्ये ही पहिली डायरेक्शन 15 डिसेंबरला आलेली आहे. त्यानंतरची 12 मार्च, 2003 ला आलेली आहे. ही 25 फेब्रुवारी, 2005 ला आलेली आहे. तिसरी 23 फेब्रुवारी, 2004 ला आलेली आहे. एक डायरेक्शन 15 डिसेंबर 2001 ला आलेली आहे. सभापती महोदय, या सगळया डायरेक्शन्स फेब्रुवारी आणि मार्च या महिन्यांच्या मध्येच आलेल्या आहेत. माननीय राज्यपाल महोदयांनी मुहुर्त काढला होता काय की ज्यामुळे त्यांनी याच काळात या डायरेक्शन्स दिल्या ? माननीय राज्यपाल महोदयांनी या डायरेक्शन्स देण्याकरिता मुहुर्त काढला नव्हता. माननीय राज्यपाल महोदयांनी या काळामध्ये या डायरेक्शन्स याकरिता दिल्या होत्या की, येणाऱ्या मार्चमध्ये होणाऱ्या बजेट अधिवेशनामध्ये जे बजेट माननीय वित्त मंत्री तयार करणार आहेत ते तयार करीत असताना या डायरेक्शन्सप्रमाणे सरकारने काम करावे म्हणून या डायरेक्शन्स दिल्या होत्या. सभापती महोदय, या ठिकाणी ओपिनियन आलेले आहे. श्री. वहानवटी साहेबांनी सांगितले की, या डायरेक्शन्स मँडेटरी आहेत. आता जे ॲडव्होकेट जनरलचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP

श्री. नितीन गडकरी .....

पत्र आलेले आहे त्यांनीही सांगितले आहे या डायरेक्शन्स मँडेटरी आहेत. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. या डायरेक्शन्स मँडेटरी आहेत म्हणजे बंधनकारक आहेत. कलम 371(2) खाली सरकारवर बंधनकारक असणाऱ्या डायरेक्शन्स माननीय राज्यपाल महोदयांनी दिल्या आणि ॲडव्होकेट जनरल साहेबांच्या ओपिनियनप्रमाणे त्या बंधनकारक आहेत. इथपर्यन्तच्या गोष्टी सरकारला मान्य आहेत. सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, बजेट तयार करीत असताना जो कमिटेड एक्स्पेंडीचर असेल तो सरकारने पहिल्यांदा ठेवावयास पाहिजे. त्यामध्ये सरकार कोणत्याही परिस्थितीत टाळू शकत नाही असा अत्यावश्यक खर्च असतो. त्यामध्ये पगार असतो, वेतन असते, गाडयांचा खर्च असतो, जनरल खर्च असतो. याबाबत चार पाच पध्दतीच्या व्याख्या आहेत. ज्यावेळी डिस्क्रियेशनरी बजेट येईल, त्याची जेव्हा अमाऊंट येईल त्याच्यानंतर त्याबाबतीत मात्र मग सरकारला डायरेक्शन्सचे पालन करुन नंतर बजेट द्यावयास पाहिजे. माननीय अर्थमंत्र्यांनी जो 11 हजार कोटी रुपयांचा प्लॅन केलेला आहे त्यामध्ये सरकारवर बंधनकारक असणाऱ्या तरतुदी किती रुपयांच्या आहेत आणि त्यानंतर डायरेक्शन्स पाळण्याकरिता किती रक्कम उरलेली आहे याचा जर आपण शोध घेतला तर सरकारचा आवश्यक असणारा खर्च संपल्यानंतर माननीय अर्थमंत्र्यांनी आपले डिस्क्रियेशन वापरलेले आहे. काही पुतळे उभे करावयाचे असतील, काही स्मारक उभे करावयाचे असतील पण हे मँडेटरी नाही. मला सन्मान आहे. आपण जरुर पुतळा उभा करा. त्याला माझा विरोध नाही. पण सभापती महोदय, बजेटमधील पहिल्या पार्टमध्ये जो आवश्यक खर्च आहे, जो सरकारवर आणि अर्थमंत्र्यांवर बंधनकारक आहे ती तरतूद आधी करणे, त्याच्यानंतर डिस्क्रिएशनरी जे बजेटरी फंड्स होते त्यामध्ये त्यांनी पहिल्यांदा इरिगेशन सेक्टरला हात लावावयास पाहिजे होता. सरकारवर आणखी एक बाब बंधनकारक होती ती म्हणजे विशेष घटक, शेडयुल्ड कास्ट याकरिता बजेटची किती टक्के प्रोव्हीजन करावयाची आहे आणि शेडयुल्ड ट्राईब करिता किती टक्के प्रोव्हीजन करावयाची आहे. मी एक वेळा हेही मान्य करतो की त्यांची प्रोव्हीजन केल्यानंतर उरलेले जे पैसे होते त्या पैशामध्ये अर्थमंत्री महोदयांना माननीय राज्यपाल महोदयांच्या डायरेक्शनप्रमाणे इरिगेशनची तरतूद करावयास पाहिजे होती. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय अर्थमंत्री डायरेक्शन्सप्रमाणे वागले नाहीत. म्हणून ही जी

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP

श्री. नितीन गडकरी ...

मधली गॅप होती की, अर्थमंत्र्यांना यामध्ये जी अमाऊंट देता आली असती त्याऐवजी त्यांनी आपल्या डिस्क्रियेशनरी पॉवर वापरल्या आणि त्यातील प्रोव्हीजन केली. त्यांच्या डिस्क्रिएशन प्रमाणे इरिगेशनकरिता 1900 कोटी रुपयांची रक्कम ठेवली. त्यातील हजार कोटी रुपये केंद्र सरकारचेच आहेत. 200 कोटी रुपये नाबार्डचे कर्ज आहे आणि प्रत्यक्षात या राज्याच्या इतिहासात त्यांनी ॲप्रॉक्झ ीमेट्ली 750 कोटीचे इरिगेशनचे बजेट तयार केले.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ MAP/ MHM/ श्री.बरवडनंतर 17:00

श्री.नितीन गडकरी....

याठिकाणी घटनेचा भंग झालेला आहे. या डायरेक्शन्सचा मा.अर्थमंत्र्यांनी भंग केलेला आहे. त्यांना ख-या अर्थाने तरतूद करावयाची होती तर त्यांनी असे सांगितले पाहिजे होते की, त्यांच्या डिस्क्रीएशनचा चॅप्टर सुरु होतो त्याठिकाणी मँडेटरी डायरेक्शन्सची अंमलबजावणी करावयास पाहिजे होती, ती केली नाही. सभापती महोदय, आमचे दुर्दैव आहे की, आम्ही खडकावरवरच डोके आपटण्यासाठी निघालो आहोत. त्यामुळे त्याची चिंता नाही आणि अर्थमंत्र्यांना दिलेल्या निदेशाप्रमाणे वागण्याची चिंता नाही. हया डायरेक्शन्स चारवेळा दिल्या आहेत. हा एक विनोदी नाटकाचा प्रयोग आहे. त्यांनी दरवर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये डायरेक्शन्स द्यावयाच्या. दरवर्षी बजेटच्या 10 दिवस आधी यांनी अडचणीचे पत्र द्यावयाचे आणि हे मा.अर्थमंत्री याच वर्षी असे म्हणाले की, यावर्षी स्थिती फार उत्तम झालेली आहे, सक्षम झालेली आहे. चांगली झालेली आहे. आता महाराष्ट्राची आर्थिक स्थिती मजबूत झालेली आहे याचा अर्थ श्री.शंकरनसाहेब ज्या भावना पत्रात लिहितात त्या भावनांच्या नेमके विपरित त्यांनी बजेटमध्ये मांडले की आता महाराष्ट्र एका खंबीर आर्थिक स्थितीमध्ये आलेले आहे. श्री.शंकरनसाहेब लिहितात की, साहेब आमच्याजवळ पैसे नाहीत, आम्ही ही तरतूद करु शकत नसल्यामुळे निदेशांचे पालन करण्याची अडचण आहे. आता श्री.शंकरनसाहेब खरे बोलतात की मा.श्री.जयंत पाटीलसाहेब बोलतात हे कोणी सांगावे ? पण दोघांनी वेगवेगळया गोष्टी सांगितल्या आहेत. राज्यपाल महोदयांना श्री.शंकरनसाहेबांचे पत्र गेले आहे ते "by the order of the Government" म्हणून गेलेले आहे. म्हणून एकिकडे श्री.शंकरनसाहेबांचे ते पत्र नाही. Government means a minister, Cabinet. म्हणून मी श्री.शंकरनसाहेबांना दोष देत नाही. मी मा.अर्थमंत्र्यांना दोष देतो की, तुम्ही इकडे बजेटच्या भाषणामध्ये सांगतो की, महाराष्ट्राची स्थिती चांगली आहे, महाराष्ट्र एक भक्कम पायावर उभा आहे, आम्ही आता सगळया गोष्टी करणार आहोत, आम्हाला चिंतेचे कारण नाही, यातून महाराष्ट्र बाहेर निघालेला आहे. हे तुम्ही 3 वर्षे लिहिले त्यावेळी कदाचित तुम्ही अडचणीमध्ये होता. पण तुम्ही 3 वर्षे हे सांगितले नाही की, महाराष्ट्राची आर्थिक स्थिती खराब आहे. परंतु यावर्षी बजेटमध्ये म्हणाले की, स्थिती फार चांगली आहे, सगळे बरोबर आहे. तुम्ही जोरदार डमरु

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ MAP/ MHM/

श्री.नितीन गडकरी....

वाजविला. आता राज्यपालांना लिहिता की, अडचणीची स्थिती आहे आणि बजेटच्या भाषणामध्ये सांगता की स्थिती फार चांगली आहे म्हणजे खरे काय आहे ? हे मला समजत नाही. मी या सगळया विषयाचा अभ्यास करीत होतो त्यावेळी महाराष्ट्राच्या माजी ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे सगळया केसेस रेफर करुन चर्चा करीत होतो. त्यांनी माझ्या लक्षात आणून दिले की, एकिकडे वित्त मंत्र्यांनी बजेटमध्ये सांगितले की, महाराष्ट्र एकदम चांगल्या स्थितीमध्ये आहे. अर्थमंत्र्यांनी हे दूरदर्शनवर बोलल्याचे मा.सदस्य श्री.सुधाकर गणगणे आपण पाहिले की नाही ? हे बोलले की, आता काळजी करु नका, ते सगळे संपले आहे, वाचलो आहे (अडथळा) खरे आहे तेच तर मी म्हणतो की खरे आहे. मा.सदस्य श्री.विलासराव शिंदे आणि मा.सदस्य श्री.शेवाळे जे बोलले ते खरे बोलले आणि मी हेच बोलतो. मग हे जर खरे आहे तर मग या वर्षाच्या डायरेक्शन्स देऊन याठिकाणी मॅंडेटरी प्रोव्हिजन होती ती का केली नाही हाच माझा प्रश्न आहे. सभापती महोदय, जर मा.अर्थमंत्री म्हणतात हे खरे आहे तर या वर्षी श्री.शंकरनसाहेबांना मा.श्री.अर्थमंत्र्यांनी पत्र का लिहिण्यास सांगितले ? माझे ते उत्तम मित्र आहेत, एक उत्तम संसदपटू आहेत, एक सूज्ञ नागरिक, सुसंस्कृत नागरिक आहेत, (अडथळा) मी हे मा.श्री.जयंत पाटील यांच्याबद्दल बोलत आहे. या पत्रामध्ये ही जी विसंगती आहे त्याचे उत्तर मला समजत नाही. This fact is proved on record. दुसरी गोष्ट यापेक्षा भयंकर आहे. राज्यपालांचे अभिभाषण विधिमंडळासमोर झाले आहे. राज्यपालांच्या भाषणाबद्दल आम्ही चर्चा केली. राज्यपालांचा पूर्ण सन्मान ठेवून त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची डायरेक्टली वा इनडायरेक्टली टीका करण्याचा माझा उद्देश नाही. मा.श्री.जयंतराव पाटीलसाहेब राज्यपालांचे भाषण सरकार तयार करुन देते, त्यासाठी 3 मंत्र्यांची समिती असते. राज्यपाल महोदय म्हणाले होते की, मला सांगण्यास आनंद होत आहे की, सर्व संकटावर मात करुन माझे राज्य एका भक्कम आर्थिक पायावर उभे आहे. माझे सरकार, राज्यपालांनी सांगितले की, आता 3 वर्षाची परिस्थिती बदलली आहे. आता सगळीकडे आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे, सगळीकडे आनंद, वाजवा रे वाजवा, टाळया वाजवा, डमरु वाजवा, सगळे छान, हे तेथे सांगितले होते.

नंतर श्री.शिगम.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

मा. राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये तुम्ही इन्डीकेट केले. मा. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आता आपण भक्कम पायावर उभे आहोत त्यामुळे चिंता करण्याचे कारण नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी हे जे आता मुद्दे उपस्थित करीत आहेत त्या संदर्भात सविस्तर चर्चा या सभागृहामध्ये झालेली आहे. त्यानंतर मा. सभापतींनी आपला निर्णय राखून ठेवला आणि निर्णय नंतर देतो असे सांगितले.ज्यावेळी याठिकाणी ही चर्चा झाली त्यावेळी मी सांगितलेले होते की, मा.विरोधी पक्ष नेत्यांनी राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांना या सभागृहामध्ये पाचारण करण्याची जी विनंती केलेली आहे त्यानुसार ॲडव्होकेट जनरल यांना येथे पाचारण करण्याची आवश्यकता नाही. मी हे देखील सांगितले होते की, प्लॅनिंग डिपार्टमेंटचे मा. राज्यपाल महोदयांना विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात निवेदन गेल्यानंतर मा. राज्यपाल महोदयांनी जे पत्र दिलेले आहे ते पत्र म्हणजे डायरेक्शन्स आहेत. अशा प्रकारचे ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन आल्यावर त्यानुषंगाने याठिकाणी चर्चा करुन सभागृहाचा वेळ घेतला जात आहे, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. तेव्हा याबाबतीत आपण आपले मत द्यावे आणि हा प्रश्न निकाली काढावा.

श्री. नितीन गडकरी : मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्या बोलण्यावरच माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये कोणत्या सदस्याने किती वेळ बोलावे हे ठरविण्याचा अधिकार मा. सभापतींचा आहे. कोणीही एलएल.बी. पास झाला म्हणजे ॲडव्होकेट होत नाही.

Shri Gurunath Kulkarni: Mr. Chairman, Sir, with your permission, I object to the above statement made by the Leader of the Opposition. I am objecting to the Statement made by him. Sir, yesterday, I have given my opinion only. But, now, the Leader of the Opposition just raises his voice and tries to put pressure on us. He cannot do like that. That can not be done.

Shri Nitin Gadkari: Mr. Gurunath Kulkarniji, you are the Advocate General for the N.C.P. and you cannot become the Advocate General for the State of Maharashtra.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Gurunath Kulkarni: Mr. Chairman, Sir, the hon. Leader of the Opposition should not try to insult the other hon. Members of the House and with your kind permission, I would request him to confine to the subject only. Please, do not insult us.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, मला थांबविण्याचे अधिकार हे आपणाला प्राप्त झालेले आहेत. मा. सभापती मला थांबवतील त्यावेळी मी लगेच थांबेन. एक शब्दही मी बोलणार नाही. तेव्हा मेहरबानी करुन मा.सदस्यांनी मा.सभापतींचे अधिकार आपल्याकडे घेऊन मला मार्गदर्शन करु नये. सभापती महोदय, जे जे काही कॉन्ट्रॅडिक्शन्स आहेत ते मी आपणासमोर मांडले आहेत. मा. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये काय आहे, बजेटच्या भाषणामध्ये काय आहे यातील विसंगती मी आपणासमोर मांडली आहे.

**सभापती** : मी मा.विरोधी पक्षनेत्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : खरे म्हणजे हा आपला अभिमान आहे. Sir,I am sorry to say. याठिकाणी कोणी चोरी केली, कोणी पैसे खाल्ले अशा प्रश्नावर चर्चा होते. हे विधिमंडळ आहे. लॉ-मेकर बॉडी आहे. खरे म्हणजे माझे सहकारी मित्र सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना आनंद व्हायला पाहिजे की, याठिकाणी कॉन्स्टीटयुशनल अशा मुद्यांवर डिटेलमध्ये चर्चा होत आहे. या सभागृहाचा सन्मान वाढविणारी अशी ही चर्चा आहे. बाहेरचे लोक मोठ्या आदराने या डिबेटकडे पाहात आहेत. अशा चर्चेला माझे वकील मित्र श्री. गुरुनाथ कुलकर्णी का हरकत घेत आहेत ते मला कळत नाही. सभापती महोदय, श्री. शंकरन साहेबांनी दिलेले पत्र, मा. राज्यपाल महोदयांनी दिलेले पत्र, मा. राज्यपाल महोदयांनी अभिभाषणामध्ये काढलेले उद्‌गार, मा. अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी बजेटचे केलेले भाषण या सर्वांमध्ये कॉन्ट्रॅडिक्शन्स आहेत. There is a clear-cut clarity with contradictions. त्याबाबतीत मला काही म्हणावयाचे नाही. हे मा. राज्यपाल महोदयांचे पत्र आहे. तसेच ॲडव्होकेट जनरल श्री. कदम यांचे देखील पत्र आहे. या पत्रावर मला बोलण्याचा अधिकार आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

सभापती महोदय, या पत्रान्वये सरकारने अडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन मागविलेले आहे. ॲडव्होकट जनरल सभागृहाला सल्ला देऊ शकतात. त्यांना आपण वेळोवेळी सभागृहात बोलावू शकतो, आपल्याला त्यांना बोलाविण्याचा अधिकार आहे. त्यांनी दोन नंबरच्या परिच्छेदात असे म्हटले आहे की,, "Before considering the questions raised for my opinion, it is necessary to have a look at the said Rules and in particular Rule 7. The Rule 7(1) postulates that the Governor may issue directives from time to time and such directives shall be complied with by the Board." ते डायरेक्टीव्हज् देऊ शकतात. परंतु ते डायरेक्टीव्हज् दुरुस्त करु शकतात, असे ओपिनियनमध्ये कुठेही म्हटलेले नाही. अगोदरचे डायरेक्टीव्हज् बदलून फ्रेश डायरेक्टीव्हज् देऊ शकतात असे कुठेही म्हटलेले नाही. त्यांच्या ओपिनियमनमध्ये दोन बाबतीत ओपिनियन आलेलेच नाही. माननीय राज्यपालांनी दिलेल्या डायरेक्टीव्हज ते बदलू शकता काय ? डायरेक्टीव्हज् दिल्या असतील त्याला दुरुस्त करु शकतात काय ? कॉन्स्टीटयूशनमध्ये यासंबंधीचे काही रेकॉर्ड मिळते काय ? हे पाहण्याचा मी बराच प्रयत्न केला. मला त्यासंबंधीचे रेकॉर्ड मिळाले नाही. सभापती महोदय, चौथ्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, "For this purpose, under Rule 7(4) the Planning Department is required to indicate to the Governor the approximate amount of total resources that may be available to the State Government for development expenditure during the subsequent year." सभापती महोदय, हे मला मान्य आहे की, तुम्हाला टोटल खर्चासाठी तुमच्याकडे किती रक्कम आहे यासंबंधीची माहिती अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी माननीय राज्यपाल महोदयांना सांगावे लागते. पण माझा प्रश्न हाच आहे. मी जे मघाशी म्हटले की, तुमची कमिटेड एक्स्पेंडीचर प्रोव्हीजन संपल्यानंतर उरलेल्या बजेटमध्ये तुम्ही डिस्क्रीएशन किती वापरले ? मग मॅंडेटरी डायरेक्शनचे पालन किती केले ? याच्यामधील जी गॅप आहे ती का निर्माण केली ? याचे आम्हाला या ठिकाणी उत्तर हवे आहे. सभापती महोदय, ही गॅप निर्माण झालेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी डायरेक्शन पाळल्या नाहीत. त्याच्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांना श्री. शंकरन साहेबांचे दुसरे पत्र पाठविले गेले. त्या पत्राच्या आधारावर आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

एवढीच प्रोव्हीजन करु शकतो असे सांगितले. पण ही प्रोव्हीजन करण्याच्या आधी आमचा टोटल प्लॅन इतक्या रुपयांचा आहे, आमचा कमिटेड एक्सपेंडीचर जो आम्हाला आवश्यक आहे तो इतक्या रुपयांचा आहे, डिक्रिएशनमध्ये एवढे पैसे उरलेले आहेत, यापैकी एवढे एवढे बजेटला दिल्या शिवाय आम्हाला पर्याय नाही म्हणून आम्हाला एवढे पैसे द्यावे लागत आहेत. या मँडेटरी डायरेक्शन्समुळे आम्ही एवढे देऊ. सभापती महोदय, मँडेटरी डायरेक्शन्सच्या आधी माननीय वित्त मंत्र्यांनी डिस्क्रिएशन पॉवर वापरुन ख-या अर्थाने ज्या मँडेटरी डायरेक्शन्स होत्या त्यासंदर्भात कॉन्स्टीटयूशनल भंग केलेला आहे. नियम 7 मधील उप नियम 6 मध्ये असे म्हटले आहे की, "Rule 7(6) is important inasmuch as it mandates that if and when there is occasion to revise the amounts of development expenditure as communicated to the Governor; such change shall be intimated to the Governor immediately after the State Government decides on such review." हे बरोबर आहे. यांनी कळविले आहे. सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगा की, या ठिकाणी ॲडव्होकट जनरल यांनी पुन्हा काय म्हटले आहे ते आपण पहा. आपण लेटर उघडा. त्यात परिच्छेद सात मध्ये शेवटी असे म्हटले आहे की, "By his letter dated March, 20, 2005 the Governor accorded his approval to the proposal submitted by the planning department vide its letter dated March, 17, 2005. It is a letter. सभापती महोदय, 20 तारखेच्या पत्राला ॲडव्होकेट जनरल यांनी पत्र म्हटले आहे. 20 तारखेस परवानगीचे पत्र मिळाले आहे. त्या पत्राला ॲडव्होकट जनरल यांनी लेटर असे म्हटले आहे. "By his letter dated March, 20, 2005 the Governor accorded his approval to the proposal submitted by the planning department vide its letter dated March, 17, 2005. In the light of the aforesaid, I answer the issues raised as under: सभापती महोदय, ॲडव्होकट जनरल सुध्दा त्या पत्राला लेटर म्हणतात. मला आपण याचा अर्थ समजावून सांगा. या चार वर्षात माननीय राज्यपालांनी जे निर्देश दिले आहेत. त्यातील मागील परिच्छेद पाहून तेच तेच लिहून चारही प्रकारचे डाक्यूमेंट तयार करावयास माननीय राज्यपाल

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/

श्री. नितीन गडकरी ....

महोदयांच्या कार्यालयातील कर्मचा-यांना काय उत्साह आला होता ? त्यावेळी पाच-पाच, दहा-दहा पाने तयार करुन आदेश दिले होते. सभापती महोदय, याला आदेश म्हणणे योग्य नाही. आदेश या शब्दाचा अर्थ ऑर्डर होतो. माननीय राज्यपालांनी निर्देश दिले होते असे मी म्हणतो. राष्ट्रपतींनी पार्लमेंटचे बिल पास झाल्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांना आदेश दिले. पण कॉन्स्टीटयूशन मध्ये लिहीले होते की, या आधी जे काही लिहीले असेल ते सोडून महामहीम राज्यपाल महोदयांना निर्देश देण्याचा अधिकार प्राप्त झाला. डायरेक्शन्सला या लेटरने अमेडमेंट कशा होऊ शकतात ?

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

त्याच्यावर त्यांनी म्हटले आहे की, हे लेटर आहे असे समजा. अमेंडमेंड झालेली आहे. तुम्ही करुन टाका.हया डायरेक्शन कशा ? मला अतिशय दु:ख वाटते आणि दुर्देव आहे की, विदर्भ,मराठवाडा,कोकण आणि महाराष्ट्राचा इतर भाग यांना न्याय देण्याचे आमचे जे काही प्रयत्न सुरु होते त्या प्रयत्नात अे.जी.देखील आमच्या बरोबर नाहीत याचे मला दु:ख आहे. त्यांना मी दोष देत नाही. अे.जी. हे महाराष्ट्र शासनाच्या डायरेक्शननुसार काम करतात. महाराष्ट्र सरकारचे वकील आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचे वेगळे विशेषाधिकार नाहीत. महाराष्ट्र सरकारचे प्रमुख वकील आहेत. त्यांचे सर्व प्रकारचे वेतन,भत्ते त्यांच्या जबाबदा-या आणि कर्तव्ये ठरविण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे. सभापती महोदय. As far as the Indian Contract Act is concerned, the Master is responsible for the acts of his servants. Hence, the Government is a Master and Chairman, Sir, if any thing happens or indicated by the Advocated General in the Court then that will be treated as an opinion of the Government.

Shri Gurunath Kulkarni" Mr. Chairman, Sir, I am on the Pont of Order. Mr. Chairman, Sir, I would submit that the Advocate General is not a servant of the States Government. Sir, let him verify about it. I am telling you very frankly that he is not a servant of the Government of Maharashtra. He is an independent authority and his services are accepted by the Government of Maharashtra only. He is not a servant of the State.

Shri Nitin Gadkari: Then what is the role of the Advocate General?

Shri Gurunath Kulkarni: Sir, the Advocate General is appointed by the newly elected Government. Sir, when next Government assumes power, the person hold a charge of that post tenders his resignation and takes a view that he does want to continue as an Advocate General of the State. Then the new incumbent is appointed by the present Government as Advocate General of the State or as long as, this Government exists, he will continue

or otherwise. He is not a servant of the State. ..2

श्री. नितीन गडकरी : He is not a servant of the Government But,there is a contract between the Advocate General and the Government of Maharashtra.सभापती महोदय, अे.जी.यांचे वेतन व भत्ते आणि अधिकार व कर्तव्ये ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. अे.जी.हे राज्य सरकारचे लिपिक किंवा कर्मचारी आहेत असे मी म्हटले नाही. अे.जी.पैसे का घेतात ? बांधकाम विभागाचा जी.आर.आहे. अे.जी. यांना सरकारी निवासस्थान कशा प्रकारे द्यावयाचे यासंबंधात जीआर आहे. With my permission, as a public servant of a State त्याला आम्ही सुविधा पुरवितो. सत्य आहे ते रेकॉर्डवर आहे. He is not like a Hon. Chairman or a High Court Judge or a Governor.पण ते सरकारी नोकर आहेत असेही म्हणणे बरोबर नाही. But contractual obligations are on him to protect and work for the Government and whatever the Government feels.त्याप्रमाणे न्यायालयात आपले मत सांगणे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय,कॉन्ट्रॅक्ट झाले म्हणजे सरकारला पाहिजे तसे नाही तर जे योग्य आहे तो ॲडव्हाईस देण्यासाठी त्याचे एक्सपरटाईज वापरतो. आपण त्यांना असे ओपिनियन द्या असे सांगू शकत नाही. अे.जी.हे एका विशेष अशा स्टेटसच्या माणसाची नियुक्ती होते. आपण ज्या उद्देशाने भाषण करीत आहात हे कोणत्याही बाजूला न कळणारे ओपिनियन आहे आणि ते राज्य सरकारने सांगितल्यामुळे दिले नाही. मागितले म्हणून स्वतंत्र मत दिलेले आहे. त्यांना आपण येथे निमंत्रित केले. मागील वेळी येथे अे.जी.आले होते ते जर सरकारने सांगितलेल्या प्रेशरला बळी पडले असते तर मागील वेळी मत दिले असेल तर ते दिसायला बरोबर दिसत नाही. पटलावरुन हे काढून टाकावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अे.जी.यांच्या बाबतीत मंत्रीमहोदय जे सांगत आहेत तसे उद्‌गार मी काढलेले नाहीत. अे.जी.जेव्हा आपले मत देतात तेव्हा सरकारशी चर्चा करतात. विधी विभागाच्या सचिवांशी चर्चा करतात.अनेक केसेसमध्ये असे होते. नागपूर हायकोर्टात केस सुरु असताना श्री. सावंत हे अे.जी.होते. सभापती महोदय, प्रस्तुत प्रकरणामध्ये डायरेक्शन्स् नंतर लेटर आणि हे लेटर काही डायरेक्शन्स् नाहीत असे माझे प्रामाणिक मत आहे.

यानंतर श्री. गायकवाड

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

या बाबतीत ॲडव्होकेट जनरल यांनी आमच्यावर अन्याय केलेला आहे असे आम्हाला दिसून येत आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी ज्या डायरेक्शन्स दिल्या होत्या त्याचे सरकारने गेल्या चार वर्षात पालन केलेले नाही.हे यावरुन सिध्द झालेले आहे.माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण आणि माननीय वित्त मंत्र्यांचे भाषण तसेच नियोजन विभागाचे पत्र या तिघांमध्ये वेगवेगळी विसंगती असल्याचे आमच्या लक्षात आलेली आहे. या सर्व प्रकारामुळे विदर्भ,मराठवाडा,कोकण आणि उत्तर महाराष्ट्रावर सातत्याने अन्याय करण्याची जी भूमिका सरकारची आजपर्यंत होती त्याच भूमिकेचा पुनरुच्चार माननीय ॲडव्होकेट जनरल यांनी केलेला आहे.याबाबतचे मला दु:ख आहे. त्यांच्या पत्राबद्दल आदर आणि सन्मान ठेऊन हे दुर्देव आमच्याकडे आहे याबद्दल मी खेद व्यक्त करतो. सभापती महोदय, या संदर्भात माझी आपल्याला अशी विनंती आहे की, या ठिकाणी या सभागृहामध्ये अशी व्यवस्था नाही की या बाबीला न्याय मिळू शकेल. मला एकच ऑप्शन आहे व तो म्हणजे हायकोर्टात जाणे.आणि याबाबत कालांतराने न्यायालयाचा निर्णय ज्यावेळेला लागेल तेव्हा आमच्या अनेक कायदा समजणा-या मित्रांनासुध्दा त्यावेळी सत्य कळून येईल. तोपर्यन्त त्यांना जे काही बोलावयाचे असेल ते बोलतील. त्याला माझी काहीही हरकत नाही.त्यानतर जर निर्णय आमच्या बाजूने लागला तर ते आपली घेतलेली लॉची डिग्री वापस करणार नाहीत पण मी त्यांच्याही इ ाानाबद्दलचा सन्मान ठेवतो आणि सभापती महोदय, या पत्राबद्दल सांगावयोच म्हणजे विदर्भ,मराठवाडा,कोकण आणि उत्तर महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळणारे हे पत्र आहे. सरकारचे सुध्दा हेच धोरण आहे.मी अतिशय दु:खाने या सर्व प्रकाराबद्दल तीव्र नापसंती या सभागृहात व्यक्त करतो आणि सभापती महोदय, या संदर्भात मी आपल्याला एवढीच विनंती करतो की,आता ॲडव्होकेट जनरल गेले, सरकार गेले, आपण आमचे सभापती आहात, या सार्वभौम सभागृहाचे आपण सभापती आहात.आणि भारतीय घटनेप्रमाणे आपण हे सभागृह चालवत आहात तेव्हा आपण केव्हा तरी ऑफ द रेकॉर्ड किंवा रेकॉर्डवर महाराष्ट्राच्या तीन माजी ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन मागवावे. सभापती महोदय, सध्याच्या ॲडव्होकेट जनरल यांचा पूर्ण सन्मान ठेवून मी हे सांगत आहे. त्या तीन माजी ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन आपण केवळ आपल्या ज्ञानाकरिता व आपल्या मार्गदर्शनाकरिता मागवू शकता. कारण आपण एक स्वतंत्र आयडेन्टेटी आहात.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

हे सभागृह आणि हे विधानमंडळ येथे आपले राज्य चालते.येथे माननीय मुख्यमंत्री आणि मंत्री आपल्या आदेशाप्रमाणे काम करतात. या विधानमंडळाच्या परिसरामध्ये कोणाला सोडावयाचे किंवा कोणाला सोडावयाचे नाही याबाबतीत आपण निर्णय घेत असता. तो निर्णय आपलाच असतो. या ठिकाणी आपले राज्य आहे.या भिंतीच्या बाहेर मात्र माननीय मुख्यमंत्र्यांचे राज्य आहे, सरकारचे राज्य आहे, मंत्र्यांचे राज्य आहे. या सभागृहात आमच्या हक्कांचे संरक्षण करणे हे आपले काम आहे.हा विषय अतिशय क्लिष्ट होत चालला आहे.यामध्ये अनेक वैधानिक पैलू आहेत. तेव्हा सभापती महोदय ,माझी आपल्याला अशी विनंती आहे की, या सभागृहाच्या समृध्दतेकरिता आणि लोकशाहीच्या यशस्वीतेकरिता आपण पुन्हा एकदा या राज्यातील तीनद माजी ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागवावे. सभापती महोदय, हे मत मागविल्यामुळे काही होणार नाही. परंतु आपण इंडिपेन्डन्टली ॲथॉरिटी आहात आपली विंग पूर्णपणे वेगळी आहे.तसेच आमच्या म्हणण्यातील जे काही सत्य आहे ते सुध्दा आपल्याला कळेल.या ओपिनियनबद्दल मी माझे दुःख व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा अनेक गोष्टी तपासून आपण त्याचा विचार करावा अशी विनंती करतो. उद्या सकाळी सर्व सन्माननीय सदस्य मिळून माननीय राज्यपाल महोदयांना भेटावयाला आम्ही जाणार आहोत त्यावेळी आम्ही त्यांना अशी विनंती करणार आहोत की, आपण आमच्या सगळयांचे आहात. या घटनेमध्ये घडलेली जी काही परिस्थिती आहे ती आमच्या समोर आलेली आहे आपण आमचे मायबाप आहात, आपल्याबद्दल आम्हाला सन्मान आहे.आपण डायरेक्शन्स दिल्या म्हणून आम्हाला न्याय मिळाला होता परंतु आपण डायरेक्शन्स मागे घेतल्या.असे सरकार म्हणते त्यामुळे आमच्यावर अन्याय झाला आहे.आता हे लेटर आणि डायरेक्शन्स यामध्ये काय फरक आहे यासबंधी आपणच आम्हाला मार्गदर्शन करावे. आपण जे काही म्हणाल ते आम्हाला मान्य राहील. परंतु लोकशाही प्रमाणे आणि घटनेप्रमाणे या सभागृहात आम्हाला न्याय मिळू शकला नाही .हे सरकार आम्हाला न्याय देत नाही. याबाबतीत आम्ही माननीय सभापतींना विनंती केलेली आहे. तशीच विनंती गर्व्हनर साहेब, आम्ही आपल्याला करीत आहोत. याबाबतीत त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करावे अशी विनंती करण्यासाठी आम्ही त्यांच्याकडे जाऊ आणि हा विषय आम्ही त्यांच्याकडे सोपवून त्यांच्याकडून मार्गदर्शन घेऊ .एवढे सांगून मी माझे बोलणे संपवितो.

------

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, या अतिशय दु:खद प्रसंगीसुद्धा 3-4 गोष्टींचा मनापासून आनंद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी दु:खापेक्षा देखील 3-4 बाबींविषयी मला मनापासून आनंद विशेष वाटतो आहे. त्या बाबी कोणकोणत्या आहेत ते मी आपल्याला सांगू इच्छितो. अध्यक्ष महाराज, कुटुंब नियोजनाचे पुरस्कर्ते असलेले एक जोडपे असते आणि त्या जोडप्याला एकच अपत्य झाल्यानंतर कुटुंब नियोजन हे कसे महत्त्वाचे आहे, ते कसे चांगले आहे हे अनेक दिवस ते सांगत असते आणि त्या जोडप्याचे नातेवाईक देखील तसेच सगळ्यांना सांगत असतात. अगदी असेही सांगत असतात की, एका नंतर बिलकूल नाही. अगदी मग मामा सांगत असे, सासरे देखील तेच सांगत असत. थोडक्यात कुटुंब नियोजन फार चांगले असते असे सारे सांगत असत. परंतु पुढे असे झाले की, त्या जोडप्याला चुकून दुसरे मूल होते. दुसरे मूल झाल्यानंतर मग त्या जोडप्याची आणि त्याच्या साऱ्याच नातेवाईकांची भाषणे बदलली, भाषा बदलली. कारण दुसरे मूल जन्माला आले होते. मूल तर जन्माला आले होते. तसे या ठिकाणी झालेले आहे. म्हणूनच मी माननीय वित्त मंत्र्यांच्या कौशल्याबद्दल पहिल्यांदा त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी या ठिकाणी विनियोजन विधेयक पास होईपर्यंत ती सो कॉल्ड अमेंडमेंट कोणालाही दिसू दिली नाही. जेव्हा विनियोजन विधेयक मंजूर झाले त्यानंतरच त्यांनी ती पुढे आणली. कारण मूल तर जन्माला आलेलेच होते. आता कोणीच काही करू शकत नाही हे त्यांनीही जाणले होते. मग विरोधी पक्षनेता काय आणि अन्य कोणी काय करणार ? आणि हे तर आपले ॲडव्होकेट जनरल आहेत, ते तरी काय करणार ? अध्यक्ष महाराज, आता हे लक्षात घेतले पाहिजे की, बाळ तर जन्माला आलेलेच आहे. मग ते दुसरे असले तरी हेच म्हणावे लागते की, ते कसे आणि किती चांगले आहे. तेव्हा मी या एका गोष्टीबाबत आनंद व्यक्त केलेलाच आहे की, माननीय अर्थमंत्री या इतिहासामध्ये एक अतिशय महत्त्वाचे स्थान पटकावतील की गेल्या 3-4 वर्षे हा 371(2) कलमाखालील लढा या महाराष्ट्रात चालू आहे ... मूळ घटनेमध्ये या विषयी काहीही मार्गदर्शन नाही. कारण ही कलम 56 ची अमेंडमेंट आहे. मला अध्यक्ष महाराज, दुसऱ्या गोष्टीबद्दल आनंद येथे व्यक्त करावयाचा आहे. 4 तारखेला दिलेले मत 5 तारखेला आमच्या हाती प्रसृत करण्यात आलेले आहे. मी हे उपरोधाने बोलत नाही. पण गेली 4-5 वर्षे जी झटापट यासंबंधात होत आहे त्यावर हे उत्तम सोलूशन आहे. तिसऱ्या एका गोष्टीबद्दल देखील मला आनंद वाटला. ती म्हणजे या गोष्टीचे की यापेक्ष उत्तम समर्थन नाही. जे काही बाळ जन्माला आलेले आहे त्याबद्दलचे यापेक्षा

..... 3बी 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख ....

अधिक दुसरे चांगले समर्थन होऊ शकत नाही, झालेले नाही. अध्यक्ष महाराज, या सभागृहाने किंवा आपण स्वत: सभापती म्हणून याबाबत निर्णय द्यावा असा आग्रह मी येथे आणि आपल्या चेंबरमध्ये देखील धरला नव्हता. कारण मला या कोठल्याही बाबतीत सभापतींचे मत योग्य वाटत नव्हते. म्हणून या निमित्ताने हे मत येथे आलेले आहे. यामध्ये मला आनंद अशासाठी आहे की, हे जे काही आहे ते असे आहे, ते आपण गोड करून घ्यावे. म्हणजे ज्याप्रमाणे मुलीचा बाप हात जोडून लग्न मंडपामध्ये सांगत असतो तसे हे आहे. अध्यक्ष महाराज, आणखी एका गोष्टीचा आनंद आहे. ही लढाई किती दीर्घ आहे. त्याचे बरेवाईट परिणाम हे होतीलच. पण एक कॉन्स्टिटयूशन मेकॅनिझम आहे त्यानुसार ॲडव्होकेट जनरलचे मत आपण मागविले. पण आपण यापूर्वीच बजेट पास करून बसलो आहोत. येथे एक लक्षवेधी सूचना पुढे गेल्यावर मागे जाता येत नाही आणि मग आपण इतक्या पुढे गेलो आहोत की आता मागे फिरूच शकत नाही. अध्यक्ष महाराज, मला एका गोष्टी बद्दल खरोखरी मनापासून आनंद झालेला आहे. यामध्ये जस्टीफिकेशन दिलेले आहे. त्या श्री.शंकरन् साहेबांनी देखील म्हटले होते की, Review your directions or issue fresh directions. म्हणजे त्यांनी लेटर मागितले नाही तर डायरेक्शन्स मागितल्या. त्यांनी जे काही मागायचे ते मागितले आणि त्यांनीही जे काही द्यायचे ते दिले आहे. आता हे जन्माला आल्यानंतर हे काय देणार ? अध्यक्ष महाराज, मला आणखी एका गोष्टीबद्दल आनंद झाला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी या डायरेक्शन्स सभागृहासमोर ठेवण्याची गरज आहे काय हे त्यांना विचालेले नाही. याची गरज असल्यास ते केव्हा ठेवावयाचे ? बजेट सादर करताना ठेवायचे की मंजूर करून झाल्या नंतर ठेवायचे ? की अधिवेशन संपल्यानंतर ? ...

( यानंतर श्री.जागडे ...3सी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी. टी. देशमुख....

त्यांनी म्हणावयाचे की अधिवेशन संपल्यानतर ठेवावयाच्या. मला याची भीती होती. विनियोजन विधेयक मंजूर झाल्यांनतर ठेवावयाच्या की अधिवेशन संपल्यानंतर ठेवावयाच्या, अशी विचारणा तर झालेली नाही ना ? आता हे आपण विचारले नाही, याबद्दल मला मनापासून आनंद आहे. सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल न्यायाधीश आहेत, म्हणून आम्ही काही त्यांचे मत मागितले नव्हते. किंबहूना न्यायाचा हा काही अंतिम टप्पा आहे, असे आम्ही मानीत नाही. त्यामुळे आम्ही त्यांचे मत मागितलेले नव्हते. मागे ज्यावेळी ॲडव्होकेट जनरल यांनी आपले मत दिले होते, त्यावेळी आपण थांबलो होतो. कॉन्स्टीट्युशन हिस्ट्रीमध्ये हे सर्व रेकॉर्ड होत आहे. त्यामुळे हा प्रश्न कोठे सुटू शकतो ? आता हा प्रश्न येथे सुटला तर ती आनंदाची गोष्ट आहे. राज्यकर्त्यांच्या सदसदविवेकबुध्दीला 371 ( 2 ) चा मॅकेनिझम समजला आणि तो सुटण्याचा मार्ग या ठिकाणी निघाला तर ती आनंदाची गोष्ट आहे. न्यायालय हे त्यानंतरचे फोरम आहे. आम्ही या ठिकाणी मनापासून युक्तीवाद व्यक्त करतो, त्याचा एकमेव हेतू असा आहे की, हा प्रवास पुढे नेणे आहे. परंतु हे मत वाचल्यानंतर हा प्रवास किती दीर्घ आहे, किती कष्टाचा आहे, हे महाराष्ट्रातील अनुशेषग्रस्त भागाला कळून येईल. पाच - सहा जिल्हे सोडले तर बाकीच्या महाराष्ट्राला ही वाट अतिशय बिकट आहे, असा बोध ॲडव्होकेट जनरलच्या मतामुळे होईल. ही माझ्या दृष्टीने फार मोठी उपलब्धी आहे. सभापती महोदय, आपण मला जो वेळ दिला त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ( वित्तमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी डॉ.शंकरन यांनी माननीय राज्यपालांना लिहिलेले पत्र आणि मी मांडलेला अर्थसंकल्प या विषयी थोडीशी टिपणी केली आहे. दोन्ही माननीय सदस्यांनी अनेक वर्षे या विषयावर अनेक वेळा सभागृहात आपली मते मांडली आहे, त्याबद्दल मला नितांत आदर आहे. शेवटी आपल्या भागाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न, मागासलेल्या भागाला न्याय देण्याचा प्रयत्न या सभागृहातील दोन्ही बाजुचे सदस्य करीत असतात. त्या विषयी मला काही म्हणावयाचे नाही. फक्त मला एका मुद्दाचे स्पष्टीकरण करावयाचे आहे. अर्जुनाला श्रीकृष्णाने चक्रव्युह कसा भेदावयाचा याची गोष्ट सांगावयाला सुरुवात केली होती. त्यावेळी अभिमन्यू आईच्या पोटात होता. द्रोपदीला झोप लागली. त्यामुळे अर्धवट संभाषण ऐकण्याचा परिणाम काय झाला, अभिमन्युचे नंतर काय झाले, हे आपणाला माहिती आहे. सभापती महोदय, माझे अर्थसंकल्पाचे स्पष्टीकरण देणारे भाषण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अर्धवट ऐकले आहे. त्यामुळे ते असे बोलत आहेत, असा माझा गोड समज झालेला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात कोणत्या तरतुदी आहेत ? आपली पायवाट आता कोणत्या दिशेने चालली आहे, याचे स्पष्टीकरण मी दिलेले आहे. कोणत्याही वकिलांकडे जाण्यापेक्षा मला जर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी वेळ दिला तर या राज्याची दिशा कोणती आहे ? आणि अर्थसंकल्पाचा पाया काय आहे ? हे मी त्यांना खाजगीत समजावून सांगू शकेन. अर्थसंकल्प, मा. राज्यपालांना डॉ.शकरन यांनी दिलेले पत्र यामध्ये फार विसंगती नाही. हे मी सभागृहात सांगू इच्छितो.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या वरिष्ठ सभागृहाच्या इतिहासामध्ये अतिशय महत्वाचा असा हा विषय गेल्या तीन-चार दिवसापासून उपस्थित करण्यात आला. महाराष्ट्राच्या विकासासाठी या विषयावर या सभागृहामध्ये दोन वेळा सविस्तर, सखोल चर्चा करण्यात आली अशा प्रकारचे या चर्चेचे वर्णन मी करु शकेन. घटनेच्या कलम 371(2) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकरिता 1994 मध्ये महाराष्ट्रात नव्हेतर संपूर्ण देशात एक फार मोठे क्रांतीचे पर्व निर्माण झ ााले. मी परवाच्या दिवशी बोलतांना म्हटले की, 1984 मध्ये, नंतर 1994 मध्ये आणि आता 2005 मध्ये या विषयावर आपण सातत्याने चर्चा करीत आलो आहोत. महाराष्ट्रातील सर्व मागास विभागांचा अनुशेष भरुन निघावा यासाठी आपण सतत 10 वर्षे प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतर 1994 मध्ये विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव संमत केला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची भूमिका सातत्याने आपण या सभागृहामध्ये मांडली, त्या भूमिकेला 1994 मध्ये आपल्याला यश प्राप्त झाले. व त्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळांची निर्मिती झाली. या विकास मंडळांच्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राचा विकास व्हावा यासाठी सभागृहातील माननीय सदस्य सातत्याने व अट्टाहासाने प्रयत्नांची पराकाष्ठा करीत राहिले. त्याचाच एक भाग म्हणून परवा म्हणजे 1 तारखेला औचित्याच्या मुद्दयाच्या रुपाने या ठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आली. वास्तविक पहातां, औचित्याच्या मुद्दयावरील सभागृहातील चर्चा ही किमान 5 ते 7 मिनिटे किंवा फार तर दहा मिनिटे यापेक्षा अधिक होत नाही. अशी आतापर्यंतची पध्दत व परंपरा आहे. या विषयाच्या अनुषंगाने झ ाालेल्या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी भाग घेतला. अशाप्रकारे या विषयावर साडे तीन तास चर्चा करण्यात आली. त्या चर्चेला मी खुल्या मनाने या ठिकाणी परवानगी दिली. त्या अनुषंगाने या विषयावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मी एक तारखेला माननीय अर्थमंत्र्यांना या बाबतीत काही सूचना दिल्या व त्यांना सांगितले की, आपण या बाबतीत तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आणि तो सल्ला या सदनामध्ये निर्णयाच्या स्वरुपामध्ये आपण जरुर सादर करा. त्याबाबत माननीय अर्थ मंत्र्यांनी विचार करुन तज्ज्ञांचा सल्ला घेतला. माननीय राज्यपाल महोदयांना घटनेच्या कलम 371 (2) अन्वये जे अधिकार दिले गेले आहेत त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.सभापती....**

अधिकाराचा वापर करुन त्यांनी 2001 सालापासून दिलेले डायरेक्टिव्हज आपल्याकडे उपलब्ध आहेत. आणि या वर्षी सुध्दा त्या पध्दतीच्या डायरेक्टिव्हज उपलब्ध झाल्यानंतर त्या संदर्भात या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली. तेव्हा माननीय राज्यपाल महोदयांच्या डायरेक्टिव्हज आणि त्याला अनुसरुन असलेले पत्र यावर मी कोणतेही भाष्य करणार नाही. त्या बाबतीत माननीय अर्थमंत्री,माननीय विरोधी पक्षनेते व माननीय प्रा. बी.टी. देशमुख सरांनी, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाष्य केले आहे. त्यानंतर माननीय अर्थमंत्र्यांनी ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन किंवा मत सभागृहासमोर सादर केले आहे. त्या बाबतीत मला एवढेच म्हणावयाचे आहे आणि परवा मी स्वत: बोलतांना सांगितले आहे की, या चर्चेच्या अनुषंगाने कळत न कळत माननीय राज्यपाल महोदयांच्या संदर्भात अनवधानाने एखादे वाक्य किंवा शब्द उधृत झाला असेल तर तो या सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये रहाता कामा नये. हे मी त्या दिवशी म्हणालो होतो आणि आज सुध्दा म्हणतो. The Advocate-General is an advisor to the Government and he is appointed by the Honourable Governor. अशा पध्दतीची त्यांची कॉस्टिटयुशनल पोझिशन आहे. कुणाचा सल्ला घ्यावा? कशासाठी सल्ला घ्यावा? हा भाग अलग आहे. परंतु मला वाटते की, माननीय राज्यपालांनी नेमलेल्या व राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अनेक बाबींवर सल्ला देणाऱ्या एका यंत्रणेने किंवा इंस्टिटयुटने दिलेला हा सल्ला आहे. तेव्हा ॲडव्होकेट जनरल यांनी शासनाला जो सल्ला दिला तो माननीय अर्थमंत्र्यांनी या ठिकाणी वाचून दाखविला.

(यानंतर सौ. रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MAP पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:40

**सभापती** . . . .

माझ्या मताप्रमाणे, संहितेप्रमाणे ॲडव्होकेट जनरल हे राज्याचे प्रमुख विधी सल्लागार असतात. त्यांनी त्यांची मते दिलेली आहेत आणि ती स्वयंस्पष्ट आहेत असे मला वाटते. याबाबतीत मी जास्त उहापोह करणार नाही. फक्त मी असे सांगेन की, औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने 1 तारखेला आणि आज अशी किमान चार तास आपण चर्चा केलेली आहे. त्यामुळे या संपूर्ण चर्चेवर आपल्या उपस्थितीत मी पडदा टाकत आहे आणि ही चर्चा संपली असे मी जाहीर करतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आता आपण सांगितले आणि तो आपला आदेश आम्हाला मान्य आहे. पण विदर्भ, मराठवाडा, कोकण व उत्तर महाराष्ट्रावर शासन सातत्याने अन्याय करीत आहे. चार वेळा डायरेक्शन्स् काढली जातात आणि ते पुन्हा बदलतात आणि आपल्याला सोयीची ओपीनियन्स् घेऊन पुन्हा आपल्याला आणि आम्हाला ते ऐकावे लागते असे दुर्दैव या सभागृहात आमच्यासमोर आले. मागासलेल्या भागावर हा जो अन्याय होत आहे, तो जर असाच होत राहणार असेल तर या सभागृहात आमच्या अस्तित्वाला काही अर्थ उरत नाही. म्हणून या संदर्भात शासनाच्या कृतीचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(यानंतर विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

----

**सभापतीस्थानी - मा.उप सभापती**

. . . .3 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXIX OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

(चर्चा पुढे सुरु)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याठिकाणी या बिलावर सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर सरपोतदारसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंतसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाणसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडेसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.रावतेसाहेब आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या बिलाबाबत आपले विचार मांडले आहेत. मी सुरुवातीला सांगितले की, म्हाडामध्ये लो इन्कम ग्रुप आणि एस.आर.ए.मधील स्लम रिहॅबिलीटेशन स्कीम आहेत आणि त्यासाठी जी तरतूद आहे, त्या तरतुदींच्या अनुषंगाने याठिकाणी हे विधेयक आणण्याचे काम झालेले आहे. यामध्ये मला सांगितले पाहिजे की, नागरी निवारा संस्था आहे आणि या संस्थेने जवळजवळ सहा हजार गाळे बांधलेले आहेत आणि या संस्थेला या बिलाच्या माध्यमातून पुढचा काळामध्ये प्रॉपर्टी टॅक्सची सवलत मिळणार आहे. अशाच पध्दतीच्या ज्या ज्या विवक्षित संस्था पुढे येतील, त्यांना शासन सवलतीच्या दरात जमीन देईल आणि जे दुर्बल घटकांसाठी, अल्प उत्पन्न घटकांसाठी घरे बांधतील त्यांच्यासाठी प्रॉपर्टी टॅक्समध्ये सवलत, ज्यामध्ये तेथे ज्या इमारती बांधल्या जातील, त्यासंदर्भात निरनिराळया वर्गासाठी, निरनिराळया वेळी अधिसूचना काढून या सवलती देण्यात येणार आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी कॉमन सूचना किंवा कॉमन सुधारणा सूचविलेल्या आहेत. प्रामुख्याने सर्वच सन्माननीय सदस्यांनी सेस इमारतींच्या म्हणजेच मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दृष्टीकोनातून विचार व्यक्त केले आहेत की, या संदर्भातील बिल आणावे आणि या सवलती सेस इमारतींना देखील देण्यात याव्यात. मी विधानसभेमध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आणि तेथे काल विधेयक मंजूर करीत असतानाही सांगितले की, 33 (7) डी.सी.आर.एस.मध्ये या सेस बिल्डींगचा उल्लेख आहे आणि मी याठिकाणी सांगू इच्छितो की, मंत्रीमंडळा समोर हा सर्व प्रस्ताव आणलेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (पुढे चालू...

जमल्यास, हे अधिवेशन संपण्याच्याअगोदर याविषयीचे बील आणण्यात येईल, परंतु काही कारणास्तव बील आणू शकलो नाही तर ऑर्डीनन्स काढून सवलत देण्याच्यादृष्टीने निश्चित निर्णय घेण्यात येईल,असे मी सांगू इच्छितो. सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सुचविले की, 20 वर्षाची सवलत कमी आहे, काही सन्माननीय सदस्यांनी सुचविले की, टॅक्स वाढवू नये, जो आहे तोच कॉमन ठेवावा. काही सन्माननीय सदस्यंनी सुचविले की, जे पुनर्रचित गाळे आहेत, त्यांना देखील अशाच पध्दतीची सवलत द्यावी. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आज महानगरपालिकांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. खरे तर उत्पन्न निर्माण करण्याचा अधिकार महानगरपलिकेला कायद्याने दिलेला आहे. त्यामधून नागरी सवलती त्यांना द्यावयाच्या असतात. परंतु आज महानगरपालिका अडचणीत सापडल्याचे चित्र पहावयास मिळते. त्यामुळे टक्सच्या बाबतीत किती सवलत द्यायची, याचाही शासनाला विचार करावा लागतो. या ठिकाणी ज्या काही सूचना मांडलेल्या आहेत, त्याचा वेळोवेळी शासन विचार करेल, म्हणून सभागृहाला विनंती करतो की या विधेयकाला मान्यता द्यावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मा. मंत्री महोदयांचे मी मनापासून आभार मानतो. मी, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, अरविंद सावंत यांनी मुंबईच्या पुनर्रचित सेसच्या बिल्डींगच्या संबंधात विचार मांडले, त्यानंतर मंत्री महोदयांनी सवलत देण्याच्या संबंधात सांगून, या अधिवेशनात त्याबाबतचे बील आणता आले नाही तर ऑर्डीनन्स काढला जाईल,असे सांगून सुखद धक्का दिला. मंत्री महोदयांनी मुंबईकरांना ही देणगी दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात धेण्यात आले आहे. आता विशेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचे भाग झाले.
खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 29 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 29 संमत झाले आहे.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**विधेयक क्रमांक 6 बाबत.**

**उपसभापती** : कामगार मंत्र्यांच्या विनंतीवरुन आजच्या कार्यक्रम पत्रिकेमधील सात क्रमांकाच्या शासकीय विधेयकामधील (ब) कामगार मंत्र्यांचा प्रस्ताव आणि (क) विचार, खंडशः विचार संमत करणे या दोन्ही बाबी संबंधीची चर्चा दिनांक 12 किंवा 13 तारखेला घेण्यात येईल.

--

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अल्पकालीन चर्चेसंबंधी.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या किंमतीचा महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नावर आज जी अल्पकालीन चर्चा ठेवलेली आहे ती अत्यंत महत्वाची चर्चा आहे. आज मध्यंतरी सभागृहाचा बराच वेळ अनुशेषासंबंधीच्या चर्चेमध्ये गेलेला आहे. माझी अशी विनंती आहे की, ही अल्पकालीन चर्चा आपण नंतर घ्यावी.

**उप सभापती** : नंतर ही चर्चा पुढच्या आठवडयावर जाईल. कारण उद्या सकाळी सुध्दा 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही चर्चा पुढच्या आठवडयात घ्यावी परंतु चर्चा उशिरा घेऊ नका.

**उप सभापती** : आजची अल्पकालीन चर्चा नंतर घेण्यात येईल. आता अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील.

-----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांगली जिल्हयातील धडक उपसा सिंचन योजनांबाबत.

**मु. शी.**: सांगली जिल्हयातील धडक उपसा सिंचन योजनांबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 2124 ला दिनांक 28 मार्च, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, "सांगली जिल्हयातील धडक उपसा सिंचन योजनांबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 2124 ला दिनांक 28 मार्च, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्र शासनाने मिडकॉमच्या माध्यमातून दुष्काळाच्या वेळी ज्या 25 धडक उपसा सिंचन योजना राबविल्या त्या योजना चालविण्यासाठी घेतल्या. त्या 25 धडक योजनांच्या किमतीची रक्कम 20 समान हप्त्यामध्ये सुरुवातीला मिडकॉमला आणि त्यानंतर पाटबंधारे खात्याला किंवा महाराष्ट्र शासनाला द्यावयाची होती. त्यांचा शेवटचा हप्ता 5 मे, 2005 ला डयू आहे. म्हणजे पुढच्या महिन्यामध्ये या कारखान्याकडून शासनाला देय्य असलेली सर्व रक्कम प्राप्त झाली पाहिजे. काही हप्ते दिल्यानंतर साखर कारखान्याने हप्ते देण्याचे बंद केले. नोटिसेस दिल्यानंतर देखील त्यांनी हे हप्ते दिले नाहीत. मिडकॉम ही संस्था बंद झालेली आहे हे माहीत असताना सुध्दा त्यांनी मिडकॉमला चेक पाठविले आणि आपण पैसे भरण्यास टाळाटाळ करीत नाही असे भासविण्याचा प्रयत्न त्या साखर कारखान्याने केला. त्यावेळी या योजना नीट चालत नाहीत, वेळेवर हप्ते मिळत नाहीत, शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही अशा तक्रारी येऊ लागल्या. लोकप्रतिनिधींनी देखील मागणी केली. विधानसभेमध्ये यासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी शासनाने या योजना ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला. ज्यावेळी शासनाने हा निर्णय घेतला त्यावेळी हायकोर्टामध्ये जाऊन या साखर कारखान्याने त्याला स्थगिती मिळविली. नंतर त्या खटल्याचा निकाल लागला. त्यांचा दावा हायकोर्टाने फेटाळला. सन 2003 मध्ये विधानसभेमध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे शासनाने ज्यावेळी योजना ताब्यात घेण्याचा निर्णय जाहीर केला त्यावेळी पुन्हा हायकोर्टामध्ये जाऊन त्या ठिकाणी जुना जो रद्द झालेला दावा

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

प्रा. शरद पाटील ....

होता तो रिव्हाईव्ह केलेला आहे. आता जवळपास दीड वर्षे हा दावा हायकोर्टामध्ये प्रलंबित आहे. मी या चर्चेच्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करु इच्छितो की, हायकोर्टामध्ये प्रलंबित असलेल्या दाव्याचा निकाल त्वरित मिळविण्याचा प्रयत्न शासनाने करावा. सध्या त्या दाव्याचे काम महामंडळाचे श्री. पाटील नावाचे वकील पाहतात. आता महामंडळाचे कर्मचारी किंवा महामंडळ जवळपास शासनाकडे वर्ग झालेले आहे. त्यामुळे शासनाने महामंडळाचे जे वकील आहेत त्यांच्या मदतीला कार्यक्षम वकिलांची नियुक्ती करुन या सिव्हील ॲप्लीकेशनचा निकाल लवकरात लवकर मिळवावा. कारखान्याने शेतकऱ्यांवर जो अन्याय चालविलेला आहे तो न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊन

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील....

कारखान्याकडून या योजना काढून घेऊन शेतक-यांच्या ताब्यात देण्याचा शासनाचा जो निर्णय आहे तो सुध्दा न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावा आणि ज्यांच्यासाठी योजना झाल्या आहेत त्यांच्या शेतीला पाणी मिळावे यासाठी हा निर्णय लवकर होण्याची आवश्यकता आहे हे देखील न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न शासनाने करावा आणि शेतक-यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा अशी विनंती मी आपल्यामार्फत शासनाला करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर ( जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांनी तारांकित प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर मी स्वयं स्पष्ट दिलेले होते. परंतु मा.सदस्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आजची ही अर्धा तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. माझ्या ब-याचशा निवेदनाचा उल्लेख मा.सदस्यांनी केलेला आहे. या 25 धडक उपसा सिंचन योजनेचा इतिहास मा.सदस्यांनी आणलेला आहे आणि तो बहुतांशी बरोबर आहे. तारांकित प्रश्नाला मी जे उत्तर दिले होते तेही मला शासनाच्यावतीने आज द्यावे लागत आहे की हा सगळा प्रश्न शासनाने निर्णय घेऊन हया उपसा सिंचन योजना ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला. 11.11.2003 रोजी संबंधित कारखान्याला पत्र गेले त्यापूर्वी सुरुवातीला याचिका दाखल झाली होती ती मेरिटवर न ऐकता प्रोसिजरल डिफॉल्ट म्हणून ती बाहेर काढलेली होती. त्यात हायकोर्टाने कारखान्याला स्पष्ट सांगितलेले होते की, लॅक ऑफ प्रॉसीक्यूशनमुळे तुम्ही जर ही याचिका चालवित नसाल तर रिस्टोअर करण्याचा अर्ज करण्याच्या वेळी तुम्ही कारणे देऊनच रिस्टोअर करावे, अशाप्रकारचा हा कडक निर्णय होता. परंतु हे पत्र आल्यानंतर रिस्टोरेशनचे अर्ज सिव्हिल ॲप्लीकेशनच्या माध्यमातून दिले गेले आणि त्या माध्यमातून हा रिटपिटीशन हा रिस्टोअर झाला. त्यानंतर या मूळच्या रिटपिटीशनमध्ये असलेली जी इंटेरिम ऑर्डर होती की ज्या योगे शासनाला या धडक योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा इन्जंक्शनच्या माध्यमातून हस्तक्षेप करण्याची परवानगी नाकारलेली होती. हाही रिस्टोअर झाला, तोही अलाईव्ह झाला आणि त्यासाठी आज शासनाचा निर्णय झाला असला तरी या रिटपिटीशनचा जोपर्यंत निकाल लागत नाही तोपर्यंत शासनाला पुढची कार्यवाही करता येणार नाही. मा.सदस्यांच्या एका म्हणण्याचा शासनाचा दुजोरा राहील आणि प्रत्यक्ष कार्यवाही होईल. या रिटपिटीशनवर लवकरात लवकर निर्णय घेण्यासाठी आवश्यक वाटले तर सध्याच्या वकिलांच्या जोडीला शासनाचा स्पेशल कौन्सिल म्हणून नेमण्यात येईल.

श्री.विलासराव शिंदे : सांगली जिल्हयाच्यादृष्टीने हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मंत्रिमहोदयांनी जे सांगितले ते योग्य आहे. परंतु तेथील शेतक-यांच्या शेतीसाठी शासनाच्या पैशातून हया धडक योजनांमार्फत पाणी दिलेले होते आणि आज कारखानाही बंद आहे आणि

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/

श्री.विलासराव शिंदे....

धडक योजनाही चालू नाहीत, जवळजवळ निम्या योजना बंद आहेत. अशा परिस्थितीत शेतकरी वीज मंडळाची बिले भरुन योजना चालविण्याचा प्रयत्न केला आहे त्याला सुध्दा कारखाना अडथळा आणत आहे. यासाठी शासनाने मध्यस्थी करुन ते स्वत: पैसे भरुन या योजना चालू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. दरम्यानच्या काळामध्ये तेवढे तरी काम केले तर हजारो एकर जमीन पाण्याखाली येऊ शकेल. कोर्टाच्या पातळीवर खास प्रयत्न करावेत अशाप्रकारची मी विनंती करतो.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : शासन हायकोर्टाच्या निर्णयाला बांधील राहील आणि जे जे या उपसा सिंचन योजना चालू करता येतील यासाठी मध्यस्थी नाही तर बैठक घेऊनच आपण यातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत आहे.

प्रा.शरद पाटील : आता मा.सदस्य श्री.शिंदेसाहेबांनी सुचविले की, हस्तांतरणाला न्यायालयाचा निर्बंध आहे. तथापि, एक शासन म्हणून पाटबंधारे खाते म्हणून हया योजनांचा लाभ या शेतक-यांना मिळावा यासाठी ज्या उपाययोजना आवश्यक आहेत.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:00

(श्री. शरद पाटील पुढे सुरु...)

पाणी पट्टी भरणे, विजेची बिले भरणे या सारख्या जबाबदा-या साखर कारखाने पार पाडत नसतील तर त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार आपल्याला आहेत. ते अधिकार मा. मंत्री महोदय वापरतील काय ?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : मी आधीच उत्तरात सांगितलेले आहे की, हायकोर्टाच्या निर्णयाला बांधील राहून या उपसा सिंचन योजना सुरु करण्याकरिता जे जे काही करता येईल ते करण्याची शासनाची तयारी आहे. याबाबतीत दोन्ही मा.सदस्यांची तसेच कारखान्यांच्या प्रतिनिधींची एक चर्चा आयोजित करुन लवकरात लवकर उपसा सिंचन योजना चालू करण्याच्या दृष्टीने पावले टाकली जातील.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील शेतक-यांची अडत्यांकडून करण्यात येत असलेली लूट

**मु.शी.**: "राज्यातील शेतक-यांची अडत्यांकडून करण्यात येत असलेली लूट" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 4926 ला दिनांक 28 मार्च 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ. अशोक मोडक, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : तालिका सभापती महोदया, "राज्यातील शेतक-यांची अडत्यांकडून करण्यात येत असलेली लूट" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 4926 ला दिनांक 28 मार्च 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदया, 28 मार्चला आपल्या कार्यक्रमपत्रिकेवरील प्रश्नोत्तराच्या तासात 4926 क्रमांकाचा प्रश्न "राज्यातील शेतक-यांची अडत्यांकडून करण्यात येत असलेली लूट" या विषयावर उपस्थित झालेला होता. त्या प्रश्नाला सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराच्या अनुषंगाने आजची ही अर्धा-तास चर्चा मी उपस्थित करीत आहे.

या अगोदर 20 मार्चला याच सदनामध्ये या विषयासंदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदय, श्री. हर्षवर्धन पाटील यांनी उत्तर दिले होते. त्यांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे असे मी म्हणणार नाही. म्हणून ती चर्चा पुढे चालू ठेवून महाराष्ट्रातील शेतक-यांना न्याय मिळण्यासाठी काही प्रक्रिया सुरु होणे अगत्याचे आणि औचित्याचे वाटल्यामुळे मी आजच्या या अर्धा-तास चर्चेच्या प्रयोजनाचा घाट घातलेला आहे. मा.मंत्री महोदय, श्री. हर्षवर्धन पाटील जे म्हणाले ते सत्य आहे. 1995 साली तत्कालीन पणन मंत्री डॉ. जयप्रकाश मुंदडा यानी एका अर्थाने पुढाकार घेतला आणि शेतक-याला न्याय मिळावा या भूमिकेतून हे अडत्ये किंवा व्यापारी जी वसुली करतात ती वसुली बंद व्हावी, शेतक-यांची जी लूट केली जाते ती बंद व्हावी या अर्थाने काही नवीन अध्याय लिहिला जावा, अशा अर्थाचा तो उल्लेख होता. दुर्दैवाने व्यापारी त्याच्या विरोधात गेले, आंदोलन झाले आणि त्यानंतर एक नवीन इतिहास सुरु झाला. वास्तविक पाहता गेली 8 वर्षे या शेतक-याला न्याय मिळावा म्हणून अशा प्रकारचे जे आदेश अमलात आलेले आहेत त्या आदेशानुसार दुर्दैवाने कारवाई होत नाही आणि म्हणून हे अर्धा-तास चर्चेचे प्रयोजन

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. अशोक मोडक पुढे सुरु...)

आहे. माझ्याकडे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचा एक ड्राफ्ट आहे. या कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य सचिव यांनी स्पष्ट शब्दात असे म्हटलेले आहे की, या समितीच्या उपविधी क्रमांक 25 प्रमाणे केलेली कपात केवळ अनुज्ञेय आहे. भाडे, वाहतूक, हमाली आणि तोलाई या व्यतिरिक्त ज्या कोणत्या कपाती असतील त्या नियमबाह्य मानल्या जातील. परंतु प्रत्यक्ष व्यवहाराच्या पावत्या माझ्याकडे आहेत. त्या मी मा. मंत्री महोदयांना सादर करु शकतो. प्रत्यक्षातील स्थिती महाभयानक आहे. माझ्याकडे 31 ऑक्टोबर 2000चा दैनिक "नवाकाळ"चा अंक आहे. त्यामधील शीर्षक मोठे विलक्षण आहे. शीर्षक असे आहे, "कृषी उत्पन्न बाजार समिती, अधिकारी आणि दलालांचा भ्रष्टाचार, भाजीपाला मार्केट मधून रोजची 19 लाख रुपयांची कमाई. एका मार्केट मधून इतकी कमाई तर 5 मार्केट मधून किती "? ही पाच मार्केट कोणती आहेत ? त्याठिकाणी भाजीपाला मार्केट, फळ मार्केट, कांदा-बटाटा मार्केट, मसाला मार्केट आणि कडधान्य मार्केट आहेत. त्या ठिकाणी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. त्याठिकाणचे किसान संघाचे मोठे कार्यकर्ते श्री.पांडुरंग राऊत यांनी पूर्वी एक संघटना स्थापन केली होती. त्या संघटनेच्यावतीने मा. मंत्री महोदय श्री.हर्षवर्धन पाटील आणि मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना पत्र पाठविलेली आहेत. याठिकाणी मी एक वानगीदाखल पुरावा देत आहे. म्हणजे शितावरुन भाताची परीक्षा करता येईल. श्री. धोंडिबा माहुले या शेतक-याचे बिल आहे. या शेतक-याने अडत्याला 336 रुपयांची गवार विकली. त्याची पावती माझ्याकडे आहे. अशा अनेक पावत्या माझ्याकडे असून मी त्या मा.मंत्रीमहोदयांना सादर करीन. अडत्याने कोणकोणती कपात केलेली आहे ? 26.90 रु. दलाली किंवा अडत्याचे चार्जेस, ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 18:05

डॉ.अशोक मोडक..

9 रुपये हमाली, 3 रुपये तोलाई, 3 रुपये लेव्ही चार्ज, 9 रुपये जागा काटा भाडे, 3 रुपये टपाल खर्च, हुंडेकरी कमिशन 10 रुपये लावण्यात येत असते. आता आपण जर मुंबई उत्पन्न बाजार समितीचा नियम 25 वा बघितला तर सभापती महोदया,ा असे लक्षात येते की, येथे एकूण 64 रुपये कापून घेतले गेलेले आहेत. त्यातील अधिकृत किंवा कायद्याप्रमाणे कापून घेण्याची रक्कम केवळ 41 रुपये 90 पैसे एवढी होते. ती माहिती मी वाचून दाखवितो. आडत 26 रुपये 90 पैसे कापून घेणे बरोबर आहे. हमाली 9 रुपये, तोलाई 3 रुपये आणि लेव्ही चार्ज 3 रुपये याची बेरीज 41 रुपये 90 पैसे एवढी रक्कम होते. अनधिकृत कपात जागा काटा भाडे 9 रुपये, टपाल खर्च 3 रुपये, हुंडेकरी कमीशन 10 रुपये 10 पैसे म्हणजेच 64 रुपये कापून धेतले जात आहेत. त्यातील वस्तुत: वैध कपात ही केवळ 41 रुपये 90 पैसे एवढी आहे. ऐकेका शेतक-याने विकलेल्या गवारी बद्दल, त्याने विकलेल्या कांदा, त्याने विकलेला बटाटा, त्यांनी विकलेल्या वस्तूवर अशा प्रकारे अवैध कपात करुन घेतली जात आहे त्याबद्दलचा निवाडा येथे होण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदया, नवाकाळा या वृत्तपत्रात जे म्हटलेले आहे ते खरे आहे. या ठिकाणी न्यायालयाच्या आदेशाचे पालन होत नाही. कृषी उत्पन बाजार समितीच्या संकेतांचे, रुढींचे पालन या ठिकाणी केले जात नसल्यामुळे त्याचा परिणाम असा झाला आहे की, ज्याचा उल्लेख मी मागे सुध्दा केला होता. जर अशा प्रकारे शेतक-यांची लूट होत असेल तर आणि ती सगळी नियमबाहय असेल तर स्वाभाविकपणे आता शेतकरी वाट पाहत आहेत की, आपल्याला शासनाकडून न्याय निश्चितपणे मिळेल. मला आनंद वाटतो की, माझ्या या प्रश्नाला माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी जे उत्तर दिले आहे ते योग्य आहे. त्या उत्तरास ते आजही सहमत आहेत. यासंबंधात मी जे पुरावे दिले ते पुरावे लक्षात घेऊन त्या शेतक-यांना न्याय दिला जाईल, त्या शेतक-यांना दिलासा दिला जाईल. आणि म्हणून मी निवेदनाच्या अखेरीस एवढीच विनंती करतो की, ज्या किसान संघाच्या वतीने आज महाराष्ट्रात एका अर्थाने आंदोलन चालले आहे. त्या किसान संघांच्या कार्यकत्यांना सांगतो की, तुम्ही पुरावे घेऊन यावेत. आपल्या दालनात आपण कृपया त्यांना हिअरींग द्यावे. जर समजा आपल्याला ते पटले तर त्यांनी दिलेले पुरावे योग्य आहेत. शेतक-यांवर अन्याय होत आहे. अकारण शेतक-यांच्या रक्कमेतून कपात केली जात आहे. मला शंभर टक्के खात्री आहे की, त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर त्यांचे म्हणणे जर आपल्याला पटले तर शेतक-यांना अवश्यक न्याय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक...

द्याल तर एका अर्थाने या अर्धा तास चर्चेचे फलीत चांगले मिळाले असे आपल्याला म्हणता येईल. याबाबतीत मंत्री महोदयांनी गांभीर्याने लक्ष घालावे अशी विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, सभागृहाचे सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक आणि इतर सन्माननीय सदस्यांनी " राज्यातील शेतक-यांची अडत्यांकडून करण्यात येत असलेली लूट" या विषयावर अर्धा तास चर्चा सभागृहात उपस्थित केलेली आहे. या चर्चेच्या संदर्भात मला एवढेच म्हणावयाचे आहे की, मुंबईची कृषी उत्पन्न बाजार समिती असो, नागपूरची कृषी उत्पन्न बाजार समिती असो, राज्यातील इतर शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती असो. आधीच निसर्गाने राज्यातील शेतक-यांना उध्वस्त केलेले आहे. त्या उध्वस्त झालेल्या शेतक-यांना अडते तसेच दलाल ज्या पध्दतीने नागवतात, त्या शेतक-यांची लुटमार करतात. त्यांचे शोषण करतात. हे थांबले पाहिजे. या राज्याचे पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांचे मी अभिनंदन करतो की. विदर्भातील शेतक-यांचे शोषण थांबविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केलेला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतक-यांचे विविध प्रकारचे शोषण केले जात आहे, अवैध मार्गाने शोषण केले जात आहे, ते थांबविण्यासाठी माननीय पणन मंत्र्यांनी बराच पुढाकार घेतला आहे. शेतक-यांच्या बाबतीत ब-याच चांगल्या गोष्टी त्यांनी केल्या त्याबद्दल त्यांना पुन्हा मी धन्यवाद देतो. सभापती महोदया, ए.पी.एम.सी. मध्ये शेतकरी आपला माल आणतो. तो माल आणताना त्यास बराच खर्च करावा लागतो...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे..

दलाली देणे,हमाली देणे इ.देणी शेतक-याला द्यावी लागतात याबाबत डॉ. मोडक यांनी सांगितले आहे. एकंदरीत जी रक्कम कापली जाते ती 64 रु. आहे. जी अवैध कपात आहे. टोटल वैध कपात ही 41.91 रु. आहे असे असताना सदरची 64 रुपयांची रक्कम अवैधपणे कापली जाते यावर प्रतिबंध आणणे आवश्यक आहे. आधीच निसर्गामुळे शेतकरी उध्वस्त झालेला आहे. त्याच्यावर आलेल्या अस्मानी आणि सुलतानी संकटाला थांबविण्यासाठी मंत्रीमहोदयांनी निश्चितपणे कठोर कारवाई करतील आणि आमच्या शेतक-याला या संकटातून वाचवतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि मला या विषयावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदया आपले आभार मानतो.

जयहिंद.

---

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (पणनमंत्री) : सभापती महोदया, मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आणि त्यावर मा.सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी आपले मत व्यक्त केले. मला वाटते हा विषय फार महत्वाचा आहे. यासंदर्भात दोन वेळा ता.प्र.उपस्थित झाला होता आणि त्या प्रश्नाच्या अनुषंगाने काही उत्तरे देण्याचा प्रयत्न मी या सदनामध्ये केला होता. मला याचे समाधान आहे की हा विषय पुन्हा एकदा चर्चेच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आला. कारण हा प्रश्न तितकाच महत्वाचा आहे. याबाबत शासनाची भूमिकेकडे या राज्यातील लाखो शेतक-यांचे लक्ष लागले आहे. शेतक-यांचे लक्ष प्रामुख्याने ऐपीएमसीच्या माध्यमातून नियमानुसार जी वसूली केली जाणे आवश्यक आहे त्यापेक्षा जास्त वसूली होत असेल आणि काही कृषी उत्पन्न बाजार समित्या शेतक-यांना वेठीस धरत आहेत त्याकडे लागले आहे. डॉ. अशोक मोडक यांनी यासंदर्भात वृत्तपत्रातील काही दाखले याठिकाणी सांगितले. हा विषय दोन विभागामध्ये प्रामुख्याने गणला गेला आहे. पहिला विभाग असा की, जी काही वसूली होते ती वसूली बेकायदेशीरपणाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे होत नाही आणि अन्यायकारक होते यासंदर्भात काही उदाहरणे सांगितली आहेत हा एक भाग आहे. दुसरा भाग म्हणजे जो काही सेस वसूल केला जातो तो शेतक-यांकडून सध्या करीत आहोत तो त्यांच्याकडून न करता व्यापा-यांकडून करावा ही शेतक-यांची मागणी आहे. कायद्यामध्ये सुध्दा तीच तरतूद आहे. कायद्याची कलमे आपल्याला माहीत आहेत. या संदर्भात तत्कालिन पणनमंत्री यांनी 1995-96 मध्ये हा निर्णय केला होता की कायद्याप्रमाणे शेतक-यांच्याऐवजी व्यापा-यांकडून मार्केटच्या माध्यमातून सेस वसूल करावा. अशा प्रकारचे आदेश काढले. त्यानंतर जवळपास 13-14 दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी संपूर्ण राज्यातील मार्केट बंद होती आणि करोडो रुपयांच्या शेतक-यांच्या मालाचे नुकसान झाले. कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली. त्यावेळेच्या सरकारने मंत्रिमंडळापुढे हा विषय पुन्हा आणला आणि अशा पध्दतीने मार्केटमध्ये आलेल्या मालाचे नुकसान होत असेल त्यातून स्थगिती देण्यात आली आणि स्थगिती अशी दिली की जी सेसची वसूली आहे ती शेतक-यांकडून चालू ठेवावी ही वसूली पुढील आदेश येईपर्यंत चालू ठेवावी. त्यानंतर पुन्हा एक नवीन विधेयक 2001 साली या सदनामध्ये मांडले गेले. विधेयकामध्ये सुध्दा ही तरतूद आहे ती ऑप्शन ठेवावी किंवा बदलावी अशा प्रकारची अमेंडमेंड करण्यासाठी संयुक्त समितीकडे पाठविले त्यांनी शिफारस मान्य केली नाही. आजच्या स्टेजला शेतक-यांकडून वसूली न करता व्यापा-यांकडून करावी असा जो कायदा आहे त्यामध्ये कुठलीही अमेंडमेंड झालेली नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ...

परंतु स्थगितीचा जो आदेश देण्यात आला होता तो अजूनही चालू आहे.त्याचे कारण काय आहे हे मी सभागृहाला सागितलेले आहे.

डॉ.अशोक मोडक : स्थगिती का उठविण्यात आली नाही याबाबतीत पुन्हा खुलासा करण्यात यावा.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदया, त्यावेळी देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात आली नाही याचे कारण असे की, आपण त्यावेळी निर्णय घेतला होता व त्याप्रमाणे 14-15दिवस सगळया राज्यातील मार्केटस बंद झाले होते .तेव्हा शेतक-यांनी असे सागितले की, आमचा माल घेण्यास कोणी तयार नाही. सभापती महोदय, या निमित्ताने मी सभागृहाला अत्यत नम्रपणे सांगू इच्छितो की या राज्यातील व्यापार हा केवळ अडत्यांमुळे वाढला आहे.त्यामध्ये सुध्दा दोन भाग आहे. अर्थात मी केवळ अडत्यांची बाजू घेत आहे अशातला भाग नाही. परंतु शेतक-यांचा माल हा शेवटी कोण खरेदी करणार आहे? हा माल सरकार काही खरेदी करीत नाही.कृषी उत्पन्न बाजार समिती माल खरेदी करीत नाही.कृषी उत्पन्न बाजार समिती ज्या अडत्यांना लायसेन्स देते ते अडते त्यांच्या ज्युरिसडिक्शन्समध्ये जो काही दिवस ठरलेला असतो त्या दिवशी ऑक्शन करीत असतात .ऑक्शनमध्ये आलेला माल व्यापा-यांना विकला जातो. त्यामुळे त्यावेळी स्थगिती देण्यात आली होती. ती स्थगिती आजही चालू आहे. या निमित्ताने मला सभागृहाला हे सांगावयाचे आहे की, या खात्याचा मंत्री म्हणून माझी अशी भूमिका राहणार आहे की, हा सेस व्यापा-यांकडून वसूल केला जाईल. परंतु तो वसूल करीत असतांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच या संदर्भातील इतर काही प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी या राज्यातील सर्व अडतदारांची एक बैठक घेण्यात येईल. व्यापारी असोसिएशन, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा संघ तसेच सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांना या बैठकीला बोलावले जाईल आणि अधिवेशन संपल्यानंतर पुण्यामध्ये एक बैठक घेतली जाईल.सगळयांच्या समोर हा प्रश्न मांडून त्यातून जर काही सहमतीचा मार्ग निघाला तर आपल्याला ती भूमिका स्वीकारण्यास कोणतीही अडचण येणार नाही.मी सभागृहाला सांगू इच्छितो की, हा सेस व्यापा-यांकडून वसूल करावयाचा असा जर आपण निर्णय घेतला तर आजची जी परिस्थिती निर्माण झालेली आहे ती तशीच राहणार आह. कारण
शेतक-यांकडून ही रक्कम वसूल केली काय किंवा व्यापा-यांकडून वसूली केली काय या सेसच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ..

रकमेचा बोजा शेतक-यांवरच पडणार आहे.हा वस्तुस्थितीचा भागआहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदया, यासंबंधीचे प्रकरण कोर्टात गेलेले आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनासुध्दा माहीत आहे श्री.महादेव पांडुरंग राहूत हे शेतकरी हितवर्धक संस्थेचे सेक्रेटरी असून त्यांनी दिनाक 19 ऑगस्ट 2000 ला मुंबई हायकोर्टात दावा दाखल केला होता. 20 सप्टेंबर 2002 रोजी शेतक-यांच्या बाजूने कोर्टाने निर्णय दिला होता.तेव्हा या निर्णयाचा सुध्दा आपण नक्कीच विचार केला पाहिजे.9 ऑक्टोबर 2000 रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीने पत्रक काढले होते त्यात असे म्हटले होते की," शेतकरी हिशोबपट्टीतून जागा भाडे, सर्व्हिस चार्जेस,टेलिफोन चार्जेस, टपाल व जादा कमिशन अशा प्रकारच्या अनधिकृत कपाती करु नयेत असा मुंबई हायकोर्टाने आदेश दिलेला आहे".त्या आदेशाची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, जो सेस वसूल जातो त्यामध्ये जे ठरवून दिलेले नियम आहेत त्याचे पालन होत नाही या संदर्भात हा आदेश देण्यात आलेला आहे.पणन संचालकांनी जे निकष ठरवून दिलेले आहेत त्याची अंमलबजावणी होत नाही त्याबाबतीत हा आदेश दिलेला आहे.आपण जे सांगितलेले आहे त्यावरुन मला तसे वाटते.उच्च न्यायालयाने जो काही आदेश दिलेला आहे. त्याचे पालन जरुर केले जाईल.सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मूळ मुद्दा असा उपस्थित केला होता की, शेतक-या ऐवजी अडत्याकडून सेसची रक्कम वसूल करण्यात यावी.तेव्हा त्याबाबतीत सर्व संबंधितांची बैठक बोलावून आपण त्यातून योग्य असा तोडगा काढू दुसरा प्रश्न असा उपस्थित करण्यात आला आहे की, कायद्याप्रमाणे तरतूद केली असतांना शेतक-यांकडून अनावश्यक किंवा मोठया प्रमाणावर जादा वसुली करण्यात आलेली आहे.याबाबतीत किसान संघाचे पदाधिकारी आणि सन्माननीय सदस्य्य डॉ.अशोक मोडक यांची एकत्रित बैठक मी माझ्या दालनात बोलावतो.ज्या ए.पी.एम.सी.च्या बाबतीत विषय असेल त्यांच्या सभापतींना व सचिवांना बोलावतो व या संदर्भात त्वरित कार्यवाही केली जाईल.सन्माननीय सदस्यानी काही मुद्दे उपस्थित केले होते. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, राज्यातील शेतक-याला जर उभे करावयाचे असेल तर ए.पी.एम.सी. आपल्याला प्रभावीपणे राबवाव्या लागणार आहेत.केन्द्र सरकारने एक नवीन कायदा पारित केलेला आहे व.पूर्वीच्या कायद्यात अमेन्डमेन्ट करण्यात आली आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या मोनॉपलीच्या बाबतीत .......

नंतर श्री.सुंबरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाटील ...

आज सगळ्या राज्यांमध्ये हा कायदा आहे परंतु तो नव्याने सुधारल्यामुळे खाजगी मार्केटस् देखील महाराष्ट्रात आता उभी राहू शकतील. तसा निर्णय केंद्र सरकारने घेतलेला आहे, आणि आता राज्य सरकारला त्याबाबत विचारणा केलेली आहे. तेव्हा आता यापुढे असे अनेक फूड मॉल्स राज्यात येऊ लागतील. म्हणून या बाबतीतील सुधारित विधेयक आपल्याला या अधिवेशनात देखील आणावे लागणार आहे. कारण केंद्र सरकारने तत्वत: हे मान्य केलेले आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे, त्यांनी आणलेल्या मालाचे योग्य नियोजन करणे वगैरे वगैरे बाबतीत बदल हे करावे लागणारच आहेत. हा धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर राज्यातील शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून हे आपल्याला करावे लागणार आहे. तेव्हा आपल्या मनामध्ये ज्या काही शंका आहेत त्याबाबत माझ्या पणन विभागामार्फत निश्चितपणे कारवाई केली जाईल आणि त्या दृष्टीने बैठका देखील घेतल्या जातील एवढेच मी आपल्याला या निमित्ताने सांगू इच्छितो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : अर्धा तास चर्चा संपली आहे. आता ...

श्री. गुरूनाथ कुळकर्णी : अध्यक्ष महाराज, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. काल आणि आज सुद्धा विशेष बाब म्हणून एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणली गेली होती. वैधानिक विकास मंडळे जी राज्यात आहेत.. विदर्भ विकास मंडळ, मराठवाडा विकास मंडळ आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ.. यांची मुदत 30 एप्रिल 2005 रोजी संपते आहे आणि त्यामुळे त्यांची मुदत वाढविण्याचे आश्वासन खालच्या सभागृहामध्ये शासनाकडून दिले गेल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. मात्र या सभागृहामध्ये त्याबाबत अधिकृतपणे आम्हाला काहीही कळलेले नाही. या संदर्भात माननीय सभापतींनी दोन वेळा शासनाला निवेदन करून निश्चित काय ते कळविण्याबाबत निदेश दिलेले होते. पण आतापर्यंत त्याबाबत काहीही करण्यात आलेले नाही. तेव्हा माझी विनंती आहे की, उद्या तरी या बाबतीतील घोषणा शासनाकडून केली जावी. सन्माननीय संसदीय कार्य मंत्री आता येथे उपस्थित आहेत तेव्हा त्यांना आपण याबाबत निदेश द्यावेत ही विनंती.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदया, मी या बाबतीतील निवेदन करा असे निदेश दिलेले होते. खालच्या सदनामध्ये अशा पध्दतीने वा कोठल्या माध्यमातून याबाबत घोषणा झालेली आहे त्याची माहिती देखील मी मागविली आहे. तेव्हा या बाबतीतील माहिती घेऊन मी उद्या याबाबतचे निवेदन येथे करीन.

.... 3एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या, बुधवार, दिनांक 6 एप्रिल, 2005 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक होणार असून नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता होईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 23 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 6 एप्रिल, 2005 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही